CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति मंडळानें पुरस्कृत

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ९७; त्रैमासिक वर्ष ४४.

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

८ वा खंड

MISCELLANEOUS ARTICLES ON INDIAN HISTORY VOL. VIII

4476

श. १८८८]
रा. श. २९३]

किंमत ५ रु.
Price Rs. 5

[A. D.
1966

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निवेदन

या मंडळाच्या त्रैमासिकाच्या ४४ व्या वर्षाचा हा जोड अंक आहे. हा श. १८८५ मध्यें सभासद असणाऱ्यांसाठीं आहे. या वर्षी आणखी तीन जोड अंक काढून या वर्षाच्या शेवटीं त्रैमासिकाच्या मागील अंकांची भरपाई करावी असा प्रयत्न चालूं आहे. यश येईल असें वाटतें.

मागील दोन जोड अंकांप्रमाणें याहि अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळानें भरीव आर्थिक साह्य देण्याचें ठरविलें आहे. याबद्दल मंडळास संतोष वाटतो. मंडळ त्या मंडळाचें अतिशय आभारी आहे.

आपल्या कारभारी मंडळाचे एक सभासद श्री. न. वि. गाडगीळ दिवंगत झाले ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. त्यांच्या पुणें विद्यापीठाच्या कुलगुरुत्वाच्या काळांत त्यांजकडून होणाऱ्या लाभास मंडळ अंतरलें. ईश्वरेच्छा बलीयसी. नवे कुलगुरूहि मंडळ-हितैषी निश्चयानें आहेत.

श्री. प्रा. रा. वि. ओतुरकर यांनीं आपल्या मंडळास कांहीं अटींवर दहा हजार रुपयांची देणगी दिली. याबद्दल त्यांस धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत.

श्री. ग. ह. खरे यांचें 'सिलेक्ट आर्टिकल्स' हें पुस्तक मंडळाच्या पुरस्कृत मालेंत घातलें आहे. मंडळसभासदांसाठीं त्याचें मूल्य साडेपांच रुपये आहे. इतरांस सहा रुपये आहे. पुरस्कृत मालेंत आणखीहि कांहीं पुस्तकें नव्या वर्षांत प्रकाशित व्हावीं असा अंदाज आहे.

या अंकासोबत डॉ. सिंघल यांच्या 'दि स्फिंक्स स्पीक्स' या पुस्तकाच्या डॉ. बा. मो. कानिटकर यांनीं काढलेल्या इंग्रजी सारांशाची प्रत आहे ती पाहावी. अभिनव अनुमान आहे. तो लेख मंडळ त्रैमासिकाचाच अंश आहे.

श. १८८८ आषाढ शुद्ध १
इ. १९६६ जून १९

चिटणीस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति मंडळाने पुरस्कृत

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ९७, त्रैमासिक वर्ष ४४.

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

८ वा खंड

State Museum Library Lucknow

4776

MISCELLANEOUS ARTICLES ON INDIAN HISTORY VOL. VIII

शा. १८८८]
रा. श. २९३]

किंमत ५ रु.
Price Rs. 5

[A. D. 1966

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अनुक्रमणिका

क्रमांक	लेखक	लेख	पृष्ठ
1	Anthony D'Costa, Bombay	Muhammad bin Tughluq.	१
2	Dr. P. B. Desai, M. A., Ph. D., Dharwar	A New Haihaya Family.	७
३	श्री. ना. ब. जोशी, विजापूर	वीरमाल सीवाजीचा.	१०
४	,, ,,	कांहीं अज्ञात प्राचीन कवि.	१८
५	श्री. य. ग. फफे, पुणें	गंगालहरींतील मूळ पाठ.	२२
६	,, ,,	पंडितराव आणि दानाध्यक्ष भिन्न कीं एकच ?	३३
७	श्री रा. शं. नगरकर, पुणें	गोविंद नरहरी : प्राचीन मराठींतील एक प्रचंड ग्रंथकार.	३७
८	श्री. विनायकराव करमळकर, पुणें	योगिनी मीरा.	४२
९	श्री. य. न. केळकर, पुणें	गणपति पुळें येथील शेंडये घराण्याची हकीकत.	४८
१०	प्रा. म. श्री. माटे, पुणें	वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प.	५४
११	श्री. दि. वि. काळे, पुणें	वैजापूरवर भोसल्यांची एक स्वारी.	७०
१२	श्री. रा. चिं. ढेरे, पुणें	संतपूजक पंत.	७३
१३	श्री म. वि. निखळ, पुणें	चिदंबरशिष्य राजाराम याची ग्रंथसंपदा.	८१
१४	श्री. ग. ह. खरे, पुणें	शिखर-शिंगणापूर आणि शिवछत्रपतींचे पूर्वज.	८५

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्रसरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशनस्थळ— भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

२ प्रकाशनकाल— त्रैमासिक

३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता } दत्तात्रेय वासुदेव आंबेकर; भारतीय आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते } श्री. गणेश हरि खरे, श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, डॉ. बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर, भारतीय; १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

६ मालक व पत्ता— भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें दिलेला तपशील अचूक आहे.

ता. ३०।६।१९६५ **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**

मुद्रक : **द. वा. आंबेकर**, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

प्रकाशक : **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**

१३२१ सदाशिव पेठ, पुणें २.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ४४] त्रैमासिक [अंक १-४

1. Muhammad bin Tughluq *

(Anthony D'Costa, Bombay)

Muhammad bin Tughluq was the emperor of Delhi from A.D. 1325-1351, and his reign is one of those rare spells in the history of ancient and medieval India, when almost the entire land was brought under a single rule. True enough he was not the first sultan to cross the Vindhyas into the Deccan; for that had been done for instance by Ala-ud-din Khelji before him, and Ala-ud-din's general Malik Kafur had even advanced as far as the extreme south of the peninsula. All the same, it was Muhammad bin Tughluq who attempted to set up a Muslim administration in the South and even tried unsuccessfully to establish his capital at Devgir, which he renamed Daulatabad.

For the accurate knowledge of Muhammad's impact on the Deccan we depend on medieval Muslim writers like Barani, Ibn Batuta, Isami, and Firishta. But besides that, between the years 1535 and 1540 two Portuguese writers, Fernão Nunes and João de Castro recorded the traditions about this emperor current among the Hindus. Nunes has preserved for us the Vijayanagar tradition, and Castro the Maharashtra tradition. Nunes was utilized by R. Sewell in his well-known history of Vijayanagar, **A Forgotten Empire**; but still, he did not examine too closely the truth of what this tradition says of Muhammad bin Tughluq. Castro, who within a few years of writing this account was to become the Governor and Viceroy of Portuguese Asia (1545-1547), has gone unnoticed till now, and a translation of his account appears in the current issue of **Indica**, the journal of the Heras Institute. This paper is an attempt to compare the two traditions and to understand Muhammad bin Tughluq's impact on Hindu memory.

* ५२ वें संमेलन, श. १८८७ (इ. १९६५)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Both accounts make Muhammad the first sultan to cross the Vindhyas and subjugate Maharashtra and the valley of the Krishna. This must have been because of his attempt to set up a Muslim administration in the South and to establish his capital at Devgir, so that it was he who in course of time became in Hindu memory the representative of the Muslim movement into the Deccan, whereas Ala-ud-din and Kafur were forgotten. But whilst the Vijayanagar tradition attributes this advance to the precise year A. D. 1230, the Maharashtra traditon ascribes it to about the year A. D. 840.

The Muslim historians tell us that Muhammad led several expeditions to the South. First as Prince in 1321, when he overthrew the Kakatiya dynasty of Warangal; next in 1335, when he wanted to punish a Muslim rebellion in Ma'bar, but was obliged to turn back after reaching Warangal; yet again in 1337 to punish his rebellious cousin Baha-ud-din Gurshasp; and finally in 1345 when he crushed a Muslim rebellion at Devgir. Besides that, he resided at Devgir between the years 1327 and 1329 during his ill-fated attempt to make it his capital. Hence, though the Vijayanagar tradition is closer to the actual date than that of Maharashtra, still it enhances the antiquity of events by about a century. Again, after the manner of popular tradition, both accounts simplify history by making Muhammad come down into the Deccan only once and then withdraw. On the other hand the Maharashtra tradition confines itself to the struggle between the Sultan and the Yadava dynasty, while the Vijayanagar tradition speaks chiefly of the overthrow of the ruler of Anegundi in the neighbourhood of the future Vijayanagar.

According to the Maharashtra tradition there was a long and bitter war between Muhammad and Remumdarao, i. e. Ramchandradeva of the Yadava dynasty, till at length "Remumderao (*sic*) was vanquished and killed, and with him all the chivalry of his realm." In fact, however, the Yadavas had been finally overthrown some years before Muhammad came to the throne; and whereas Ramchandradeva more than once, after resisting a while, made his submission to the Sultan of Delhi, it was his successors who fought to the death. We therefore see how tradition endowed Muhammad and Ram-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

chandradeva with the character of protagonists in the struggle. The reason why the former impressed Hindu memory in this way have already been pointed out; the explanation why the latter has been thus honoured may be that he made some attempt to resist the invader and was the last Yadava to rule for a considerable number of years, his reign extending from 1271 till about 1310. His two successors rebelled against Delhi and were crushed after short reigns. After that, the Maharashtra tradition goes on to narrate how first the Bahmani and then the five Deccan Sultanates arose.

The Vijayanagar tradition makes Anegundi, in the vicinity of what will soon be the city of Vijayanagar, the centre of the action. Muhammad advances to the attack and the king of the place, after making a last stand at a fortress 'Crynamata', falls with almost all his followers, fighting to the last. But before that, a tragedy is enacted of a kind which was to be witnessed again at Burhanpur when the Maratha troops invaded the place soon after Shambhuji's accession. Led by the king himself the men put their wives and children to the sword in order to save them from dishonour, and then issue from their defences to do battle and die. A few old ministers alone escapes the general massacre. Now events very similar to these are related by the Muslim historians in connection with the rebellion of Muhammad's cousin in 1337. Gurshasp is befriended by the Hindu king of Kampila (of which Nunes's 'Crynamata' may be a variant form); the king is attacked for it by Muhammad's forces and, according to one version, dies fighting after making his family enter the flames. Kampila has been identified with a place of that name not far from Anegundi, and thus the Hindu tradition and the Muslim historians seem to refer to the same episode. However, it is the Hindu tradition which illustrates the humane side of Muhammad's character; for according to it, we see him granting cremation rites to the dead and permitting the king's body to be treated with special honour.

Both the Maharashtra and the Vijayanagar traditions attest to the unrest prevailing among the Hindu population

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

under Muslim rule. But whereas the former tradition shows us Muslim rule consolidating itself in the Deccan under the independent Bahamani Sultanate, the latter shows us Muhammad bin Tughluq conciliating Hindu feeling like a true statesman by setting up in place of the king of Anegundi one of the old ministers who had survived the disaster. Thus was founded the kingdom of Vijayanagar. On the other hand Firishta describes the rise of Vijayanagar purely as a concerted Hindu attempt to hold Muslim expansion in check, the grace of the Sultan of Delhi having played no part in it. It thus appears that Hindu tradition was kind to the memory of Muhammad bin Tughluq, and it remains to see what more it tells us of him.

In the Maharashtra tradition we see the Sultan, besides vanquishing the Yadavas, also proudly issuing token leather coins "in order to show all people, wheresoever his name and fame reached, how sovereign he was and revered by his subjects." And we know from the Muslim historians that he was indeed given to ambitious projects, and, besides trying to transfer the capital, he gathered an army to conquer Khorasan and then disbanded it, sent an illstarred expedition to the Himalayas, and issued token copper coins. One alone among his contemporaries says that he even tried to make leather currency pass as legal tender. Whether Muhammad actually issued leather money or only planned to do so, or whether this was said merely by way of ridiculing his copper coins, we see that it was the image of him as a proud eccentric man that perpetuated itself in the memory of the Hindus of Maharashtra.

The Vijayanagar tradition also gives us a similar picture of the man. We see him objecting because a ray of sunlight one day strikes his eyes while he is dressing himself in a closed room, and then heedless of all sensible advice he starts out with an army to vanquish the Sun. But soon the dust raised by the marching host obscures the Sun, and he inquires what has become of his enemy. He turns back quite satisfied on being told that he has succeeded in conquering him. Was it the memory of the ambitious plan to annex Khorasan or the Himalayas that continued to survive

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

in this form ? Again, we see the Sultan desirous of seeing all the letters of the alphabet figure in his name. Knowing as we do that he coined for himself more titles than his predecessors had done, is it too much to think that this fact must have survived in popular memory in the form of this conceited wish ?

Finaly we see him being told that off the Coromandel Coast there lay "a very big island, the land of which was gold, the stones of whose houses and whatever stones it produced being rubies and diamonds, and in which there was a temple where angels from heaven came down to play music and to dance." He thereupon begins to throw a dam across to Ceylon, and only desists when one of his nobles presents him with a large quantity of gold and precious stones, and makes him believe that it was a tribute from the ruler of the island. Now there is no record of Muhammad ever having personally advanced with an army so far down. It was Malik Kafur who first led the armies of Delhi to Ma'bar or to the far South. This again illustrates how Muhammad's name left so great an impress on Hindu memory as to obliterate those of earlier Muslim conquerors.

The Maharashtra tradition does not say whether Muhammad perpetrated any personal acts of cruelty. But in Vijayanagar he was remembered as the man who used to flay his enemies and prided himself on it by assuming a title to that effect. Here again tradition is not far from the truth, for the Muslim historians record that Muhammad had Gurshasp and some other rebels flayed.

We have already seen that Vijayanagar is kind to Muhammad's memory in tracing its origin to an act of his grace. More than that, it represents him as a holy king, who, as often as he prayed to God, put forth four arms and four hands and was honoured with a shower of flowers from heaven, and who commemorated his exploit in the extreme South by erecting there a temple which became a famous centre of pilgrimage. We have here undoubtedly a reference to the temple of Rameshvaram. Curiously enough Firishta records that Malik Kafur was sent by Ala-ud-din Khalji to reduce Dvarasamudra and Ma'bar, and that he built on the sea coast a mosque

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

which the Hindus later converted into the temple of Rameshvaram. The striking resemblance between the Vijayanagar tradition and Firishta's narrative inescapably suggests that both refer to the same place, only that the Hindu tradition has substituted Muhammad bin Tughluq for Kafur and made him the author of the temple itself. This calls for a re-examination of the generally accepted view that the Dvarasamudra of Kafur's campaigns is Mysore. For the Vijayanagar tradition leads one to think that Dvarasamudra must have lain in the neighbourhood of the present day Dhanushkodi. Firishta in fact, writing in the beginning of the seventeenth century, says : "The town of Dvarasamudra has, I understand, by the encroachment of the sea, been destroyed and now lies in ruins" a tragedy which has been re-enacted in our own days.

There remains the interesting question as to why the Vijayanagar tradition came to regard Muhammad bin Tughluq with religious veneration. Nor is this veneration restricted to the South, for the North Indian Hindu traditions also hold the Sultan in high regard. Now it happens that we find the Muslim writers censuring the Sultan for putting Hindu nobles in positions of trust and for consorting with Hindu ascetics. The liking for ascetics shows a soul turned towards religious quest. The Vijayanagar tradition, which pictures him in an elevated state of prayer with flowers being showered on him from heaven, finds a striking parallel in a passage of Muhammad's fragmentary autobiography. He tells us how, "while I was afflicted with these sad meditations, a breeze of happiness came down on me from the sky where the wind of divine grace blows." It may have been during a stay in South India that Muhammad specially sought the company of Hindu ascetics, so that the Hindus came to believe in his deeply sincere religious quest, and that was the man whose memory they continued to revere.

Bibliography :

Dom João de Castro, *Primeiro Roteiro da Costa da India desde Goa ate Dio : narrando viagem que fez o vice-rei D. Garcia de uoronha em socorro desta ultima cidade. 1538-1539*, ed Diogo Köpke, Porto 1843.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

Chronica dos Reis de Bisnaga, ed. David Lopes, Lisbon 1897.

R. Sewell—*A Forgotten Empire*, London 1900.

Mahdi Husain, *Rise and Fall of Muhammad bin Tughluq* London 1938.

---

2. A New HAIHAYA Family *

(Dr. P. B. Desai, M. A., Ph. D., Dharwar.)

Students of Indian History are acquainted with the royal families of the Haihaya lineage, that ruled in Central India. Researches in South Indian epigraphy have however, brought to light the existance of more families of the same stock in the southern regions, who were apparently connected with their kinsmen in the North.

To mention a few, there were the Haihayas who had settled in the Āndhra areas, known as the Koṇa-Haihayas or Haihayas of Kōṇa-maṇḍala. Turning to the present Mysore State, we come across a number of chiefs of the Ahihaya, i. e., Haihaya stock, administering certain tracts in the Sēḍam and Chitāpur talukas of the Gulburga District from their strongholds at Allūru and Handarki. All these rulers bore the characterstic title Māhishmatīpuravarādhīśvara,[1] i. e., 'Lords of the foremost city of Māhishmatī, reminiscent of their original home.

In 1954, at the invitation of the former Hyderabad Government, I toured in the Raichur District of the present Mysore State and made a good collection of epigraphs. One of these is an inscription from Mānvi, the headquarters, of the taluka of the name in the above district. The epigraph, dated 1052 A.D., refers itself to the reign of the Western Chālukya king Sōmēśvara I and introduces his feudatory Rēvarasa as governing the province of Eḍedoṛe two thousand, which comprised the land between the rivers, Kṛshṇā and Tuṅgabhadrā. This

---

* ४५ वें संमेलन, श. १८८० (इ. १९५८)

1. For details see *Jainism in South India and Some Jaina Epigraphs*, pp. 214-15, wherein I have discussed this topic elaborately.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Rēvarasa belonged to the Haihaya stock as indicated by the two charateristic titles, Māhishmatīpuravareśvara and Kārtavīryakulatilaka occuring in his praśasti.

The inscription further describes Rēvarsa as Mummuṛi-Koṅkaṇiga-baḍavānala (i. e., the submarine fire to the ocean of Mummuṛi, the ruler of Koṅkaṇa), Dhārānagara-bhayaṅkara (i. e., a terror to the city of Dhāṛā) and Paṇāyakutūhala (i. e., a subject of admiration for the residents of Paṇāya). These epithets which are significant, reveal certain historical events which go to show that Rēvarasa took a leading part in the campaigns of his overlord, directed against his adversaries. One of them was Mummuṛi who must be the same as Mummuṇi, the Śilāhāra ruler of Northern Koṅkaṇa. Another appears to be the Paramāra king Bhōja whose capital, the city of Dhārā, was stormed by the Chālukya forces in the early years of Sōmēśvara I's reign, according to Bilhaṇa's Vikramāṅkadevacharitam and the epigraphic records.[2] The third of the above epithets seems to allude to a similar exploit of Rēvarasa against the Śilāhāras of Karāḍ, who were in possession of the renowned fort of Panhālā, mentioned here as Paṇāya, to be derived from the Sanskrit Parṇālaya.

Rēvarasa, as we have seen, was the governor of a major province in the Chālukya kingdom, and he must have been an influential noble and trusted general. The Mānvi epigraph discloses for the first time that the Haihaya house to which he belonged had their authority extended over the doab area in the Raichūr District. Thus the family of Rēvarasa is one more branch of the Haihayas holding sway in the region of Raichūr.

---

2. D. C. Ganguly, *History of the Paramara Dynasty*, pp. 92-93.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

३ वीरमाल सीवाजीचा *

(अफजलखानवधाचा पोवाडा)

(श्री. ना. व. जोशी, विजापूर)

आजपर्यंत अफजलखानाच्या वधावर अज्ञानदासाचा एकच पोवाडा माहीत होता. आज दुसरा एक जुना पोवाडा उजेडांत आणतांना मला अत्यंत आनंद होत आहे. हा कोणा फतनजी शाहिरानें लिहिला आहे. त्यानें आपली परंपरा अथवा रचना-काल पोवाड्यांत दिला नसल्यानें त्याचेविषयीं कांहीं माहिती देतां येत नाहीं. पुढेंमागें या पोवाड्याची आणखी एखादी नक्कल मिळून अथवा याच्या आणखी कांहीं कृति मिळून याच्याविषयीं कांहीं चरित्रविषयक माहिती मिळाल्यास हवी आहे.

मला हा पोवाडा ज्या वहींत मिळाला ती वही बरीच जुनी म्हणजे निदान दोनशे वर्षांची तरी असावी. ही वही संगमनेर जिल्हा अहमदनगर येथें एक गळाठा पाहात असतां मिळाली. या वहीची आद्यंतांचीं बरीच पानें गेलीं आहेत. तींत हरदास या नांवाच्या नवीनच ज्ञात होणाऱ्या कवीची व त्याच्या शिष्यांची रचना विशेषत्वानें आहे. या पोवाड्याची ही नक्कल कांहींशी अशुद्ध आहे व कांहीं ठिकाणीं या वहींतील पानें कुजून फाटलीं असल्यानें कांहीं शब्द वा अक्षरें गेलीं आहेत. तरीपण पोवाडा बराच सुस्थितींत मिळाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. नकलेचें अक्षरहि बरेंच सुवाच्य आहे.

लेखनांतील विशेष येथें नमूद करणें जरूर आहे, सर्व ठिकाणीं 'ख' चे ऐवजीं 'प' आहे. 'ई' हें अक्षर मोडी ई प्रमाणे आहे. 'ळ' जुन्या वळणाचा आहे. शब्द-लेखनांत कांहीं वैशिष्ट्य आढळतें. 'दुर्ग'चें ऐवजीं 'दुरुग', 'पुरंदर'चें ऐवजीं 'पोन्हेधर', 'बंदर'चे ऐवजीं 'वंदर', 'शिरवळ'चे ऐवजीं 'सीर्वळ', 'शहर'चे ऐवजीं 'स्याहार', 'त्याचे' ऐवजीं 'त्याहाचे' इत्यादी. अनेक ठिकाणीं शब्दांतील र हें अक्षर गाळून त्याच्या पुढील अक्षरावर रेफ दिलेला आढळतो. उदाहरणार्थ 'त्यावर डंक' चे ऐवजीं 'त्यावर्डंक', 'वर ठेविला' चे ऐवजीं 'वर्ठेविला' असा लेखनप्रकार दिसतो. 'सत्य' चे ऐवजीं 'सत', 'दिले' चे ऐवजीं 'दिल्हे' 'लिहिली' चे ऐवजीं 'लेहली,' 'आज्ञा' चे ऐवजीं 'अगन्या', 'फौज' चे ऐवजीं 'फऊज', 'कमली' चे ऐवजीं 'कर्मली', 'चतुर' चे ऐवजीं 'चत्रु' हे लेखनविशेष पोवाड्याचा जुनेपणा दाखवितात 'त्याचे म्हटले पाहिजे केले' हा वाक्प्रयोग जुनेपणाचाच निदर्शक आहे.

अज्ञानदासाचा पोवाडा शिवकालांतच रचला गेला असणें बरेंच शक्य आहे.

---

* ५५ वाढदिवस श. १८८७ (इ. १९६५)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्याच्या शेवटच्या चौकांत तसा उल्लेखहि आहे. फतनजीनें हा पोवाडा अफजलखानाच्या वधानंतर कांही वर्षे लोटल्यावर लिहिला आहे. तो म्हणतो, 'मागील मजकूर झाला स्याहिर फतनजी बोले'. किती वर्षानंतर लिहिला हें कळण्यास प्रत्यक्ष साधन नाहीं. परंतु भाषेवरून तो इ. १७०० च्या आगें मागें लिहिला असणें अगदीं शक्य आहे.

फतनजी शाहिरानें या पोवाड्यांतील विधानें फार साक्षेपानें केलेलीं दिसतात. उदाहरणार्थ, तुळजापूरची, भवानी व पंढरपूरचा विठोबा अफजलखानानें फोडल्याचें अज्ञानदास सांगतो, तसें फतनजी सांगत नाहीं. अफजलखानानें विजापूर सोडल्यावर तो वाईस आला एवढेंच तो सांगतो. भवानी व विठोबा लपवून ठेविले होतेच. अफजलखानास शिवाजीविरुद्ध पाठविण्यास पातशाहजादी कारण होती असें फतनजीनें स्पष्टपणें लिहिलें आहे. शिवाजीनें 'जागा वडलाचा'=कोंकण काबीज केल्यानें पातशाहजादीस वाईट वाटलें व रागहि आला. 'बडी साहेब बोले पातस्याजादीः तो चोर आमचा' असें फतनजी लिहितो.

शिवाजी महाराजांचें स्वभावचित्र फतनजीनें अत्यंत मार्मिकपणें रेखाटलें आहे, त्यांचा चाणाक्षपणा व संयम त्यानें अफजलखान व शिवाजी यांच्या संवादांत फार उत्तम रीतीनें दाखविले आहेत. अज्ञानदासानें शिवाजी महाराजांचे तोंडीं अफजलखानास उद्देशून खालील वाक्यें घातलीं आहेत 'तूं तर भटारनीका छोरा' व 'अबदुल जातका भटारी', 'तुमने करना दुकानदारी'. हे शब्द शिवाजी महाराज उच्चारतील काय व उच्चारले नसतांना शत्रूला उद्देशून शाहिरानें घातले तर सहन करतील काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

अज्ञानदासानें म्हटलें आहे कीं, महाराजांनींच अबदुलखानाचें शिर कापलें, संभाजी कावजीनें फक्त भोयांचे पायांना जखमा केल्या व पालखी पाडली. पण फतनजी सांगतो कीं, अफजलखानावर 'संभाजी धांवला आपुन पालखीतून वढुन कापली मान.'

या पोवाड्याचा सर्व अभ्यास येथें अभिप्रेत नाहीं. फक्त या नव्यानें ज्ञात झालेल्या पोवाड्याची तोंडओळख करून देण्याचाच उद्देश आहे. अज्ञानदासाचा एकच एक पोवाडा आजपर्यंत माहीत होता. त्यांत आतां आणखी एका जुन्या पोवाड्याची भर पडत आहे व तो आपल्यासारख्या इतिहाससंशोधकांच्या पुढें अभ्यासार्थ ठेवीत आहे.

वीरमाल सीवाजीचा

प्रथम नमन माझें नीरंजन नीजरूपालाः ॥
नमली माहासरस्वती माझी वीनती सतीगुरुलाः ॥
सीकराचा संभु प्रसन सीवाजी भोसल्यालाः ॥
गाईन वीरमाल तयाचा मारले त्याने अबजलखानालाः ॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सीवाजी दलभंजन त्याने मारला अबदुलखानः ॥
गड कोट राज्याचे सांगीन चढें चडः ॥
पोन्हेधर कोंडाना रोहेडा तुगी तीकाना ईसापुर्उडा.
लोहोगडास नाही जोडा माहा अवघडः ॥
परबळ पेबनार दुरुग माहोली, कोहोज करनाळा भोर पाली.
खेडदुरुग अन जाउली परतापगडः ॥
तळे घोसाळे सुर्गड कंगुरी अनसवाडी धनगड कुरुड राहेरि.
चंदना केळना तोरना क्वारि जा राजगडः ॥
काबीज केली बीलात कल्याण भीवडी च्यउल वंदर
वाईदेस कराड इंदापुरः ॥
हलठन मानदेस सीर्वळ नीरेचे तीर.
सुपे सासवड कडेपठारः ॥
अवरंगस्याचा मुलुक लुटला स्याहार जुनेर.
झाला मोगलासी दावेदारः ॥
उतरला कोंकनात नाई त्यांवर केली वाहार.
त्याचे मोडले घरोंघर : : ॥ १ ॥
मोडले माहाल माब्या घर खालची माडी केली वर.
त्यावर्डक होता फार सीवाजीचाः ॥
खबर आणिली मुलां अमदाने पातस्याजादीणें दीले गन्हाने.
कोकन लुटले सीवाजीने जागा वडलाचाः ॥
माझे सा [गणे] करा आधी. त्यावर धाडावी नामजादी.
बडे साहेब बोले पातस्याजादी. तो चोर आमचाः ॥
मग पाचारला भुवाबल. त्याचे नांव खान अबदल.
सीवाजीवर केली चाल. वीडा उचलुन पैजेचा : : ॥
पैजेचा वीडा अबदलखाने उचलीला. सवे घेतले कोन कोनाला : ॥
बाजी घोडपब्या नाईकजी पांढऱ्याला. अकुसखान मबाजी भोसलाः ॥
सीदी सभे सीदी हीलाल मुसेखा रोहेलाः ॥
चौदा हजार घोडा गनतीलाः ॥
कुच करून मग तो वांईदेसा आला : : ॥ २ ॥
वांईस आले दलभार. आईकली राजाने खबर.
खान आले आम्हावर. कैसें करावें : ॥
राजा बोलला आपुनी. खानासी भांडु नका कोन्ही.
ते आहेत आमचे धनी. सत मानावे : ॥

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्ही खानासी करूं सला. गड कोट मुलुक देउं त्याला.
जाइन पातस्यासी भेटायाला. खानासवें : ॥
हस्यम होतें गडावर. तयास धाडली खबर.
आमचा घ्याया समाचार. जाउलीस यावे ॥ : : ॥
आर्धाले हस्यम गडोंगडचें पाचारीलें.
महाराजे जाउलीस गेले : ॥
म्याला सीवाजी म्हनुन अबजदुलखान बोले.
सीदी हिलाल पुन्यास धाडले : ॥
सीदि सभे नामजाद कोकनामधी केले.
कील्यासी भ[व]तां काहिं न चलेः ॥
जाउलीस गेला सीवाजी. जासुद खबर घेउन आले : : ॥ ३ ॥
खबर जासुदाने दिल्ही. बीकट जागा बहु जाउली.
भोवंत्या कळंकाच्या जाळि. लागले बनः ॥
आकासी लागले साव सावर्डे. चहुंकडे रान अवघे कडे.
तेथें भांडतां गाठ न पडे. नाही मईदान :॥
अबदुलखाने केली मत. सीवाजीसी करावी सोहलत.
मग करावे त्याला दस्त. कपट करूनः ॥
जोच मुदा अबदुलखानाचा. तोच मुदा सीवाजीचा.
जाउलीस सांपडता यकदांचा. तर जाउंना देतुं यथुनः ॥ : : ॥
ईतका वीचार राज्याने आपले मनी केला.
कळु नाहि दीधले कवन्याला: ॥
लीहली कितावत मग हेजीब पाठीविला. तुम्ही खानासी करा सला:
तुम्हा वेगळे आनीक कोन्ही नाहिं आम्हाला:
तुम्ही मनी कोप कां धरीला: ॥
स्याजी राज्यांस तुम्हासी भाउपत. तुम्ही चुलते व्हावेत आम्हाला : : ॥ ४ ॥
खानने हेजीबासी सांगीतले. पातस्याने आम्हासी पाठीविले.
त्याचें म्हनले पाहीजे केले. मोडेना बोलः ॥
त्वां मनचे कपट टाकावे. आम्हासी भेटाया यावे.
पातस्यापें नेईन आपल्यासवें. देइन कउलः ।
पातस्याजादी बडेसाहेब. आमचा मोडत नाहीं जाब.
ऐसा आहे माझा परताब. चालो तो बोलः ॥
अमझा दील्ही हेजीबाला. आपला हेजीब सवे दील्हा.
जा तुम्ही घेउन या राज्याला. दाखउन कउलः ॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अबदुलखानाचा हेजीब आला सीवाजी पासी.
कउल दाखवीला राज्यासीः ॥
डोईवर्ठेवीला कउल मान दील्हा तयासी.
अदरमान केल्हा हेजीबासीः ॥
तेथे येतांबहु भें वाटतसे आम्हासी.
येथेच आना खान साहेबांसीः ॥
लेहली कितावत मग दीधली हेजीबासी.
हेजीब आला खानापासी : : ॥ ५ ॥

खानाजवळ बोले हेजीब. तुम्ही आयका खानसाहेब.
सीवाजीने लीहिला जाब वीनती आयकावीः ॥
तुम्ही वडील आम्हासी खरें. आमचें करूं पाहाता बरें.
येथे यउन सांगा वीचारे. अगत्या द्यावीः ॥
तुमचें आमचें येक मन. येथें नाहीं दुजेपन.
कुरुपा करावि येउन. बुध सांगावीः ॥
मग अबजलखान बोलला कुच करा उठा चाला
मोहे...जी पाठवीला. खबर राजीहेसी...गावीः ॥ : : ॥

उठला अबजलखान मनी धरूनी कपट.
त्याने धरली जाउलीची वाटः ॥
पुढे चालेत हती घांटाचे घनघनाट.
पाटीसि फउज चाले कटः ॥
माहा सायासे उतरला रडतोडीचा घाट.
तेथे होतें सीवाजीचें भेटः ॥
राज्याने घातले मांडव बरवां जागा पाहुन तळवटः : ॥ ६ ॥

मांडव घालुन केली हवा. आनला हरजीनसी मेवा.
तर हा खान साहेबांसि न्यावा. राजा बोलेः ॥
सीर व्हाहुनी धाडीला माल आनीक पालकी दिल्ही सुकपाल.
त्यास देखुन खुसी हाल. खान झालेः ॥
रात्र कर्मली चत्रु पाहार. तर वर उगवले दिनकर.
खानने पाचारले माहालदार. धाडुन दीले : ॥
महालदार म्हनेत सीवाजीला. खान पाचारीतात तुम्हाला.
राजा म्हने येतों चला. पुढे लावीले : : ॥
येतां यता झाला तीपाहार. खान म्हने कां लावीला उसीर.
भाउबंद सकळ मीळाले [स] हदर. तथा सागीतला वीचार : ॥

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चाळीस हजार पायेंदळ ठेवलें रानामीतर.
मत मन्हाव्याची थोर : ॥
जईं मी अगाज करीण परताबगडावर.
तईं तुम्ही घाट धरा वरजोर : : ॥ ७ ॥
तुम्ही बळकट धरा घाट. मी घेतों अबजलखानाची भेट.
त्यास आपल्यास जीवा साट. मीं करीन : ॥
गडोंगड नाईक हस्यम. तयासी सांगा माझा रामराम.
तुम्हास स्याजीराज्यासि काम. जातों नीरउन : ॥
मग पाचारीले ब्राह्मनाला. दान दक्सेना दीली त्यांला.
मग संकळोक घानला. पुसलें वचन : ॥
भटें सागीतला महुर्त. राजे सिर व्हावें तवरीत.
होउनी येसील येसवंत. सत जान : : ॥
सोयेरे धायेरे सकळ बीनवीति सेवक.
जाउं नये अबजलखानास मोक : ॥
अस्याच गति त्याने ठकीलें करनाटक.
मोटा अबजलखानाचा धाक : ॥
राजा म्हने तुम्ही भेउं नका सकळिक.
मी आहे तयाहुन आदीक : ॥
घेईन त्याचा परान तर मी संभुचा सेवक : : ॥ ८ ॥
राज्याने कीस्मवत आवीलि बरी.
सीले लेउन केली वरजोरी. झग्यावर डगला मुसेजरी. राजा ल्याला: ॥
डोईस टोप वर लपेटा. माहालदारायें दीधला पटा.
हाती बिचवा सत्रकाटा वागनक त्याला: ॥
सीवाजीने पाठवीला माहालदार. सांग जा खानासी खबर.
तुम्हाकारने सदर. आरंब केला: ॥
तुमचे आमचे पांच जन. येथे नाही आनखासी कारन.
तर मी तुम्हासी भेटेन. राजा बोलीला : ॥
सीवाजीचा माहालदार आला खानापासी.
तसलीम करून उभा सभेसी : ॥
महाराज्याने वीनती सागीतली तुम्हासी.
सदर सवारली तुम्हासी: ॥
तुमचे आमचे पांच जन कारन नाहि आनखासी.
तर मी भेटेन तुम्हासी: ॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मऱ्हाट्याची मत न कळे अबजल खानासीः ॥ ९ ॥
मग बोलला अबजलखान पाचारीले भोई पालखी आन.
येक पेसवा दुसरा पठान. सर्वें घेतले : ॥
पालखी आनवीली सुकपाल. त्यामधी बैसला उभवाबल.
माहालदार उडवीति रुमाल. पांच जन ज[हा]ले ॥
पहिला बंक अनामीकाचा दुसरा बंक तो भुयाचा.
तीसरा जागा तों सीपायाचा. महालदार बोलेः ॥
चवथा कारकोनाचा दपतरः पांचवि राज्याची सदर.
उजड पडला तयावर. पाहो लागले : : ॥::॥
जिकडे पाहे तीकडे अवघा लखलखाट.
जरतार झमकती तगटः ॥
पातस्याही सदरा करितो अईसा मऱ्हाटा धीट.
खानाने मनि धरीला कपटः ॥
पालखीत बसुन सिवाजी येत होता नीट.
पढलि अबदुलखानावर दीस्टः ॥
पालखीतुन उतरून सनमुख उभा राहेला निट :: ॥ १० ॥
राजा उभा राहेला नीट, अबजलखान करी दाटादाट.
राजा हडती घालुन दीस्ट. धरलें मतः ॥
सीवा कायें आहे तुझेच नावं
गुमान करितोसी बहु. खातोस पातस्यायाचे गावं.
अवघी विलातः ॥
गड त्वां घेतले पास्यायाचे. तर तुला कैसे जीरतील. त्याचे,
ठाव ना उरेत तुरेत तुमचे. पिरथीमीतः ॥
वाईट तुं चीतले आपल्याला. दावा पातस्यासी लावीला.
मग महाराजा बोलीला. जोडुन हातः ॥ : : ॥
हात जोडुन सिवाजी बोलला आपुन. अ... द्याल तर मी सागीनः
सरदेचा मुलुख तुमचा तर म्या केला जतन.
फउज मोगलासी बांधोनः ॥
मोगोल गेलेत काबीज कराया कोकन.
त्यापासुन घेतलें सोडउनः ॥
आनला माल दील्हा सीपायासी वाटून.
डोंगर म्या गड केले बांधोन : : ॥ ११ ॥
डोंगर बांधोन केले कीले. पैके पदरचे लावीले.
कैसे देउं राजा बोले. मी तुम्हालाः ॥

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गड जर देईन पातस्यायासी. साहेब काये देतील आम्हासी.
परमाना असेल तुम्हापासी. पाहो द्या मलाः ॥
पेसवा बोलला अबजलखानाचा.
परमाना काई करसिल पातस्याचा.
माथ्या हात घे खानाचा. घेने तुलाः ॥
जाये तुं खानासी सरनं. डोई पोटांत घालुन.
सळ अन्याव घे मागुन. पेसवा बोलिला : : ॥ : ॥
राजा म्हने तुमचे थोर केले अन्याव.
म्या राखले तुमचे ठावः ॥
खान आन आम्ही आहुं पातस्यायचे उमरावः
तुम्ही काये बोलतात गो[वि]दरावः ॥
परमाना असेल पातस्याचा. सीका मजला दाव.
गड अन मुलुक देईन ठावः ॥
वाईट लागले अबजलखानाला.
त्याने मनी धरला सामाव :: ॥ १२ ॥
पेसवा बोलला मने भाव. तुम्ही खानासि भेटावं.
मनाचें कपट टाकुन द्यावं. करा दूरः ॥
फीरंग घ्या खानाचे हातची. संका नाही गेली मनाची.
अकळ बुद मन्हाट्याची. वीचार्थोरः ॥
खाने माहालदार पाचारीला. फीरंग देऊन वेगळा केला.
राजा संनमुख चाललाः भेटी सामोरः ॥
धीट पाट नेहट सीवाजी राजा. बोलने बोले बरव्यां वोजा.
वैरयास न म्हनावे माझा. पाहे चौफेरः ॥
सीवाजी अबजलखान भेटले दोघे जनः
दोन्ही धुरा आहेत. संगीनः ॥
पोटांत डोई घातली खानाने धरला गवसुन.
कटारा मारलि वदुनः ॥
जीन्हेवर न चले काहिं ठाईच आला लेउन.
मग वचकला अबजलखानः ॥
राजाने हीचकली संगीन. बैसक घेऊन.
बीचवा [मार] ला वरम पाहुन : : ॥१३॥
वडला वाघनखांचा हात. फुटलें पोट झाला घात.
खानने फीरंग घेउन सावचीत. हात टाकलाः ॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राज्याने घेतला पव्यावर वोढुन मारी दुसरा मार.
पालखी आनवीली लवकर खान चालला : ॥
राजा म्हने संभ्या धावं. वैरयासी नको जाउं देउ.
काप सीर तुं नको भेउ रे कवन्यालाः ॥
संभाजी धांवंला आपुन. पालखीतुन वहून कापली मान.
तीकुन फीरला तो पठान. घायास आला :: ॥
सात पांच मीळुन पडले पठानावर.
त्याचा मारून केला चुरः ॥
राजा म्हने ऐसा जनमेना आनीक सुर.
यास मुठीमाटी द्या लवकरः ॥
मारला अबजलखान कापला त्याचा सीर.
घेउन गेला परतापगडावरः ॥
गडावर जाऊन केले भांडयाचे भडमार.
हसमाला तेच झाली खबरः ॥
हसमास खबर झाली सहीं, ईजेर्दे बांदल चंदर राई.
क[रून] कटकावर धबधाई [उ]ठली लाटः ॥
अवध्या कटकास घातला वेढा.
घायास येईल तो हान पाडा.
हत्यार टाकील त्यासी सोडा. द्यावि वाटः ॥
पठान मुसेखा रोहेला. आपले जमेतसी तयार झाला.
तर तो मारीत नीघाला. वेघला घाटः ॥
सरजा सीवाजी दलभंजन उमराव धरले पांच जन.
सकळ कटक लुटून केले. चटः ॥
वाईस गेला रोहेला मुसेखा पठान.
तेथे होतो फाजीलखानः ॥
त्यास घेऊन पळाला रातचा दीस करून.
गेला वीजापुरा घेउनः ॥
रडे पातस्याजादी हे खबर आयेकुन.
सिवाजीने मारला अबजलखानः ॥
नामजाद केला रुस्तमजमा सबे दीघला फाजीलखानः ॥ १४ ॥
फाजीलखान रुस्तमजमा. त्यांनी बरवा केला सामा.
केल्या वीजापुरीहुन धुमा. चाले भारः ॥
वाईस सीवाजी आला. गनती मोहो...तला.
मग तो मारीत चा[लला त्या]चे सामोरः ॥

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोहीस झालेसे भांडन. घातले कोठात मारून.
ते दारवठे देउन बसले वरजोरः ॥
जासुद पनाळाहुन आला. राजा म्हने येंथन चला.
येकायकीच वेधला गडावर : : ॥
घेतला पनाळा सीवाजी झाला स्वार.
वेढुन बसला सीदि जोहरः ॥
अवरंगाबादीहुन चालले मोगलांचे दळभार.
नबाब सास्ताखा सुबेदारः ॥
घेतले सुपें सासवड जाळला सिवापुर.
पुन्यामधी राहेले महीने च्यारः
उतरला गडिहुन राजा चौकीस भांडन झालें थोर.
राजगडा आले ते राजेस्वरः ॥ १५ ॥
सोडला पनाळा राजगडास राजे आले.
आवासाहेब जीजाई हीं आहे माहा आनंदें भेटले.
भांडु मोगलासी मोगल मुलुखात आलेः
मागील मचकूर झाला स्याहिर फतनजी बोलेः ॥+

---

४ कांहीं अज्ञात प्राचीन कवि.*

(श्री. ना. ब. जोशी, विजापूर)

१९६४ च्या डिसेंबरांत संगमनेर येथें कांहीं कामानिमित्त गेल्या वेळीं पोथ्या वगैरेंचा एक गळाठा पाहावयास मिळाला. तो पाहात असतां आद्यंतांची बरीच पानें फाटलेलें एक बाड पाहावयास मिळालें व कांहीं सुटी पानेंहि मिळालीं. एक दोन लहान प्रकरणांच्या पोथ्याहि मिळाल्या हा गळाठा नीट तपासतां त्यांमध्यें आजपर्यंत अज्ञात अशा कांहींचें लेखन पाहावयास मिळालें. लेखन पद्यांत आहे. त्यापैकीं कांहींच्याबद्दलचीं टाचणें आज आपल्यापुढें ठेवीत आहे.

वर ज्या बाडाचा उल्लेख केला ती एक उभी वही असून तिची आद्यंतांचीं निदान पन्नास पाऊणशें पानें तरी नष्ट झालीं आहेत. उरलेल्या भागामध्यें पांच सहा कवींचीं

+ वरील नकल करतांना ष चे ऐवजीं ख केला असून स्पष्ट असलेल्या चुका फार जरूर तेथेंच दुरुस्त केल्या आहेत. फाटलेल्या जागीं समासांत शक्य तीं अक्षरें वा शब्द सुचविले आहेत. मूळ शक्य तों जसेंच्या तसें ठेविलें आहे.

* साधारण पाक्षिक सभा ५, श. १८८७ (इ. १९६५)

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पदें व छोटीं प्रकरणें आहेत. हीं मूळ लेखकाच्या हातची वही नसून ती निदान चार पांच निरनिराळ्या नकलकारांनीं केलेल्या नकला आहेत. हरदासाच्या कृतींना त्यांत प्राधान्य असून त्याच्या पुरुषोत्तम नांवाच्या शिष्याचे लिखाणास त्याच्या खालोखाल जागा दिली आहे. याच वहींत शाहीर फतनजीचा अफजलखानाच्या वधाचा पोवाडा आहे. या पोवाड्याचें स्वतंत्र टांचण सादर केलें आहे व पोवाड्याची नकलहि त्या-बरोबरच दिली आहे.

ही वही निदान दीडशें ते दोनशें वर्षांची तरी जुनी असावी असें वाटतें. या वहींत मध्येंच रिकाम्या जागेंत पांच सहा ठिकाणीं मोडींत आधुनिक वळणाच्या व निराळ्या शाईत कित्याचा मजकूर असून एका पानावर कार्तिक शक १७५१ चा निर्देश मोडीमध्यें केलेला आहे. वहींतील मूळ मजकुराच्या अक्षरांचें वळण व लेखनपद्धति यांचा विचार करतां ती वही शक १७०० च्या सुमाराची असावी असें दिसतें. तीमधील मजकूर अर्थात् त्याच्याहिपेक्षा जुन्या काव्यांच्या नकला आहेत. या सर्व गोष्टींचा सामध्यानें विचार करतां वहींतील कविता निदान श. १६२५ ते १६७५ च्या दरम्यानच्या असाव्या असें अनुमान केल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. या वहींतील सामुद्रिक हें प्रकरण कोणा येघोजी गडगावन यानें लिहिलें असून तें गीत ऐकणाऱ्यांत रामदास होते असें म्हटलें आहे. हे रामदास प्रसिद्ध रामदास स्वामीच असतील तर त्या प्रकरणाची रचना शक १६०३ मधील अथवा त्याचेहि अगोदरची मानावी लागेल. असो.

नकलकार अशिक्षित दिसतो. त्यामुळें भाषेच्या व शब्दलेखनाच्या बऱ्याच चुका आढळतात. मात्र एकंदर कवितांचा विचार करतां त्या हरदासाच्या परंपरेंतील लोकां-नींच नकल केल्याचें दिसतें. पूर्ण वही हातीं लागली असती तर एक अज्ञात परंपरा व बऱ्याच अज्ञात काव्यकृति उजेडांत आल्या असत्या.

या वहींतील सर्व प्रकरणें व कवि यांचे संबंधीं न लिहितां फक्त हरदासांसंबंधींच अगदीं त्रोटक माहिती व त्याच्या कवितांची ओझरती ओळख करून देणार आहे.

हरदास अथवा हरिहरदास यांच्या चरित्रपर अशी कांहींच माहिती मिळत नाहीं. यांच्या लहान मोठ्या सर्व ग्रंथांचा कांहींच ठावठिकाणा संशोधकांस अद्याप तरी लाग-ल्याचें दिसत नाहीं. श्री रामदासी संशोधानाच्या ३९ व्या बाडांत हरिहरदासाच्या पवन-विजयाचा उल्लेख असून त्यांतील ५ व ६ अशा ओव्या तेथें दिल्या आहेत. पण त्या या हरदास वा हरिहरदासाच्या वाटत नाहींत. या वहींत कोठेंहि नृसिंहास नमन नाहीं. श्री. ढेरे यांना एका हरिहरदास मालोची पवनविजयाची त्रुटित पोथी मिळाली आहे. प्रस्तुत बाडांतील हरदास वा हरिहरदास वेगळा दिसतो. या वहींतील हरदासाची रचना पाहतां त्यांत एकहि ओवीबद्ध प्रकरण नाहीं. या बाडांतील बहुतेक सर्वच कवि व त्यांच्या कृति अज्ञात आहेत. असें म्हणण्याचे कारण आतांपर्यंत प्रकाशित झालेल्या सूचींत यांचे निर्देश नाहींत. या बाडांतील कविता वाचून एक स्पष्ट कळतें कीं हरदास हा एक संत कवि होता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तसाच शाहीरहि होता. या हरदासाच्या रचनांची आतां त्रोटक माहिती देत आहे. त्याचा हेतु संशोधकांच्या काव्याकडे लक्ष वेधण्याचा आहे.

१ अजपा पिंडीचीं ९ पदें पानें फाटल्यानें त्रुटित.

२ अजपा ब्रह्मांडीचीं ११ पदें त्रुटित पानें, पण वरच्यापेक्षां जास्त सुस्थितींत.

३ मुंगीचें पद ४ पदें यांत अखेरचा पारमार्थिक अनुभव आहे

" अनेक मार्ग अनंत पंथः ॥ वीवेक विवर अर्थ परमार्थः ॥
समरस वेद शास्त्रें गरंथः ॥ हरदास म्हणे समर्थ सतिगुरुराजाः ॥ ४ ॥

४ सुलतान का सफर, ५४ हिंदी पदांचें प्रकरण.

" बोले हरदास स्याहिरः पुरसोतमपीर. दस्त पंज्या दीयेः ॥

५ गोपीवस्त्रहरण. लावणीच्या चालीचीं २९ पदें.

यामध्यें चंद्रवदना गवळण नायिका आहे. ती श्रीकृष्णास वश न झाल्यानें वस्त्रहरणाचा प्रसंग उद्भवला असें यांत दाखविलें आहे. काव्य उत्तम आहे.

६ राधारुक्मिणी संवाद ११ पदें.

रुक्मिणी शृंगार करून श्रीकृष्णाची मार्गप्रतीक्षा करीत असते. पण तो वृंदावनांत गेलेला लवकर येत नाहींसें पाहून ती राधेस त्याला बोलावून आणण्यास पाठविते. राधा कांहीं कालानें परत येते. राधेकडे पाहून रुक्मिणी तिला छेडते. असा प्रसंग यांत वर्णिला आहे. काव्य फार बहारीचें आहे.

७ अनसूयाआख्यान १८ पदांचें. यांत दत्तजन्मकथा आहे.

८ अंगद शिष्टाई. दोन प्रसंग. पहिल्यांत २५ पदें व दुसऱ्यांत ३२ पदें.

" एथन सुंदरकांड संपले : मग येउधा (युद्ध) कांड आरंभलें: जे कां वालमीकें कथीलें: तें म्हणे हरिहरदासः ॥ ३२ ॥

९ रामकीर्तन. यांत रामरावणयुद्धाची कथा ३० पदांत वर्णिली आहे. कवीनें रावणाचा वध न घडवितां तो युक्तीनें पळून गेल्याचें दाखविलें आहे.

" न साहवे सेन्नमार भेणे मुरडला लंकापतीः ॥
केली माव पळाला राक्षेसः माने परतले आदी पुरुसः ॥
म्हणतसे हरदास आइका रामकीर्तणः ॥ ३० ॥"

या आख्यानांत वाल्मिकी रामायणापेक्षां कांहीं निराळी कथा आढळते.

१० निराकाराची खूण= ११ पदांचें प्रकरण. यांत स्थूल सूक्ष्म विचार सांगितला आहे व शेवटीं म्हटलें आहे.

" अहीसी सांगितली येदांतील खुनः ॥
आईका हो सुरतेनो तुम्हा सांगितले गुजज्ञानः ॥
म्हणे पुरुसोत्तम हे काय नीराकाराची खुणः ॥
म्हणे हरिहरदास लटका सांडावा अभीमानः ॥ "

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निराकाराची खूणहि दाखवितां येत नाही. सर्व अगम्य आहे. त्याचा फक्त अनुभवच घ्यावयाचा आहे. शब्द स्तब्ध होतात. हें कवि आपल्या शिष्यास–पुरुषोत्तमास सांगत आहे.

११ दिवा=२ पदें. ज्ञानाचा दिवा लाऊन निजवस्तु शोधा असें यांत सांगितलें आहे.

येथवर हरदासाच्या कवितांची ओळख करून दिली. आतां आणखी एका अज्ञात कवीची, छंदोबद्ध रचना करणारा म्हणून कवि म्हणावयाचे इतकेंच, ओळख करून देतों. तो म्हणजे 'श्रीधर'. हा प्रसिद्ध श्रीधर ब्रह्मानंदापेक्षां वेगळा आहे.

याचा कुंडार्णव हा छोटा ग्रंथ मिळाला आहे. हा ग्रंथहि संगमनेर येथील गळाव्यांतीलच. हा ग्रंथ आपण अनेक ग्रंथांतील व्यवस्था पाहून लिहिला असल्याचें कवि सांगतो. यज्ञादींच्या करितां कुंडें कशीं तयार करावयाचीं, त्यांचे आकार कसकसे असावे, मोजमापें काय प्रमाणांत असावीं वगैरे विषय यांत आहेत. त्याचप्रमाणें यज्ञादींच्याकरितां मंडप, त्यांची रचना वगैरेंची सविस्तर माहिती तो या ग्रंथांत देत असून हेमाद्रि वगैरेंचीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ प्रमाणें देतो. ग्रंथ १९४ श्लोकांचा आहे.

या ग्रंथकाराने आपली माहिती दिली आहे ती अशीः––

श्रीरामभट्टात्मज श्रीरघू जो शिवार्चनी तत्पर सर्वदा जो ॥ १९३ ॥
त्याला असे पुत्रहि कृष्णभट्ट तत्पुत्र नागेशहि सर्वश्रेष्ठ ॥
तत्पुत्र श्रीसूर्यहि वत्सगोत्री तत्पुत्र जो श्रीधर अग्निहोत्री ॥
तेणे असे मंदमतीस केला संपूर्ण कुंडार्णव सिद्ध जाला ॥ १९४ ॥

या माहितीबरोबरच त्यानें आपलें गांव रचना शक वगैरे माहिती दिली असती तर बरें झालें असतें. पण त्यानें ती दिली नाहीं त्याला काय करणार!

आतां आणखी एका कवीच्या एका छोट्या कवितेविषयीं लिहून ही टिप्पणी पूर्ण करतों. हें एक कोणा आनंदसुत मुद्गलानें लिहिलेलें १७ श्लोकांचें रुक्मिणीस्वयंवर आख्यान आहे. रुक्मिणीस्वयंवरावर नवनवीं लहान मोठीं काव्यें उजेडांत येत आहेत. त्यापैकींच हें एक आहे. याचा रचनाकाल अथवा कवीसंबंधींची कांहीं माहिती त्यांत नाहीं. पण मी मुद्दाम येथें याचा निर्देश करीत आहे तो एका कारणाकरितां. रुक्मिणीस्वयंवर काव्यास संतोष मुनीनें 'रुक्मिणी सैंवर' हें नांव दिलें. तें डॉ. कोलतेना मान्य नाहीं. असें नांव असूं शकणार नाहीं असें त्यांचें म्हणणें. परंतु या आनंदसुत मुद्गलानें आपल्या काव्यास "लघु रुक्मीनी सैंवर" असें नांव दिलें आहे. हें काव्य निदान दोनशें वर्षांपूर्वी लिहिलें असावें. तेव्हां रुक्मिनी सैंवर असें नांव प्रचारांत होतें हें मला या निमितानें दाखवावयाचें आहे. या काव्याचीं जीर्ण पानें हातीं लागलीं आहेत व तीं दोनशें वर्षांपूर्वीचीं खात्रीनें आहेत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५ राघवकविकृत गंगालहरी समश्लोकीवरून कळणारे

गंगालहरींतिल मूळ पाठ.

(श्री. यशवंत गणेश फफे, पुणें)

जगन्नाथपंडितकृत गंगालहरीस्तोत्र भारतांत सर्वत्र सुप्रसिद्ध आहे. अनेकांच्या तें कंठगतहि असतें. पण त्यांत बरेच पाठभेद आढळतात. त्यांचें संशोधन होऊन कवीचे मूळचे पाठ कोणते आणि मागाहून पडलेले अपपाठ कोणते याची निश्चिति होणें अगत्याचे आहे. पाठनिश्चितीचें सर्वोत्तम साधन म्हणजे कवीची स्वहस्तलिखित प्रत होय. तें साधन तर येथें उपलब्ध नाहीं. दुसरा मार्ग म्हणजे जुन्यांत जुनीं अनेक हस्तलिखितें पाहून कवीची विषय मांडण्याची विशिष्ट धाटणी आणि त्याचें पदलालित्य म्हणजे अनुप्रासादि योजण्याची विशिष्ट सरणी यांच्या अनुरोधानें पाठनिश्चिति करणें. अशा प्रकारें कांहीं पाठांची निश्चिति होऊं शकेल. ती आपण पुढें पाहूंच. प्रस्तुत गंगालहरीपुरतें पाठ-निश्चितीचें तिसरें संभाव्य साधन म्हणजे या स्तोत्राचा जो मराठी समश्लोकी अनुवाद सर्वप्रसिद्ध आहे तो. म्हणजे जिला " वामनी गंगालहरी " म्हणतात ती. पण परीक्षणा-अंतीं असें आढळून येतें कीं, ही समश्लोकी यथार्थदीपिकाकार वामनपंडितानें केलेली असणें शक्य नाहीं. यथार्थदीपिकाकार वामनपंडित हा जगन्नाथपंडिताचा बहुतेक समकालीन–फारतर पाव शतकानें पुढचा-होता आणि वामनी गंगालहरी म्हणून म्हटली जाणारी जी समश्लोकी तिची रचना तर मूळ संस्कृत गंगालहरीत कालांतरानें अनेक अप-पाठ उत्पन्न झाल्यानंतर बऱ्याच पुढल्या कालांत झालेली आहे. शिवाय या मराठी समश्लोकींतहि पुन्हा अनेक अपपाठ पडलेले आहेत. इतके कीं, या मराठी समश्लोकीचे मूळ पाठ कोणते हें उलट संस्कृत गंगालहरीच्या अनुरोधानें शोधावें लागतें! अशी स्थिति असल्यानें जगन्नाथी गंगालहरींतील मूळ पाठ ठरविण्याचे कामीं या वामनी म्हटल्या जाणाऱ्या समश्लोकीचा तादृश उपयोग होण्याजोगा नाहीं. अशी अवस्था असली तरी संस्कृत गंगालहरीचे मूळपाठ निश्चित करतां येतील असें एक उत्कृष्ट साधन सुदैवेंकरून उपलब्ध झालेलें आहे. तें म्हणजे गंगालहरीचा राघव कविकृत मराठी समश्लोकी अनुवाद हें होय. यास आपण राघवी गंगालहरी असें म्हणूं.

राघवकवि म्हणजे रघुनाथपंडित मनोहर चंपावतकर. हा अनेक शास्त्रांत पारंगत, पंडित व मोठा प्रतिभाशाली कवि होऊन गेला. यानें संस्कतांत अनेक विषयांवर पद्यात्मक उच्च प्रतीचे ग्रंथ लिहिले आहेत. याचें वैद्यविलास, चिकित्सामंजरी व नाडीज्ञानविधि हे वैद्यकावरील, वृत्तसिद्धांतमंजरी व छंदोरत्नावली हे छंदःशास्त्रीय आणि कविकौस्तुभ हा साहित्यशास्त्रावरील ग्रंथ आहे. याची माहिती अलीकडेच उपलब्ध

 CC-0. Agamnigam Foundation. Digitized by eGangotri Siddhanta Foundation, Chandigarh

झालेली आहे. वैद्यविलास हा ग्रंथ इ. १६९७ त लिहिलेला आहे. तो या रघुनाथपंडित मनोहरानें परिणत वयांत लिहिलेला दिसतो. त्यांत तो आपल्या ग्रंथास महाकाव्य म्हणतो व आपल्या नांवामागें 'कविकुलावतंस' असें बिरुद जोडतो. मनोहरकुल हा अंबोधि, रघुनाथपंडित हा त्यांतून निघालेला चंद्र, त्याचीं काव्यें हेच त्या चंद्राचे किरण आणि रसिकांचें हृदय हें त्या चंद्रकिरणांनीं विकासणारें कमळ असें सुंदर रूपक योजून हा कवि आपल्या कवित्वशक्तीचें आत्मविश्वासानें वर्णन करतो. इतकेंच नव्हे तर "ननु तर्कमुखाखिलवाग्रचना — घटिकाशतपद्यनिपण्णमतिः" म्हणजे कोणत्याहि विषयावर एका घटकेंत शंभर पद्यें रचण्याइतके शीघ्रकवि आपण असल्याचेंहि तो साभिमान सांगतो. त्याच्या परिणतप्रज्ञतेस हें शोभून दिसतें. पण हाच कवि गंगालहरी-समश्लोकींत फार लीनतेनें व बिचकत बिचकत बोलतो. तो म्हणतो, 'जगन्नाथाचें काव्य हें नारिकेल फल आणि आपण तर लहान चोचीचे पोपट. सारा जन्म वेचला तरी त्याचा भेद आपणांस होणें नाहीं. जगन्नाथादि थोर कवि म्हणजे काव्यरूप आकाशांत भ्रमण करणारे चक्रांग आणि आपण केवळ शलभ. तथापि बालकाचें बोबडे बोल ऐकून पिता प्रेमानें त्याचें कौतुक करतो, तद्वत् विद्वज्जनांनीं माझ्या काव्याचा आदर करावा असें कवि सविनय विनवितो. यावरून गंगालहरीचा हा अनुवाद राघवकवीनें म्हणजे रघुनाथपंडित मनोहरानें आपल्या पूर्ववयांत केला असावा असें दिसतें. हा अनुवाद सामान्यतः समवृत्त समश्लोकी आहे. मात्र तो निरपवादपणें तसा नाहीं. श्लोक १३, २०,२४ व ३८ यांचा अनुवाद समवृत्त असला तरी प्रत्येकीं दोन श्लोकांत केलेला असून श्लोक ४९ चा अनुवाद दोन आर्यांत केलेला आहे. दुसरें असें आढळतें कीं, एका हस्तलिखित प्रतींत जेथें दोन आर्या आहेत तेथें दुसऱ्या प्रतींत एकच समवृत्त श्लोक आहे. यावरून असें अनुमान निघतें कीं, राघवानें हा अनुवाद केला त्या वेळीं तो जगन्नाथाच्या काव्याचें सौंदर्य व मर्म जाणण्या-इतका विद्वान् व मर्मज्ञ असला तरी पद्यरचनेच्या कलेंत तो सिद्धहस्त नसून प्रयत्नशील होता व म्हणूनच पूर्ववयी होता. गंगालहरी समश्लोकी हें त्याचें पहिलेंच काव्य असावें. वैद्यविलासाचे रचनाकाळीं रघुनाथपंडित मनोहर साठीचे घरांत व ही समश्लोकी रचण्याचे वेळीं पंचविशी-तिशीचे घरांत होता असें मानिलें तर उघडच या समश्लोकीचा रचनाकाल इ. १६७० च्या सुमारास येतो. आख्यायिकेवरून गंगालहरी हें जगन्नाथपंडिताचें शेवटचें काव्य दिसतें. तसें तें नाहीं हें खरें तरी तें परिणत वयांतीलच आहे. त्याचा रचनाकाल इ. १६५० ते १६६० च्या सुमाराचा म्हणावयास चिंता नाहीं. यावरून मूळ गंगा-लहरीच्या रचनेनंतर दहा वीस वर्षांच्या–पाव शतकाच्या आंतच राघवी गंगालहरी झाली आहे असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. हें मध्यंतर फार अल्प असल्यानें तेवढ्यांत मूळ जगन्नाथी श्लोकांत अपपाठ उत्पन्न झाले असण्याचा फारसा संभव नाहीं. आणि म्हणून राघवी गंगालहरी हें संस्कृत गंगालहरीच्या पाठचिकित्सेचें अत्युतम साधन होय. त्याचाच उपयोग करून पुढें पाठनिश्चिति करावयाची आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राघवी गंगालहरीची ही हस्तलिखित पोथी मोठ्या चमत्कारिक योगायोगानें माझ्या हातीं आली. तें वृत्त असें :—इ. १९१५ किंवा १६ साल असेल. मूळचे इंदूरचे राहणारे भालचंद्रपंत मावळणकर नांवाचे अविवाहित तरुण गृहस्थ येथें भटांच्या बोळांत राहात होते. त्यांनीं अफू खाऊन आत्महत्या केली. तेव्हां शेजारधर्मानुसार पंचनामा, मरणोत्तर तपासणी इत्यादिकांस मला जावें लागलें. पुढें त्यांच्या थोरल्या वहिनी येथें येऊन येथील बिऱ्हाड मोडून इंदुरास जाण्यास निघाल्या तेव्हां घरांत रद्दी कागदांचा कांहीं गळाटा होता तो त्यांनीं कचऱ्याचे पेटींत टाकण्यास काढिला. तेव्हां ती कामगिरी मी आपल्याकडे घेतली. या गळाठ्यांत मला पूर्ण अपूर्ण अनेक हस्तलिखित पोथ्या मिळाल्या. प्रस्तुतची राघवी गंगालहरी त्यांतच मिळाली. तींतील २३ वें पान तेवढें गहाळ आहे. या समश्लोकींत कवीनें आपलें राघव हें नांव दिलेलें असलें तरी आडनांव व गांव दिलेलें नाहीं. यामुळें या कवीचा आमच्या मनोहर कुळाशीं कांहीं संबंध असेल अशी कल्पनाहि तेव्हां मला आली नाहीं व लवकरच या समश्लोकीचें मला विस्मरणहि झालें. यानंतर एकवीस बावीस वर्षांनीं उज्जैन येथील सिंदिया ओरिएंटल इन्स्टिटयूटचे क्युरेटर रा. स. ल. कात्रे, एम्. ए. यांस वैद्यविलास या नांवाचा एक संस्कृत पद्यमय हस्तलिखित ग्रंथ मिळाला. त्यांत कवीनें आपलें नांव राघव किंवा रघुनाथपंडित, उपनाम मनोहर, गांव चंपावती म्हणजे कुलाबा जिल्ह्यांतील चौल इ० सविस्तर माहिती दिलेली आहे. यासंबंधीं श्री. कात्रे यांचा महाराष्ट्र शारदा मासिकाच्या डिसेंबर १९३७ च्या अंकांतील लेख पाहिल्यावर येथील आनंदाश्रमांत तपास करतां वैद्यविलासाची एक जीर्ण हस्तलिखित प्रत मिळाली. ती पाहून मला एकदम माझे संग्रहांतील राघवी गंगालहरीचें स्मरण झालें व तुलना करतां ही राघवी गंगालहरी व वैद्यविलास दोन्ही कृति एकाच राघवकवीच्या म्हणजे रघुनाथपंडित मनोहर यांच्या आहेत असा माझ्या मनाचा निश्चय होऊन, तत्संबंधीं एक सविस्तर लेख मी मार्च १९३८ च्या सह्याद्रींत लिहिला व त्यांत या राघवी गंगालहरींतील कित्येक श्लोक देऊन तिची ओळख करून दिली.

पुढें उज्जैनचे श्री. कात्रे यांस राघवी गंगालहरीच्या तीन प्रती मिळाल्या. त्या व मजजवळील प्रत अशा चार हस्तलिखित प्रतींवरून त्यांनीं मुद्रणयोग्य अशी प्रत सिद्ध करून ठेविली आहे. ती ते लवकरच प्रकाशित करतील अशी मला आशा आहे. श्री.कात्रे यांजकडून कांहीं महिन्यांपूर्वी माझी हस्तलिखित प्रत परत आली. इतक्यांत मुंबईचे प्रसिद्ध कवि श्री. लक्ष्मण गोविंद विंझे यांनीं गंगालहरीची नवीन समश्लोकी रचून ती मूळ संस्कृत गंगालहरी, वामनी समश्लोकी व गद्य अर्थ यांसह छापून प्रसिद्ध केली ती माझे पाहण्यांत आली. तेव्हां संस्कृत गंगालहरींत आढळणाऱ्या पाठभेदांपैकीं जगन्नाथाचे मूळ पाठ कोणते असावे याविषयीं सर्वांत जुना व बहुतेक जगन्नाथ समकालीन असा जो राघवीय अनुवाद म्हणजे राघवी गंगालहरी हिच्या साहाय्यानें कांहीं निर्णय करितां येईल कीं नाहीं इकडे माझें लक्ष वेधलें व तसा निर्णय निश्चितपणें करतां येतो असें मला दिसून आलें

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

याविषयींच आतां कांहीं चर्चा करावयाची आहे. या चर्चेसाठीं मुद्रित प्रत म्हणून श्री. विंझे यांच्या पुस्तकांतील संस्कृत गंगालहरी घेतली असून, राघवीच्या हस्तलिखित पोथींतील संस्कृत मूळ, तशीच संस्कृत गंगालहरीची आणखी एक हस्तलिखित प्रत आणि मराठी राघवी गंगालहरी या चारांचा उपयोग केला आहे.

कित्येक पाठभेद अर्थदृष्ट्या सारखेच असतात. त्यांपैकीं कोणताहि पाठ घेतला तरी काय बिघडलें असें कोणास वाटेल तर तें बरोबर नाहीं. अर्थ सरस होतो म्हणून किंवा पदलालित्य वाढतें म्हणून अमकाच पाठ घ्यावा असें म्हणणेंहि युक्त नव्हे. अयोग्य पाठ घालून कवीचें काव्य बिघडवणें जसें अयोग्य तसेंच आपल्या पसंतीचे नवे पाठ योजून तें सुधारण्याचा प्रयत्न करणेंहि अनुचितच होय. चांगलें असो वाईट असो कवीचें मूळ काव्य कसें होतें तें शोधणें हेंच संशोधकाचें कर्तव्य होय. राघवीय अनुवादावरून व त्या राघवीय समश्लोकीच्या पोथींत घेतलेल्या संस्कृत श्लोकांवरून गंगालहरीचे मूळ पाठ कोणते निश्चित होतात हेंच पुढें पाहावयाचें आहे.

१. सर्वांत प्रथम जी गोष्ट ध्यानांत येते ती म्हणजे मुद्रित प्रतींत एका स्थळीं झालेला श्लोकानुक्रमभंग ही होय. राघवीय गंगालहरींत 'स्मृतीयाता' इ. श्लोक चौथा असून 'तवालंबादंब' इ. श्लोक पांचवा आहे. पण मुद्रित प्रतींत तवालंबादंब इ. हा श्लोक चौथा असून 'स्मृतीं याता' इ. हा श्लोक पांचवा आहे. दुसऱ्या हस्तलिखित पोथींत राघवी पोथींतल्यासारखाच अनुक्रम आहे. दोन्ही पोथ्या व राघवीय अनुवाद यांवरून ठरणारा अनुक्रमच जगन्नाथाचा असणार हें उघड आहे. विषयानुरोधानेंहि तोच श्लोकानुक्रम ठरतो, पाहा. पहिल्या श्लोकांतील वर्ण्य विषय सलिल हा आहे. दुसऱ्या श्लोकाचा वर्ण्य विषय सलिलाचा प्रवाह हा आहे आणि तिसऱ्या श्लोकाचा वर्ण्य विषय उत्तुंग तरंग हा आहे. सलिल, त्याचा प्रवाह व त्यावर उठणारे तरंग या तिहीं मिळून गंगेची मूर्ति होते तेव्हां सलिल, प्रवाह व तरंग वर्णिल्यावर लगेच 'इयं सा ते मूर्तिः' हेंच यावयाचें. अर्थात् या दृष्टीनें पाहिलें तरी मुद्रितांतील श्लोकानुक्रम चुकला आहे हें उघड ठरतें.

२. आविद्याद्रुम कीं आविद्यद्रुम ?

दुसऱ्या श्लोकांत 'अपिद्रागाविद्याद्रुमदलनदीक्षागुरुरिह' असा मुद्रित प्रतींत चरण आहे. यांत आविद्या असें पद घ्यावें लागतें. आसमंतात् अविद्या, आविद्या असें समर्थन टीकाकार करतात. पण तें कृत्रिमच होय. प्रस्तुत दोन्हीं हस्तलिखित पोथ्यांत आविद्यद्रुम असा मूळ लेख आहे. दोहोंतहि मागाहून कोणा शहाण्यानें एक काना अधिक देऊन द्य चा द्या केला आहे. पण तो जावई शोध होय. दोन्ही हस्तलिखितांवरून जगन्नाथाचा मूळ पाठ आविद्यद्रुम असाच दिसतो. अविद्यस्य भावाः आविद्यं म्हणजे अज्ञान.

३. उदञ्चन्मार्तंड कीं उदञ्चन् मात्सर्य ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तिसऱ्या श्लोकांत मुद्रितांत " उदञ्चन्मार्तंडस्फुटकपटहेरंबजननीकटाक्षव्याक्षेपक्षण जनितसंक्षोभनिवहाः " एवढें दोन चरणांचें समस्तपद आहे. यांत मार्तंड शब्दाचा संबंध कटाक्ष शब्दाशीं जोडावयाचा तर मोठाच द्राविडी प्राणायाम होतो. दोन्ही हस्तलिखितांत मार्तंड याऐवजीं मात्सर्य असा शब्द आहे आणि वामनी व राघवी दोन्ही अनुवादांतहि मात्सर्य हाच शब्द आहे म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय हें निःसंशय ठरतें.

४. गंगातनुभुवः कीं गांगाः पुनरमी ?

तिसऱ्या श्लोकांत मुद्रितांत गंगातनुभुवः तरंगाः आणि राघवीमध्यें अमी गांगाः तरंगाः असा पाठ आहे. या स्तोत्रांत सर्वत्र कवि गंगेस उद्देशून तिजकडे अंगुलिनिर्देश करून बोलत आहे. पांचव्या श्लोकांत इयं सा ते मूर्तिः, आठव्या श्लोकांत इदं तु गंगेति पदं आणि नवव्या श्लोकांत एतत् ते तीरं असें कवि म्हणतो. या सरणीस अनुसरून तिसऱ्या श्लोकांतहि अमी तरंगाः असेंच त्यानें म्हटलें असणार म्हणून गांगाः पुनरमी हाच मूळ पाठ होय.

५. भवतां दुरितभयभंगाय कीं जगतः दुरितभयभंगाय ?

याच तिसऱ्या श्लोकांत मुद्रितांत भवतां दुरितभयभंगाय असा पाठ आहे. तो उघड अपपाठ आहे. कारण या स्तोत्रांत सर्वत्र कवि गंगेस उद्देशून बोलत असल्यानें त्वं आणि भवत् हे शब्द कोठेंहि गंगावाचकच येणार. भवतां म्हणजे लोकहो तुमच्या असा अर्थ ह्या स्तोत्रांत होऊंच शकत नाहीं. म्हणून येथें राघवींत असलेला जगतः हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

६. अथ च कीं अपि च ?

चौथ्या श्लोकांत मुद्रितांत त्रिविधमथ पापं च व राघवी पोथींत त्रिविधमपि पापं च असे पाठ आहेत. अथ च आणि अपि च दोहोंचा अर्थ समानच आहे. पण राघवींत आढळणारा पाठच जगन्नाथाचा मूळ पाठ मानिला पाहिजे म्हणून त्रिविधमपि पापं च हा मूळ पाठ होय.

७. हरतु कीं हरताम् ?

याच चौथ्या श्लोकाचे अंतीं मुद्रितांत हरतु तर राघवी पोथींत हरताम् असे पाठ आहेत. यांपैकींही राघवींतील हरताम् हाच मूळ पाठ होय. चरणांतीं दीर्घाक्षर असणें इष्ट या दृष्टीनेंहि हरताम् हा पाठ सरस म्हणावा लागेल.

८. चंडांशु कीं चंद्रांशु ?

चौथ्या श्लोकाचा दुसरा चरण हरत्यन्तस्तंद्रां तिमिरमिव चंद्रांशुसरणिः असा आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तंद्रां याशीं अनुप्रासार्थ चंद्रां असेंच हवें. असे अनुप्रास या स्तोत्रांत पुष्कळ ठिकाणीं आले आहेत. वामनीमध्यें ' तिमिरा जेविं सविता ' असा अनुवाद केला आहे म्हणजे चंडांशु हा पाठ घेतला आहे. पण तो अपपाठ होय. राघवींतील चंद्रांशु हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

९. सलिलभरं कीं सलिलमिदं ?

सहावा श्लोक पाहा. सलिल पितां येतें तसा त्याचा भर पितां येत नाहीं. शिवाय सरणीप्रमाणें अंगुलिनिर्देशपूर्वक इदं सलिलं असेंच जगन्नाथानें म्हटलें असणार म्हणून सलिलमिदं हाच मूळ पाठ होय.

१० परिवृताः मृगाः कीं परिवृतं नंदनवनं ?

सातवा श्लोक पाहा. परिवृताः या पाठाप्रमाणें " लाखो देवांनीं वेढलेले असे मृग नंदनवनांत स्वच्छंदानें प्रवेशतात " असा अर्थ होतो म्हणजे मृगांच्या प्रवेशापूर्वी नंदनवनांत हे देव नव्हते असें निष्पन्न होतें. पण नंदनवन सदाच देवांनीं गजबजलेलें असणार म्हणून वैमानिकशतसहस्रैः परिवृतं नंदनवनं मृगाः स्वच्छंदं विशन्ति असेंच जगन्नाथानें म्हटलें असणार. राघवीमध्यें परिवृतं असा पाठ आहे व तोच जगन्नाथाचा मूळचा पाठ होय.

११. न विषयः कीं न विशयः ?

दहाव्या श्लोकांत निराकार, नित्य, विशुद्ध असें जें तत्त्व तें हे गंगे, तूंच आहेस असें सांगितल्यावर शेवटीं ' न विशयः ' हे शब्द आले आहेत. " न विशयः " म्हणजे यांत कांहीं संशय नाहीं. विशय म्हणजे संशय. राघवी गंगालहरींत ' संशय नसे ' असा अर्थ केला आहे तोच यथायोग्य आहे; व त्यावरून न विशयः हाच मूळ पाठ असल्याचें स्पष्ट होतें. विशय शब्द परिचित नसणाऱ्या कोणीतरी विषय अशी शुद्धि केल्यानंतरच वामनी समश्लोकी झाली आहे व म्हणूनच तीमध्यें विषयः हाच शब्द प्रमाण मानून " विषय म्हणती मूढ मतिनें " असें रूपान्तर केलें आहे.

१२. तपोराशिभिः कीं तपोराजिभिः ?

अकराव्या श्लोकांत हा शब्द आला आहे. अनेक तपांनीं हा अर्थ विवक्षित आहे. तो यांतील कोणत्याहि पाठानें होईल. पण मागें घोराभिः असें स्त्रीलिंगी विशेषण आहे. मुद्रितांतील तपोराशिभिः हा शब्द पुंल्लिंगी असल्यानें तो उघड अपपाठ होय. दोन्ही हस्तलिखितांत तपोराजिभिः असा शब्द आहे तोच मूळ पाठ होय. वामनीमध्यें तपकर्त्यांसहि असा अर्थ केला आहे तो तपोराशिभिः हा अपपाठ स्वीकारल्यामुळेंच केला आहे हें उघड आहे.

१३. झटिति कीं सपदि ?

सतराव्या श्लोकांत हे पाठभेद आढळतात. झटिति म्हणजे सत्वर आणि सपदि

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणजे तत्काळ. दोन्ही शब्द प्रस्तुत स्थळीं सारखेच लागू पडणारे आहेत. तथापि राघवींत आढळणारा सपदि हाच मूळ पाठ होय. याच्या पुढील तीन शब्द सकारानें प्रारंभलेले असल्यानें त्यांशीं अनुप्रासार्थ जगन्नाथ सपदि हाच शब्द योजील.

१४. पटली कीं पटल ?

विसाव्या श्लोकांत कमलसमूह या अर्थानें मुद्रितांत अंभोजपटली व राघवीचे पोथींत अंभोजपटल असा शब्द आला आहे. पटली म्हणजे वृक्ष आणि पटल म्हणजे समूह, डीग. यावरून पटल हाच मूळ पाठ होय.

१५. जंबालं जलं कीं जंघालं जलं ?

विसाव्या श्लोकांत मुद्रितांत जलं ते जंबालं आणि राघवीमध्यें जलं ते जंघालं असा पाठ आढळतो. जंबाल हें नाम असून त्याचा अर्थ शेवाळ किंवा चिखल असा आहे. याच श्लोकांत वर जंबाल हा शब्द चिखल ह्या अर्थी आलेला आहे. प्रस्तुत स्थळीं जलं याचें विशेषण हवें असून तें जंबाल हेंच होय. जंघाल म्हणजे वेगवान्. वामनी समश्लोकींत 'बहु धावे ऐसें' म्हणजे वेगवान् हाच अर्थ केला आहे म्हणजे जंघाल हाच पाठ स्वीकारला आहे. अर्थात् येथें जंबाल हा मूळ पाठ आणि जंघाल हा अपपाठ होय.

१६. विधौ कीं विधेः ?

एकविसाव्या श्लोकांत मुद्रितांत विधौ व्यासंगः आणि राघवींत विधेर्व्यासंगः असें पाठ आहेत. अर्थदृष्ट्या दोन्ही चालण्याजोगे आहेत तरी राघवीमध्यें असणारा विधे हाच जगन्नाथाचा मूळ पाठ म्हटला पाहिजे.

१७ जननी कीं भवती ?

तेविसाव्या श्लोकाचे अंतीं राघवीमध्यें 'यदि जगति जागर्ति भवती' असें आहे आणि मुद्रितांत भवतीऐवजीं जननी शब्द आहे. अनुप्रासाचे दृष्टीनें दोनहि पाठ सारखेच आहेत. तथापि कवि गंगेशीं बोलत आहे म्हणून त्यानें येथें भवती हाच शब्द योजणें स्वाभाविक आहे.

१८. गदविगलितः कीं गदविदलितः ?

चोविसाव्या श्लोकांत हे पाठ आढळतात. अनुप्रास व अर्थ दोन्ही दृष्टींनीं गद-विदलितः हा पाठ सरस आहे व तो राघवीमध्यें आहे म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

१९,२०. प्रबलतर कीं प्रबलरस ? ज्वर कीं ज्वल ?

सव्विसाव्या श्लोकाचें पूर्वार्ध मुद्रित प्रतींत "स्फुरत्कामक्रोधप्रबलतरसंजातजटिल-ज्वरज्वालाजालज्वलितवपुषां नः प्रतिदिनं" असें आहे. राघवीमध्यें प्रबलतरऐवजीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

प्रबलरस आणि ज्वरऐवजीं ज्वल असे शब्द आहेत. यांचा विचार करावयाचा आहे. संजात कोणापासून तें सांगणारें नाम त्याचें पाठीशीं असणें अवश्य आहे. प्रबलतर हें नाम नाहीं म्हणून येथें प्रबलरस घेणें प्राप्त होय. (रस म्हणजे आसक्ति, मद्य, विष. प्रस्तुत स्थळीं प्रबलरस म्हणजे जलाल मद्य किंवा जहाल विष). तसेंच जटिल हें विशेषण शिखामाली ज्वलनास जसें साजतें तसें ज्वरास साजत नाहीं. शिवाय पुढें ज्वाला शब्द असल्यानें त्याचें मागें ज्वल (ज्वलन) हवाच व तो अनुप्रासासहि साधक आहे. एवंच राघवी समश्लोकीचें पोथींत असलेलें प्रबलरस व ज्वल हेंच मूळपाठ होत.

२१. जटिल कीं जटित ?

सत्ताविसाव्या श्लोकांत हे पाठभेद आले आहेत, राघवीचे पोथींत जटित असा पाठ आहे. जटाजूटजटित म्हणजे जटाजूटांत जडलेला. राघवीय मराठी अनुवाद ' जडोनी राहे तो ' असा आहे. त्यावरूनहि जटित हाच जगन्नाथाचा मूळ पाठ ठरतो.

२२. प्रणय नः कीं प्रणयतः ?

तिसाव्या श्लोकांत हे महत्त्वाचे पाठभेद आढळतात. मुद्रित प्रतींत प्रणय नः असा पाठ आहे. 'नः प्रणय' याचा अर्थ नीटसा होत नाहीं. वामनीमध्यें 'समजो भाव तुजला' आणि लक्ष्मणीमध्यें ' आतां संतुष्ट हो ' असा अर्थ केला आहे. राघवीमध्यें प्रणयतः असा पाठ असून त्याचा अनुवाद स्नेहें असा केला आहे. कवीनें या श्लोकांत असा आविर्भाव आणला आहे कीं, गंगेची एक आकांक्षा कांहीं केल्या पुरी होत नव्हती. तिची फारा दिवसांची असफल राहिलेली ती आकांक्षा सफल करण्यासाठींच तिजवरील स्नेहामुळें कवि पुढें आला आहे ! हा भाव व्यक्त होण्यास प्रणयतः हाच पाठ अवश्य आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय यांत शंका नाहीं. एकेचाळिसाव्या श्लोकांतहि कवीनें गंगेविषयीं आपणांस वाटणारा प्रणय(स्नेह) प्रगट केला आहे. शिवाय एकाच चरणांत अहं आणि नः येणें अशक्य. अन्यत्र असे आले नाहींतच.

२३. एवं गुणगणान् कीं एवंविधगुणान् ?

एकतिसाव्या श्लोकांतील हे पाठभेद होत. एवंगुण आणि एवंविध दोन्ही बहुतेक समानार्थक विशेषणें आहेत. गण कसे ? तर एवंगुण म्हणजे अशा प्रकारचे. अर्थात् इष्ट असलेल्या गुणांचे समुदाय हा अर्थ निष्पन्न होत नाहींच. अर्थात् मुद्रितांत आढळणारा एवंगुणगणान् हा अपपाठ होय. राघवींतील एवंविधगुणान् हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

२४. ऋते त्वत् कीं ऋते त्वां ?

एकतिसाव्या श्लोकांत आढळणारे हे पाठ सारख्याच प्रतीचे असले तरी राघवी प्रतींत असलेला ऋते त्वां हाच जगन्नाथी मूळ पाठ असला पाहिजे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

२५. दलित कीं शमित ?

तेहतिसाव्या श्लोकांतील हे पाठभेद आहेत. राघवानें केलेल्या मराठी समश्लोकींत शमितकलुषा असा शब्द आहे. अर्थात् संस्कृत मुळांतील शमित हा शब्द राघवानें कायम ठेविला आहे व म्हणून शमित हाच जगन्नाथप्रयुक्त मूळ पाठ होय हें यावरून निर्विकार सिद्ध होते.

२६. मम कीं मया ?

सदतिसावा श्लोक पाहा. 'एवं मयापि दुरितनिवहे तु प्रेमा श्लथयितुं अशक्यः' असा अन्वय असल्यानें मया ही तृतीयाच आवश्यक आहे. तशीच ती राघवी प्रतींत आहे. मुद्रितांतील ममः हा पाठ प्रामादिक होय.

२७. टंकार कीं डांकार ?

अडतिसावा श्लोक पाहा. डमरूच्या शब्दास टंकार म्हणण्यापेक्षां डांकार म्हणणेंच समुचित होय. डांकार हाच शब्द ध्वन्यनुकारी आहे म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ असला पाहिजे. शिवाय तो अनुप्रासाधकहि आहे.

२८. तिरोधत्तां तापं कीं तिरोधत्तं पापं ?

या प्रश्नाचा निर्णय अडतिसाव्या श्लोकाची राघवी समश्लोकी पाहतां स्पष्ट होतो. या समश्लोकींतील संस्कृत श्लोकांत तिरोधत्तां पापं असें असून मराठी समश्लोकींत 'हरो माझ्या पापां त्रिदशतटिनीतांडव असा' याप्रमाणें पाप हाच शब्द आहे. अर्थात् येथील जगन्नाथाचा मूळ पाठ पापं हाच होय. वामनीमध्यें 'तापा प्रतिहरू' असा अनुवाद केला आहे. अर्थात् ताप असा अपपाठ उत्पन्न झाल्यानंतरच वामनी समश्लोकी झालेली आहे हें स्पष्ट आहे.

२९. सापल्यस्फुरित कीं सापल्यास्फुरित ?

चाळिसावा श्लोक पाहा. भवान्या याशीं अनुप्रासार्थ सापल्यास्फुरित असावें. तसेंच ते राघवी पोथींत आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३०. त्वदीया सा मृत्स्ना कीं त्वदीयासौ मृत्स्ना ?

बेचाळिसावा श्लोक पाहा. कवि नजिकच्या मृत्तिकेकडे बोट दाखवून गंगेशीं बोलत आहे. अशा वेळीं तो सा मृत्स्ना न म्हणतां असौ मृत्स्ना असेंच म्हणेल. म्हणून राघवींत दिसणारा असौ हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३१. यजन्ति कीं भजन्ति ?

चव्वेचाळिसाव्या श्लोकांत हे पाठभेद आहेत. पुढें वितान म्हणजे यज्ञ आलेच आहेत. तेव्हां मागें यजन येण्याचें कांहीं कारण नाहीं. म्हणून राघवींत असलेला भजन्ति

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हाच जगन्नाचा पाठ होय. वामनानें 'किति देवांसि यजिती' असा अनुवाद केला आहे. अर्थात् यजन्ति असा अपपाठ पडल्यानंतरच वामनीची रचना झाली आहे.

३२. सुकृतजन्मार्जनकृतां कीं सुकृतकर्मार्जनकृतां ?

पंचेचाळिसावा श्लोक पाहा. मुद्रित प्रतींत "अविश्रान्तं जन्मावधिसुकृतजन्मार्जन-कृतां" असा चरण आहे जन्मावधि आणि जन्मार्जन दोनदां जन्म शब्द जगन्नाथ कसा योजील ? सुकृतजन्मार्जनकृतां याचा अर्थहि नीट होत नाहीं. राघवीमध्यें सुकृत-कर्मार्जनकृतां असा पाठ आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३३. इतरजनसाधारणतया कीं इतरजनसाधारणधिया ?

सत्तेचाळिसाव्या श्लोकांत हे पाठ आहेत. राघवीय अनुवाद 'इतरजनउद्धारमतिनें' असा आहे. यांतील मति शब्दावरून मुळांत धी शब्द असला पाहिजे हें उघड आहे. तेव्हां इतरजनसाधारणधिया हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३४. स्थितां त्वां ये कीं स्थितां ये त्वां ?

श्लोक ४८ पाहा. दोन्ही तेच शब्द आहेत. अनुक्रम बदलला आहे इतकेंच. पण कवीचा शब्दानुक्रम तरी मागून इतरांनीं कां बदलावा ? बदलण्याचा त्यांस अधिकार काय असा प्रश्न आहे. राघवींत आढळणारा 'स्थितां ये त्वां' हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय व उच्चारणास तोच अधिक बरा आहे.

३५. शुभ्राल कीं शोभाल ?

श्लोक ४८ मध्यें प्रथम चरणांत हे दोन पाठ आढळतात. राघवीमध्यें शोभाल व मुद्रितांत शुभ्राल आहे. शोभा ह्या नामापासून शोभाल हें विशेषण होतें; पण शुभ्र हें नाम नसून विशेषण आहे. शुभ्राल शब्द बनण्यास ही अडचण आहे. तें असो. राघवानें हिमकरकलाशोभन शिरीं असा अनुवाद केला आहे त्यापक्षीं त्याचें पुढें शोभाल हाच शब्द होता हें उघड आहे. वामनीमध्यें 'शशिशोभा सुमुकुटीं' असा अनुवाद आहे. यावरून ही समश्लोकी करणारापुढेंहि शोभाल हाच शब्द होता असें ठरतें. अर्थात् शोभाल हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय. वाचाल, प्रज्ञाल इत्यादिप्रमाणें.

३६. करोतु मम शंतनोः कीं तनोतु मम शंतनोः ?

एकुणपन्नासावा श्लोक पाहा. तनोतु मम शंतनोः सपदि शंतनोरंगना या चरणांत तीनदां 'तनो' येऊन सुंदर अनुप्रास साधला आहे. राघवीमध्यें तनोतु असा पाठ आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ आहे.

३७. मंत्रैर्मीलितं कीं मंत्रैर्मज्जितं ?

पन्नासाव्या श्लोकांत मुद्रितांत मीलितं आणि राघवीमध्यें मज्जितं असे पाठभेद आढळतात. राघवकृत मराठी अनुवाद 'गेले मंत्र बुडोनी' असा आहे. अर्थात

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राघवापुढें मज्जितं असा पाठ होता व म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय यांत शंका नाहीं. वामनी समश्लोकींत 'मंत्रां मौन पडे' असा अनुवाद आहे तो मीलितं हा अपपाठ उत्पन्न झाल्यानंतरचा आहे हें उघड आहे.

३८, ३९ वीचिक्षालित कीं वारिक्षालित ? कालियाहत कीं कालियाहित ?

पन्नासाव्या श्लोकांत मुद्रित प्रतींत गंगेस उद्देशून वीचिक्षालितकालियाहतपदे असें संबोधन आलें आहे. लक्ष्मणीमध्यें 'पूर्वी कालियानें जखमी केलेले श्रीकृष्णाचे पाय जसे तूं आपल्या लाटांनीं धुऊन विषमुक्त केलेस' असा अर्थ केला आहे. वामनीमध्यें 'कालियास दमितां त्याचिया पदा धूसी' अशा प्रकारें लक्ष्मणीप्रमाणेंच अर्थ घेतलेला आहे. पण श्रीकृष्णाचे पाय कालियानें जखमी केले होते यास काय आधार आहे ? शिवाय श्रीकृष्णानें कालियाचें मर्दन केलें ते यमुनेच्या डोहांत गंगेच्या नव्हे ! अर्थात् कालिय-मर्दनाचे कथेशीं गंगेचा कांहीं संबंध नाहीं. वास्तविक प्रकार असा आहे कीं, येथें कालियाहत असा शब्द नसून कालियाहित असा शब्द आहे, व तो केवळ विष्णुवाचक आहे. श्रीविष्णूला जेव्हां हे मुरारे, हे मधुसूदना, असें म्हणतात तेव्हां त्या शब्दांचा वाच्यार्थ विवक्षित नसतो. हे विष्णो, इतकाच अर्थ विवक्षित असतो, तसेंच येथें आहे. कालियाहितपद याचा राघवीय अनुवाद कालियारिचरण असा आहे. अहित म्हणजे अरि. कालियारिचरण म्हणजे विष्णुपद. विष्णुपदापासून गंगा निघाली तेव्हां तिनें उदकानें विष्णुपद क्षालिलें हें उघडच आहे, अर्थातच येथें 'वारिक्षालित-कालियाहितपदे' असें संबोधन असून वारि आणि कालियाहित हेच मूळ पाठ होत. वीचि आणि कालियाहत हे अपपाठ होत.

४०, ४१, ४२, ४३ व ४४. मणिश्रेणि कीं फणिश्रेणि ? वल्गत् कीं चंचत् ?

नट कीं नव ? घटी कीं घटा ? तांडवं कीं तोंडवः ?

एक्कावन्नाव्या श्लोकांत शंकरानें द्यूतांत काय काय हरविलें तें प्रथम सांगितलें आहे. त्यांत मणिश्रेणि असा शब्द मुद्रित प्रतींत आलेला आहे. पण श्मशानवासी शंकरापाशीं मणि म्हणजे रत्नें कोठून असणार ? त्यापाशीं फणी म्हणजे सर्प मात्र होते आणि राघवी समश्लोकीच्या पोथींतील संस्कृत श्लोकांत व त्याच्या मराठी अनुवादांतहि 'फणिश्रेणि' असा पाठ आहे व जगन्नाथाचा तोच मूळ पाठ आहे. याच एक्कावन्नाव्या श्लोकाचा चतुर्थ चरण मुद्रित प्रतींत व्यालोलोल्ला-सिवल्लहरिनटघटी तांडवं नः पुनातु व राघवींत व्यालोलोल्लासिचंचल्लहरिनव-घटी तांडवो नः पुनातु असा आहे. यांतील चंचत् आणि वल्गत् बहुतेक समानार्थी असल्यानें चंचत् बद्दल वल्गत् घालण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. तसेंच हें गंगेचें नृत्य असल्यामुळें यांत नटांचा कांहीं संबंध नाहीं. म्हणून नट हा स्पष्ट अपपाठ होय मस्तकावर घटी म्हणजे लहानसा कुंभ घेऊन नृत्य करण्याचा एक प्रकार आहे तो

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कवीस अभिप्रेत असेल तर नवघटी असा पाठ धरावा लागेल. राघवी समश्लोकींत ' नवघटमय तें उद्धरू नृत्य मातें ' असें म्हटलें आहे म्हणजे राघवानें नवघटी तांडवः असा पाठ धरला आहे. लाटांचे उंचवटे हेच जणूं काय मस्तकावरील नवघट ज्यांत आहेत असें नृत्य असा राघवी समश्लोकीचा भाव दिसतो. पण समश्लोकी वरील संस्कृत श्लोकांत घटी असा पाठ नसून घटा असा आहे. घटा म्हणजे रणांगणांतील गजदलाची रचना, समूह; यावरून सामान्यत्वें समुदाय असाहि अर्थ होतो. त्यास अनुसरून चंचल्लहरि-नवघटा म्हणजे चंचल लहरींचे नवनवे समुदाय, त्यांच्या नवनव्या रचना ज्यांत दिसत आहेत असें तांडव नृत्य असाहि भाव असूं शकेल. हा भावहि कांहीं कमी हृद्य नाहीं. तेव्हां राघवींतील संस्कृत श्लोकांत असलेला ' व्यालोलोल्लासिचंचल्लहरिनवघटातांडवो नः पुनातु ' हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

जगन्नाथ पंडितकृत गंगालहरी स्तोत्रांत कसे अपपाठ पडले आहेत आणि त्या स्तोत्राचा राघवकविकृत म्हणजे रघुनाथपंडित मनोहरानें केलेला जो समश्लोकी अनुवाद आहे त्याच्या आधारें जगन्नाथाचे मूळ पाठ कसे निश्चित होतात हें येथवर आपण पाहिलें. श्री. विंझे यांनीं गंगालहरीचे बावन्न श्लोकच छापले आहेत. जणूं काय या बावन्न श्लोकांच्या पठनाबरोबर गंगेनें घाटाच्या बावन्न पायऱ्या चढून येऊन जगन्नाथ पंडितास आपल्या उदरीं ठाव दिल्यामुळें त्रेपन्नावा श्लोक जगन्नाथविरचित असणें अशक्य! परंतु एकंदर स्तोत्रकलाप पाहतां स्तोत्राचे शेवटीं फलश्रुति असावयाचीच. म्हणून हा लेख संपवितांना गंगालहरींतील शेवटचा फलश्रुतीचा त्रेपन्नावा श्लोक व त्याचा राघवी अनुवाद उद्धृत करणें उचित वाटतें.

इमां पीयूषलहरीं जगन्नाथेन निर्मिताम् ॥
यः पठेत् तस्य सर्वत्र जायन्ते जयसंपदः ॥ ५३ ॥
पीयूषलहरी हे तों जगन्नाथें विनिर्मिली ॥
जो पठे त्यास सर्वत्र होतील जयसंपदा ॥ ५३ ॥

---

६ पंडितराव आणि दानाध्यक्ष भिन्न कीं एकच ?

(श्री. **यशवंत गणेश फफे**, पुणें)

शककर्ता शिवाजी या पुस्तकांत श्री. सरदेसाई यांनीं शिवाजीच्या राज्याभिषेक-समयीं अष्टप्रधान कोण कोण होते ते दिले आहेत. त्यांत एक रघुनाथ पंडितराव दिलेले आहेत. आणि खालीं रघुनाथ पंडितरावांचे पुत्रास दानाध्यक्ष नेमल्याचें सांगितलें आहे. यावरून अष्टप्रधानांतील पंडितराव निराळे आणि दानाध्यक्ष निराळे असा अर्थ

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निष्पन्न होतो. श्री. राजोपाध्ये यांनीं 'कवि रघुनाथ पंडितराव प्रधान आणि सामराजकृत कविता' या नांवाची जी पुस्तिका अलीकडेच प्रसिद्ध केली आहे तीवरून तेहि पंडितरावपद निराळें आणि दानाध्यक्षपद निराळें असें मानीत असल्याचें दिसतें. ही समजूत यथार्थ आहे काय याचा थोडक्यांत विचार करावयाचा आहे. त्याबरोबरच किंबहुना तत्पूर्वी श्री. सरदेसाई, श्री. राजोपाध्ये प्रभृति म्हणतात त्याप्रमाणें शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं म्हणजे इ. १६७४ त रघुनाथभट उपाध्ये हे अष्टप्रधानांतील पंडितराव पदावर खरोखर होते कीं काय हें पाहणें प्राप्त आहे.

रघुनाथ पंडितरावांचें एक पत्र इ. १६७२ मधील उपलब्ध आहे. तें श्री राजोपाध्ये यांनीं आपल्या उपर्युक्त पुस्तिकेंत दिलें आहे. त्यानंतरच्या काळांतलें त्यांचें एकहि पत्र उपलब्ध नाहीं. तसेंच त्यांच्या अस्तित्वाचा नुसता उल्लेखहि इ. १६७२ नंतरच्या कोणत्याहि कागदपत्रांत उपलब्ध झालेला नाहीं. केशव पंडितकृत दंडनीतिप्रकरण या पुस्तकास श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं रघुनाथभट उपाध्ये पंडितराव यासंबंधानें एक परिशिष्ट जोडलें आहे. त्यांत त्यांनींहि इ. १६७२ चे पुढें रघुनाथ पंडितराव विद्यमान होते असें म्हणावयास कागदपत्रांचा कांहीं आधार मिळत नाहीं असें दाखविलें आहे.

अन्यपक्षीं मोरेश्वर पंडितराव यांचें इ. १६७३ मधील दानपत्र उपलब्ध आहे. श्री. राजोपाध्ये यांनीं आपल्या पुस्तिकेंत तें दिलेलें आहेच. या पत्रावरून या वेळीं मोरेश्वर हे पंडितराव होते. अर्थात् रघुनाथभट उपाध्ये हे पंडितराव नव्हते हें निर्विवाद सिद्ध होतें. मोरेश्वर पंडितराव यांचीं इ. १६७३ ते १६८६ पर्यंतचीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत. इ. १६७७ मधील तीन पत्रें, इ. १६७९ मधील एक व इ. १६८१ मधील एक अशीं पत्रें शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २ मध्यें दिलेलीं आहेत. अर्थात् या पत्रांच्या काळींहि रघुनाथभट हे पंडितराव पदावर नव्हते हें स्पष्ट दिसून येतें. येथें प्रश्न असा उत्पन्न होतो कीं जर इ. १६७३ पासून मोरेश्वर रघुनाथ हे पंडितराव पदावर आहेत तर मध्येंच इ. १६७४ त राज्याभिषेकाच्या वेळेपुरतेच रघुनाथभट हे पंडितराव कसे असतील? ग्रँट डफपासून श्री. सरदेसायांपर्यंतच्या इतिहासकारांनीं अष्टप्रधानांत रघुनाथ पंडितराव दिलेले असले तरी तेवढ्यावर न विश्वासतां त्यांचे आधार कोणते आहेत तें तपासून पाहणें प्राप्त आहे.

श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं शिवाजीच्या अष्टप्रधानांत रघुनाथराव पंडितराव दिलेले आहेत व या माहितीस सभासदीचा आधार दिलेला आहे. श्री. सरदेसाई यांनीं मोरेश्वर रघुनाथ यास दानाध्यक्ष नेमल्याचा उल्लेख केला आहे. तेथें शिवचरित्रसाहित्य खंड १ लेखांक ९० याचा आधार दिलेला आहे. हा लेखांक म्हणजे सभासदीच्याच एका अप्रसिद्ध प्रतींतील उतारा आहे. यावरून असें दिसून येतें कीं, शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं अष्टप्रधान कोण कोण होते याविषयीं अस्सल कागदपत्रांचा कांहीं आधार उपलब्ध नाहीं. विश्वसनीय म्हणतां येईल असा एकच आधार उपलब्ध आहे तो म्हणजे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सभासदीचा. सर्व इतिहासलेखकांनीं हाच एक आधार घेतलेला आहे. तेव्हां तो आधार आपण काळजीपूर्वक तपासून पाहिला पाहिजे.

कै. का. ना. साने यांस सभासदीच्या दोन प्रती उपलब्ध झाल्या. एक प्रतापगड प्रत व दुसरी महाड प्रत. यांपैकीं प्रतापगड प्रत त्यांनीं छापिली आणि महाड प्रतींत जें न्यूनाधिक आढळलें तें टीपेंत दिलें. सभासदीची तिसरी प्रत श्री. कृ. वा. पुरंदरे यांस सासवड येथें उपलब्ध झाली. तींतील अष्टप्रधानांसंबंधीं उतारा त्यांनीं शिवचरित्र साहित्य-खंड १ ले. ९० मध्यें छापला. याप्रमाणें उपलब्ध झालेल्या सभासदीच्या तिन्ही प्रतींत अष्टप्रधान कोण कोण होते तें दिलेलें असून प्रत्येकापुढें एकाचा आंकडा घातलेला आहे. या आठ प्रधानांपैकीं एकाचा उल्लेख या प्रतींत पुढीलप्रमाणें आला आहे.

सासवड प्रत—१ रघुनाथ पंडितराव यांचे पुत्रास दानदीक्षिती, या उल्लेखांतील दानदीक्षिती म्हणजे दानाध्यक्षपद. दानाध्यक्ष हें अष्टप्रधानांतील एक पद असून तें रघुनाथभट उपाध्ये, जे एके वेळीं पंडितराव होते, त्यांचे पुत्रास देण्यांत आलें असा या उल्लेखाचा सरळ अर्थ होतो.

महाड प्रत—रघुनाथ पंडितराव त्यांचे पुत्रास दानाध्यक्ष. सासवड प्रतीशी या उल्लेखाचें साम्य असून अष्टप्रधानांतील हें पद रघुनाथभटाचे पुत्रास दिलें असाच याचाहि अर्थ होतो.

प्रतापगड प्रत—रावजी पंडितराव होते त्यांचे पुत्र रायजीराज (?). रायजीराज या शब्दापुढें संपादकांनीं प्रश्नचिह्न केलें आहे. रायजीराज या शब्दावरून रायरायां या शब्दाचें स्मरण होतें. आणि वाटतें कीं न जाणों रायजीराज हेंच या प्रधानपदाचें नांव असेल ! या प्रधानपदाचें नांव कोणतेंहि असो तें पद रावजी पंडितराव होते त्यांचें पुत्रास दिल्याचें येथें सांगितलें आहे. पण येथील रावजी पंडितराव हा उल्लेखहि सदोष दिसतो. तेथें रघुनाथरावजी पंडितराव असावें हें उघड दिसतें. चिंतामणराव वैद्य यांनीं रघुनाथराव पंडितराव असेंच म्हटलें आहे. रघुनाथभट किंवा रघुनाथपंत म्हटलें नाहीं. रघुनाथराव म्हटलें आहे तेंहि या रावजी शब्दामागें रघुनाथ हा शब्द जोडूनच म्हटलें आहे हें उघड आहे.

या तिन्ही प्रतींवरून असा निश्चय होतो कीं अष्टप्रधानांतील हें विशिष्ट पद रघुनाथ-भटांचे पुत्रास दिलें गेलें. पुत्रास हा शब्द तिन्ही प्रतींत आहे पण त्या पुत्राचें नांव मोरेश्वर हें कोणत्याच प्रतींत दिलेलें नाहीं. पुत्र कोणाचा हें सांगण्यापुरताच रघुनाथ पंडितरावांचा उल्लेख पुत्रास या शब्दामागें आलेला आहे. या पुत्रास जें पद दिलें तें म्हणजे दानाध्यक्षपद. दानाध्यक्षपद म्हणजेच पंडितरावपद होय. या प्रधानाचें काम कोणतें तें पंडितराव या शब्दानें समजत नाहीं तें दानाध्यक्ष या शब्दानें बहुतांशीं समजतें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वैद्य काय सरदेसाई काय सर्वच इतिहासकारांनीं "रघुनाथ पंडितराव यांचे पुत्रास दानाध्यक्ष (किंवा दानदीक्षिती)" याचा अर्थ रघुनाथ भटांस पंडितरावपद दिलें आणि त्यांचे पुत्रास दानाध्यक्षपद दिलें असा केला आहे तो बरोबर नाहीं हें नम्रपणें येथें निदर्शनास आणून देणें प्राप्त आहे. इतिहासकारांच्या अर्थाप्रमाणें अष्टप्रधानांचीं पदें सांगत असतां मध्येंच एक दानाध्यक्ष हें नववेंच पद सांगितलें असें म्हणावें लागतें. तें सर्वथा अयुक्त होय. शिवाय दानधर्माची व्यवस्था पाहणें हें पंडितरावांचेंच काम होतें व तें त्यांनींच केलेलें आहे असें अनेक पत्रांवरून दिसून येतें.

शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं राजव्यवहारकोश झालेला नव्हता. त्यापूर्वी अष्टप्रधानांपैकीं सहांचीं नावें सरनोबत, डबीर, पेशवा, मुजुमदार सुरनीस व वाकनीस अशीं फार्सीच होतीं. न्यायाधीश व पंडितराव यांस मात्र फार्सी नांवें नव्हतीं. इतर पदांप्रमाणेंच पंडितराव हें पदहि राज्याभिषेकाच्या कित्येक वर्षें अगोदरपासून अस्तित्वांत होतें. पंडितराव या अर्थाचा दानाध्यक्ष हा शब्द प्रायः राज्याभिषेकसमयीं योजण्यांत आला असावा. तथापि पंडितराव हा शब्दहि योजनेंत राहिलाच आणि त्यामुळें पंडितराव व दानाध्यक्ष हे दोन्ही समानार्थक शब्द एकत्र योजिलेलेहि आढळतात. उदाहरणार्थ, मोरेश्वर पंडितरावाचें इ. १६८६ मधील एक पत्र राजवाडे खंड ८ ले० ४० मध्यें दिलें आहे. त्याखालीं 'मोरेश्वर पंडितराव दानाध्यक्ष' अशी सही आहे. तीवरून पंडितराव म्हणजेच दानाध्यक्ष असें दिसून येतें.

परमानंदकाव्यम् या ग्रंथांतहि याचें प्रत्यंतर मिळतें. उदाहरणार्थ पुढील श्लोक पाहा—

क्रोधः पंडितराजं च दानधर्माधिकारिणम् ।
स्तेयं सेनापतिं सर्वं नास्तिक्यं च पुरोधसम् ॥ पृ. ५१ श्लो. १२३

तसेंच, क्रोधः पंडितराजस्य दानधर्माधिकारिणः ।
प्राविशत् विवशीभूतं मानसं मानसंयुतः ॥ पृ. ५४ श्लो. ३३

पंडितराव व दानधर्माधिकारी म्हणजे दानाध्यक्ष एकच असें या श्लोकावरूनहि कळतें.

एवंच, शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं रघुनाथभट उपाध्ये हे पंडितराव होते व त्यांचे पुत्र दानाध्यक्ष होते अशी जी इतिहासकारांची समजूत आहे ती पूर्णपणें अवास्तव आहे.

पंडितराव म्हणजेच दानाध्यक्ष. शिवराज्याभिषेकसमयीं मोरेश्वर रघुनाथ हेच दानाध्यक्ष म्हणजे पंडितराव होते, असें सभासदीवरून कळतें.

इ. १६७३ तलें मोरेश्वर पंडितरावांचें पत्र उपलब्ध आहे तत्पूर्वीच मोरेश्वरास पंडितरावपद मिळालेलें असणार. म्हणजेच त्या पदावर रघुनाथभट नसणार हें उघड आहे. ते त्या पदावर नसण्याचें कारण त्यांचा मृत्यु किंवा रुग्णतेमुळें अक्षमता यांपैकींच प्रायः असणार. यांपैकीं अक्षमता हेंच कारण संभवनीय वाटतें. कारण त्यांस क्षयरोग झाल्याचें परमानंदकाव्यम् यांत सांगितलें आहे. तसेंच ते शिवाजीच्या मृत्यूपूर्वीच दिवंगत झाल्याचेंहि त्याच काव्यांत सांगितलें आहे. त्यावरून रघुनाथभट उपाध्ये हे इ. १६७२ ते १६८० या कालांत केव्हांतरी निवर्तले हें निश्चित होतें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

७ गोविंद नरहरी : प्राचीन मराठींतील एक प्रचंड ग्रंथकार

(श्री. रा. शं. नगरकर, पुणें.)

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी कै. केशव नारायण वैद्य यांनी गोविंद नरहरीच्या भागवत-टीकेसंबंधीं एक टिपण केसरीकडे प्रसिद्धीसाठी पाठविलें होतें. परंतु कांहीं कारणामुळें तें तिथें तसेंच पडून राहिलें. त्यानंतर हें टिपण त्यांचे नातजावई सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ श्री. ग. वि. अकोलकर यांच्याकडून मराठींतील ख्यातनाम संशोधक श्री. रा. चिं. ढेरे यांचेकडे आलें. तें टिपण व भा. इ. सं. मंडळाच्या हस्तलिखितसंग्रहालयांतील गोविंद नरहरीची भागवतेतर रचना पाहून मी येथें गोविंद नरहरीचा स्थूल परिचय आपणांपुढें मांडीत आहे.

गोविंद नरहरीच्या या भागवतटीकेची प्रत श्री. वैद्यांना मिळाली, ती नगर जिल्ह्यांतील कोतुळ या गावीं. गोविंदाची हा भागवतटीका श्रीधरी टीकेच्या आधारें लिहिलेली आहे. या भागवतटीकेचे दुसरा, सातवा व अकरावा, हे स्कंध पूर्ण असून तिसऱ्या स्कंधाचे १५ ते ३३ अध्याय उपलब्ध आहेत.

दुसऱ्या स्कंधाच्या अखेरीस पुढीलप्रमाणें प्रतलेखनाचा तपशील आलेला आहे.

" शके १७१२ साधारण नाम संवत्सरे माघ शुद्ध एकादशी सोमवार चतुर्थ प्रहरे समाप्तः " ॥ भिकाजी त्र्यंबक देशपांडीयोपनाम भोजापुरकर वास्तव्य अगस्तिक्षेत्र (अकोले, जि. नगर) एन स्वसंग्रहार्थ वा पठणार्थ लिखितं ॥

या अध्यायांत आलेलें कविवृत्त असें—

ग्रंथाची प्रेरणा—या भागवती टीकेची प्रेरणा आपणांस सर्व सज्जनांचें हृदय असलेल्या श्रीकृष्णाकडून मिळाली व त्याच्यामुळेंच प्रपंचांतील उपद्रवांपासून आपलें चित्त मुक्त झालें व म्हणून जगतांत संतांहून कोणी श्रेष्ठ नाहीं. या सत्समागमामुळेंच आपण धन्य झालों, असें गोविंद नरहरी म्हणतो.

कुलवृत्तान्त—गोविंद भारद्वाजगोत्री होता. त्याच्या मातेचें नांव निरा, वडिलांचें नांव नरहरी व बहिणीचें नांव गौतमी असें आहे. शंकर हें त्याच्या गुरूंचें नांव आहे. केशव आदि बंधुगणाची त्यानें नोंद केली आहे. पण ते कितीजण बंधु होते, हें निश्चित सांगतां येत नाहीं.

निरा नामे देहजननी । तैसीच गौतमी भगिनी ।
या शंकरीच वसती वाटे मनीं । धन्य कुल भारद्वाजाचें ॥
ज्याचे गोत्रोद्भव बंधुगण । केशवादि परमसज्जन ।
अहो सज्जनसंपर्कें करून । परम विश्रांति आहे (२७०–२७१)

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

या भागवती टीकेचा प्रारंभ आपण पंढरपूर क्षेत्रीं केला असें सांगून—

देवगिरी सन्निध वर्ततां । सार्ध योजस पूर्वेसी ।
खडकी राजधानीचे ठाईं । द्वितीय स्कंधाची समाप्ति ॥

अशी माहिती दिलेली आहे. शके १५८१ विकारी नाम संवत्सरांत भाद्रपदांतील कृष्णपक्षांत शिव चतुर्दशीला द्वितीय स्कंध पुरा झाला आहे.

या ग्रंथाचे अक्षर सुवाच्य आहे, कमींत कमी अवाच्य नाहीं, असें वैद्यांनीं आवर्जून नोंदविलें आहे.

गोविंदाचें वाङ्मय— याशिवाय भा. इ. सं. मंडळांतील धर्माधिकारी (अकोलें) संग्रहांत याच गोविंदाची महाभारत टीका उपलब्ध आहे. या टीकेंत स्त्रीपर्व, सौप्तिकपर्व (हें पर्व अपूर्ण आहे), शांति-मोक्ष-धर्म-पर्व व उद्योगपर्व हीं उपलब्ध आहेत. याशिवाय या मंडळाच्या हस्तलिखितांच्या सूचींत याच्या सूतसंहितेचीहि एक नोंद आहे. परंतु तें हस्तलिखित मात्र मला पाहायला मिळालें नाहीं. शांतिपर्वाच्या अखेरीस आपण अध्यात्म-रामायण-टीका व अनुशासन-पर्वावरील टीका पूर्ण केली असें सांगून भीष्मपर्वावरील टीका पुरी केल्याचें सांगितलें आहे. यावरून कमींत कमी महाभारताच्या तेरा पर्वांवर यानें टीका लिहिली असावी असें अनुमान निघतें.

हस्तलिखितांचें अक्षर—मंडळांतील याचीं सारीं हस्तलिखितें पाहतां या साऱ्या हस्तलिखितांचें अक्षर अगदीं अवाच्य आहे असें म्हणावें लागतें. त्यांतील लिपि ही देवनागरी आहे, हें प्रथमदर्शनीं खरें वाटूं नये, इतकें हस्ताक्षर वाईट आहे. या हस्त-लिखितांची लिपि देवनागरी असली तरी तिच्यांत मोडी अक्षरांची रेलचेल आहे. मी स्वतः व श्री. ढेरे असे दोघेजण मिळून दोन तास झगडल्यानंतर जेमतेम पंधरावीस ओव्या लावतां आल्या.

अशा प्रकारच्या या कठीण मामल्यांतून जेवढी माहिती या गोविंदाच्या रचने-बद्दल देतां येईल. तेवढी देण्याचा प्रयत्न केला आहे.

(१) गंगेच्या उत्तरतीरावर देवगिरी नांवाचा एक पुण्य पर्वत आहे. त्या पर्वताच्या पूर्वेस खडकी (औरंगाबाद) नांवाच्या गांवीं शके १६८१ युवासंवत्सरीं श्रावण वद्यांत मंगळवारीं शिवरात्रीचे दिवशीं स्त्रीपर्वाच्या लिखाणाची समाप्ति झाली.

(२) सौप्तिकपर्व अपूर्ण असल्यामुळें त्याविषयीं कांहींच माहिती देतां येत नाहीं.

(३) उद्योगपर्वाची अध्यायसंख्या १९५ इतकी असून पत्रसंख्या १००६ इतकी आहे. या पत्रांचा आकार सामान्यपणें १५″ × ७″ असा आहे. यावरूनच उद्योगपर्वाच्या ओवीसंख्येसंबंधीं कल्पना केलेली बरी !

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हें पर्व देवगिरीच्या सान्निध्यांत असलेल्या खडकी गांवीं शके १६१६ युवा संवत्सरात कार्तिक शुद्ध षष्ठी सोमवार या दिवशीं लिहून पुरें झालें आहे.

गोविंदानें शके १६१६ ला युवा संवत्सर होतें, असें नोंदविलें आहे. पण ही त्याची नजरचूक असावी. शके १६१६ ला भाषसंवत्सर येतें, याच पर्वाच्या बाबतींत फक्त हा शक संवत्सराचा मेळ बसत नाहीं. इतर सर्व पर्वांच्या शक-संवत्सरांचा मेळ बसतो, म्हणून त्याची इथे नजरचूक असावी असें दिसतें.

(४) शांतिपर्व हें खूपच प्रचंड काम आहे. या पर्वाची अध्यायसंख्या ३६२ इतकी आहे. श्लोक-संख्या १४००० आहे. या श्लोकांवरील टीकेच्या ओव्या ३७१६० इतक्या आहेत. या पर्वांत आधार म्हणून श्रुति-स्मृतींतील ३४० श्लोक घेतलेले आहेत. श्लोक, ओव्या व प्रमाणवचनें मिळून एकूण सर्व संख्या ५१५०० इतकी आहे.

या टीकेची समाप्ति एलपूर सन्निधानी खडकीनामक गांवांत शके १६१६ शुक्ल-संवत्सरी मार्गशीर्षमासी चतुर्दशीच्या दिवशीं झाली.

गोविंदाची भाषा काव्यमय नाहीं. ती रामदासी वळणाची, सहज सुलभ असली तरी वास्तवाचें अधिष्ठान लाभलेली आहे. आपल्या रचनेला तो केवळ ' टिपण ' म्हणतो. गोविंदाला काव्य जमत नसलें, तरी तो श्लोकाचा अनुवाद मात्र उत्तम करतो. यावरून तो एक समर्थ अनुवादक आहे असें म्हणावें लागतें. गोविंद दर वेळेस प्रत्येक श्लोकाचा स्वतंत्र अनुवाद देतो अशांतला भाग नाहीं. कांहीं वेळेस तो सलग श्लोकांचा अनुवाद करतो. गोविंद हा समर्थ अनुवादक आहे या माझ्या विधानाच्या पुष्ट्यर्थ मी प्रथम कांहीं मूळ श्लोकांचा मराठी अनुवाद देतों व नंतर त्याची टीका देतों—

" राजानें युद्ध न करतांच आपल्या उत्कर्षाची अभिवृद्धि करावी. कारण, हे प्रजाधिपते, युद्ध करून विजय मिळविणें हें कमी प्रतीचें आहे असें सांगितलें आहे. जर मुळांतच चांगली दृढता नसेल, तर न मिळालेल्या वस्तु मिळविण्याविषयींची इच्छा करूं नये. कारण, मुळामध्यें दृढता नसेल तर राजाला लाभ होत नाहीं. ज्या राजाचें राष्ट्र विशाल असून त्यांतील प्रजा संपन्न आणि राजावर प्रेम करणाऱ्या असतात व जो स्वतः संतुष्ट असून सचिवांचें पोषण करीत असतो, तो राजा दृढमूल होय. कारण प्रजा आणि सचिव हीं राज्याचीं मूलें त्याच्या राष्ट्रांत बळकट असतात. ज्याचे योद्धे अत्यंत संतुष्ट, गोडीनें वागविलेले आणि शत्रूंशीं अत्यंत प्रतारणा करणारे असतात, तो राजा जरी सैन्य कमी असले तरी ही पृथ्वी जिंकून घेतो. ज्याच्या राजधानींतील व राष्ट्रांतील लोक प्राण्यांवर दया करणारे व धनधान्यसंपन्न असतात, तो राजा दृढमूल होय. कारण प्रजा हें राज्याचें मूळ आहे. ज्या वेळीं आपला प्रताप गाजविण्याची चांगली वेळ आली आहे असें वाटेल, त्या वेळीं बुद्धिमान् राजानें शत्रूची भूमि आणि द्रव्य हरण करण्याची इच्छा करावी. ज्याचें ऐश्वर्य वृद्धिंगत झालें असून जो सर्व प्राण्यांवर दया करितो व चलाख असून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आपलें संरक्षण करितो, त्याच्या राष्ट्राची अभिवृद्धि होते. जो राजा उत्कृष्ट प्रकारें वागणाऱ्या लोकांशीं असत्यपणें वागतो, त्याचा आत्मा परशूच्या योगानें छिन्न झालेल्या वनाप्रमाणें त्या कर्माच्या योगानें क्षीण होतो. राजानें शत्रूंचा सदैव वध केल्याशिवाय ते कमी होत नाहींत. पण क्रोधाचा नाश कसा करावा हें ज्याला माहीत असतें, त्याला मुळीं शत्रूच नसतात. सभ्य लोक ज्याचा तिरस्कार करतात तें कृत्य सुज्ञ राजानें करूं नये. जें कृत्य शुभ आहे अशी मनाची खात्री होईल, त्याजवरच लक्ष ठेवावें. आरंभिलेलें कार्य शेवटास नेऊन सुखाचा अनुभव घ्यावा, अशी जो इच्छा करितो, त्याचा इतर लोक अपमान करीत नाहींत व त्याला स्वतःलाहि पश्चात्ताप पावावा लागत नाहीं. जो राजा ह्या लोकांमध्यें अशा प्रकारच्या वर्तनाचें अवलंबन करितो, तो इहलोक व परलोक ह्या दोहोंनाहि हस्तगत करून उत्कर्ष पावतो. (शां. प. अ. ९४)

यावरील गोविंदाची टीका अशी—

वामदेव बोले गा सुमना । जो विजय करीजे युद्धे विना ।
तेणे तो राजा पावे वर्धना । तो श्रेष्ठ नृपती ॥

जो युद्ध करूनि जय पावत । तो जघन्य राजा निंद्य बोलिजेत ।
अतेव रायें करावें कृत्य । विनायुद्ध जय प्राप्तीचे जें तें ॥

तत्प्राप्तीचें लक्षण । सांगतों मी करी श्रवण ।
अलभ्य अर्थाची इच्छा न करून । लभ्य अर्थाचीच करावी ॥

दृढमूल असावे राये जाण । दुर्बळ मूळ असता नृपेन ।
अर्थ लाभ नव्हे तया लागून । रायासी कदापि नृपति ॥

अतेव दृढ पाहिजे नृपति । तया दृढमूळाची आइके स्थिति ।
जयाचे देशजन स्फीत वसती । संपन्न धनधान्य संपत्तीने ॥

अराजक असतां देशी । प्रजा राजप्रिया विशेषी ।
संतुष्ट पुष्ट प्रधान ज्या रायासी । दृढमूळ बोलिजे तो राजा ॥

जयाचे योध्ये संतुष्टवीर । वेतनें पावती बळवान समग्र !
एकमने वसती परस्पर । राजकार्यी तत्पर सर्व ॥

ऐसे असतां सेनाबळ । जया नृपाचे सकळ ।
जो अल्पदंडे ही भूपाळ । जय पावे पृथवीचा ॥

जया रायाते पुरजन ! तथा देशींचे लोक प्रजागण ।
अनुरक्त असती राजहित इच्छुन । की मानिले असतां ते सर्व राये ॥

तेणें सर्वहि संतुष्ट वसती । धनधान्यादि समृद्धी जया अति ।
ऐसा जो राजा सर्व लोक सहिती । दृढमूळ बोलीजे तया ते ॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गोविंद नरहरीची ओवी कोणत्याहि बंधनांत गोवतां येईल असें वाटत नाहीं. मात्रा, चरण, यमक या सर्व बाबतींत बंधनातीत ही ओवी आहे. गोविंदाला बंधन आहे तें फक्त एकच व तें म्हणजे त्याच्या मनांतील अर्थ संपला की त्याची ओवीहि संपते.

गोविंदाचीं हीं सर्व हस्तलिखितें त्याच्या स्वतःच्या हस्ताक्षरांतील असावींत. कारण उद्योगपर्वाच्या प्रारंभींच त्यानें 'स्वटीका प्रारंभा' असें लिहिलेलें आहे. ज्या वळणाचें हस्ताक्षर उद्योगपर्वाचें आहे, त्याच वळणाचें हस्ताक्षर इतर सर्व पोथ्यांचें आहे.

गोविंदाचें जन्मगांव जरी निश्चित सांगतां आलें नाहीं, तरी त्याचें दीर्घकाळ वास्तव्य खडकी येथें म्हणजे औरंगाबादला होतें असें निश्चितपणें म्हणतां येतें. भागवत, शांतिपर्व, उद्योगपर्व, स्त्रीपर्व इ. सर्व पर्वांच्या लिखाणाची समाप्ति औरंगाबादला झालेली आहे व तशी प्रत्येक पर्वाच्या अखेरीस नोंद आहे. भागवत टीकेच्या रचनेचा काळ शक १५८१ असा असून शांतिपर्व, स्त्रीपर्व, उद्योगपर्व यांची रचना अनुक्रमें शक १६११, १६१६ व १६१७ मध्यें झालेली आहे; म्हणजे भागवताच्या रचनाकाळापासून उद्योग-पर्वाच्या रचनेपर्यंत ३६ वर्षें तो खडकीला (औरंगाबाद) राहात असावा असें वाटतें.

त्याच्या गुरूचें नांव शिव आहे व त्याचें उपास्य दैवतहि शिवच असावें. प्रत्येक पर्वांत या गोष्टीची श्लेषार्थानें नोंद झालेली आहे.

उदा. या शंकरीच वसती वाटे मनीं । (भागवत)
जाली शिवकृत हो सुबुद्धि । (शां. प.)

याची शिवभक्ति इतकी उत्कट आहे कीं, बहुतेक कृतींची सांगतां त्यानें चतुर्दशीला म्हणजे शिवरात्रीच्या दिवशीं अथवा सोमवारीं केलेली आहे. याशिवाय त्याच्या आजूबाजूचें सारें वातावरणहि बारा ज्योतिर्लिंगांपैकीं घृष्णेश्वराचें सान्निध्य, कैलास लेण्याचा अतूट सहवास इ. शिवप्रभावित आहे. एवंच त्याच्या गुरूचें नांव शिव व उपास्य दैवतहि शिव आहे. म्हणून गोविंद नरहरी हा शैवसंप्रदायी असावा, असें वाटतें.

एक नवीन धागा—रामदासी संशोधन, खंड दुसरा यांत नोंदविलेल्या क्र. ११३३ या बाडांकांत अवधूत-कृत 'कपिलगीते' ची माहिती आहे. या अवधूताचा गुरु कोणी गोविंद आहे. त्याच्या ग्रंथाच्या रचनेचा स्थलकाल पुढीलप्रमाणें आहे—

शालिवाहन शके महिमा । सोळासे तीस नामा ॥
सर्वधारी संवत्सर प्रेमा । वसंत संभ्रमा चैत्र मासु ॥
पर्वतामाजी देवगिरी । खडकी ग्राम बाईजी पुरी ।
केशवाचिया मंदिरीं । ग्रंथ निर्धारीं संपविला ॥

या अवधूताचें स्थळ व काळ पाहतां तो नरहरी गोविंदाच्या स्थळकाळाशीं जमणारा आहे. यावरून हाच गोविंद नरहरी या कपिलगीताकार अवधूताचा गुरु असावा, असें वाटतें. जाणत्यांनीं अधिक खात्री करून घेतली पाहिजे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

८ योगिनी मीरा

(श्री. विनायकराव करमळकर, पुणें.)

प्रस्तुत लेखाचें शीर्षक वाचून वाचक थोडे बुचकळ्यांत पडतील; पण लेख आमूलाग्र वाचल्यानंतर व त्यांत दिलेले संदर्भ मूळ मिराबाईचे उपलब्ध काव्याशीं ताडून पाहतां त्यांची आम्हांप्रमाणेंच खात्री पटेल. जीवनाचें प्रत्येक क्षेत्रांत असंख्य स्त्री व पुरुष रत्नें या भारतभूमींत आपल्या जाज्वल्य तेजानें चमकून गेलीं. त्यांत राजस्थानांत जन्म पावलेली मीराबाई ही केवळ या देशांतच नव्हे तर अखिल जगतांत मानवजातीचें एक भूषण मानलें जाईल यांत दुमत व्हावयासारखें नाहीं. आधुनिक इतिहासज्ञांनीं आतां आवश्यक पुराव्यानें तिचे चरित्रावर नवीनच प्रकाश पाडला आहे. तथापि अद्याप कित्येक गोष्टींबाबत विद्वानांत एकमत झाल्याचें आढळून येत नाहीं. भक्तिरसामध्यें ओतप्रोत आप्लावित अशी मीरा. हिनें आपलीं दोन्ही कुळें उद्धरिलीं. एवढेंच नव्हे तर ईश्वरानुग्रहाची एक पायवाटच भावी साधक भक्तांकरिता तिनें उपलब्ध करून दिली. चरित्राचा अगदीं धांवता आढावा घेऊन मीराबाई ही भक्त होतीच, तथापि ती निर्गुण भक्त व अद्वैती होती हें आमचें म्हणणें आम्ही सुज्ञ वाचकांचे विचारार्थ पुढें ठेवणार आहों. राजस्थानचा इतिहास लिहिणारे कर्नल टॉड यांचे म्हणण्याप्रमाणें राणा कुंभ यांची ती पत्नी नाहीं तर सिसोदिया कुलावतंस राणा सांगा=संग्रामसिंह याचा ज्येष्ठ पुत्र भोजराज याची धर्मपत्नी होय. तिचा जन्म संवत् १५५५ ते १५६१ यांतला असून निधनकाल संवत् १६०३ समजण्यांत येतो. म्हणजे तिला केवळ अठ्ठेचाळीसच वर्षांचें अल्प आयुर्मान लाभलें. भारतेंदु हरिश्चंद्र यांचे मतें मृत्यु संवत् १६२० ते १६३० या दरम्यान केव्हां तरी असावा. त्यांनीं आपलें मत उदयपुर दरबारचीं कांहीं महत्त्वपूर्ण कागदपत्रें पाहून बनविल्याचें समजतें. उत्तर भारतीय संतपरंपरेचे विद्वान् लेखक व संतवाङ्मयाचे गाढ अभ्यासी श्री. परशुराम चतुर्वेदी यांचाही विचार, सदर मतास सर्वस्वी पाठपुरावा करणारा दिसतो.

बालपणापासून मीराबाईचें भक्तिप्रेम भगवान् श्रीकृष्णाकडे असल्याचें दिसून येतें. तिच्या अखिल काव्यांत देवाला संबोधून राम, रमैय्या, हरि, अविनासी, निरंजन, अंतरजामी व इतरहि शब्दप्रयोग आले आहेत तथापि ती गिरधारी वा गिरधर गोपाल या नांवानें पूर्वसाधनांत ईश्वराला संबोधिते. भक्तिमार्गांतील तिची वाटचाल 'सगुणाचेनि आधारें निर्गुण पाविजे निर्धारें' अशी अद्वैती स्वरूपाची आहे.

भक्त व भगवान् या द्वैतभक्तींतून तिनें आपली परिणति उन्नत आत्मोपलब्धींत केली ती सुरतशब्दयोग या योगप्रणालीद्वारा होय हें आमचें वैयक्तिक मत आहे. आमचें असें मत व्हावयाचें मुख्य कारण म्हणजे मीराबाईचें उपलब्ध काव्य होय. काशी नागरीप्रचारिणी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सभेचे विद्वान् कार्यवाह स्वर्गीय पंडित व्रजरत्नदास यांचें 'मीराँ माधुरी' आम्ही समग्र अभ्यासिलें आहे; त्यांनीं सदर ग्रंथाची रचना ऐतिहासिक पुराव्यावर संशोधनपूर्वक अत्यंत परिश्रमानें केली असल्याचें ग्राह्य मानूनहि आम्हांस अत्यंत खेदपूर्वक असें म्हणावें लागतें कीं, हा ग्रंथ अतिरेकी वैष्णवमतावलंबी प्रचाराचा नमुना असून दुराग्रही स्वरूपाचा, सत्यापलापी, विसंगति व कांहीं चुका यांनीं भरलेला आहे. आम्ही आमचे लेखनांत सदर पुस्तकांतील कांहीं अस्सल विधानेंच दाखवितों. विष्णुस्वामीके सम्प्रदायवाले स्वामी ज्ञानदेव पृ० ७७. सेना न्हावी हा रामानंदाचे मुख्य बारा शिष्यांत आहे हें विज्ञ वाचकांस तरी सांगावयास नको. पण तो ज्ञानेश्वरांचा शिष्य म्हणून सांगितला गेला आहे. यांत सत्यापलापाबरोबर ऐतिहासिक असंभाव्य विसंगति आहे पृ. ७४ तुकारामांना स्वप्नांत गुरूकडून उपदेश झाला तो कृष्णचैतन्य म्हणजे गौरांगप्रभूकडून झाल्याचें नमूद आहे! पृ. ३८ डॉ. स्वर्गीय पंडित पीताम्बरदत्त बडथ्वाल हे मिराबाई निर्गुण उपासकच मानतात; पण व्रजरत्नदासांना सांप्रदायिक अभिनिवेशांत हें मत अत्यंत झोंबतें! म्हणून ते आपल्या ग्रंथांत म्हणतात 'मीराको न किसीसे दीक्षा लेनी थी न इन्हें किसी गुरूकी आवश्यकता पडी' वास्तविक पाहतां, सूरदास हे वल्लभाचार्यांचे शिष्य नसून ते अष्टछाप वैष्णव कवींत गणले जात; त्यांचेप्रमाणें मिराबाईनेंही वल्लभांचे शिष्यत्व स्वीकारावें याबद्दल सदर सांप्रदायिकांकडून तिजवर अवांच्छनीय दबाव आणला गेला; पण ती प्रबुद्ध म्हणून या गोष्टीस बधली नाहीं; हें सत्य असून याचा पडताळा बाबू संपूर्णानंद यांचे योगप्रवाह पुस्तकांत सांपडतो. त्यांतील दोन तीन प्रसंग त्यांनीं व्रजभाषा गद्य-साहित्यांत विश्वसनीय आणि सर्वमान्य असलेल्या 'चौरासी तथा दोसो बावन वैष्णवों की वार्ता' या गोस्वामी गोकुलनाथजी यांच्या दोन ग्रंथांवरूनच घेतलेला आहे. ४० वी वार्ता अशी—गोविंद दुबे म्हणून कोणी साचोरा ब्राह्मण मिराबाईचे घरीं पाहुणचारास राहिला. तो तिच्या सत्संगतीस कांहीं दिवस होता. पण ही बातमी गोस्वामीस कळतांच तें त्यांस कदाचित् न आवडून त्यांनीं एक श्लोक सदर दुबे यास लिहून पाठविला त्याबरोबर हा गृहस्थ मीराबाईचा निरोपहि न घेतां तडक गुरूकडे चालता झाला. वार्ता ५४ मधील मजकूर असा—मीराबाईचे पुरोहीत रामदास यांनां मीराबाईचें दैवत श्रीठाकुरजी श्रीकृष्णापुढें आपले गुरु श्रीवल्लभाचार्य यांचे स्तुतिपर एक पद म्हटलें. त्यावर मीराबाईनें त्यांना दुसरें पद श्रीकृष्णविषयकच म्हणावयाची विनंती केली त्यावर हे एवढे संतापले कीं त्यांनीं शेलक्या शिव्या हांसडून यापुढें तुझें मुखावलोकन नको म्हणून मीराबाई क्षमाशीलतेनें परत बोलवीत असतां रवाना झाले! त्यांचे स्वतःचे शब्द— अरी दारी राँड यह कोन को पद है, यह कहा तेरे खसमकी भूँड है, जा आज ते तेरो मुँहड़ौ कब हूँ न देखूँगा!' (भारतेंदुजीकृत उत्तरार्ध भक्तमालमध्यें १२३ अनुक्रमाच्या वार्तेत गोविंद दुबे व १३६ व्या वार्तेत रामदास यांचा उल्लेख आहे)

वार्ता ९२ मधील संदर्भ—कोणी कृष्णदास अधिकारी वल्लभानुयायी द्वारकेहून परत गोकुळ वृंदावनास जातांना वाटेंत मीराबाईचे गांवास थांबले. पण मीरा वल्लभसांप्र-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दाखी नाहीं म्हणून तिजकडे उतरले नाहींत! तिजकडे हरिवंश, हरिराम, व्यास आदी कित्येक वैष्णव ते वेळीं उपस्थित होते. इतक्यावरहि मीराबाईनें वल्लभाचार्य गादीसाठीं कांहीं भेट त्यांस पाठविली. तीहि त्यांनीं स्वीकारली नाहीं. या अशाच चमत्कारिक वर्तनाबद्दल कोणा वैष्णवानें कृष्णदासाकडे पृच्छा केली असतां 'वल्लभाचार्यशिष्यांना ही तिची भेट स्वीकारून काय करावयाचें? असलें उर्मट उत्तर देऊन इतक्या वैष्णवांचें मेळाव्यांत मीराबाईचा अवमान करून सदरप्रसंगीं 'सबकी नाक नीची कर दी' यांत धन्यता मानली!!

मीराबाई कुलांतील मेडता निवासी हरिदास, राजा जयमल हे सपरिवार श्रीनाथजी शिष्य झाले. अजबकुंवरबाई ही मीराची ज्येष्ठ भावजय श्रीविठ्ठलनाथाची शिष्या झाली. हीबरोबर नाथजी चौपट खेळत; पण हिच्या त्यांनीं तेथेंच राहावें या अत्यंत आग्रहपूर्वक म्हणण्यास त्यांनीं रुकार दिला नाहीं. विठ्ठलनाथ व त्यांचे सात पुत्र जीवित असेपावेतों आपण गोवर्धन पर्वतावरच राहूं, मग येथें येऊं या म्हणण्यानुसार त संवत् १७२८ मध्यें राणा राजसिंह यांचे राज्यकालांत मेवाडमध्यें आले. असो. मीरा वल्लभानुयायी नाहीं हें प्रथमारंभीं नमूद करणें भाग आहे. मीराबाईचीं म्हणून समजल्या जाणाऱ्या पदांत ती असंदिग्ध शब्दांत आपणांस निर्गुणवादी संत रोहिदास अर्थात रैदास यांची शिष्या म्हणविते.

(१) गुरु मिलिया रैदासजी दीन्ही ग्यानकी गुटकी पद २४
(२) मीराँने गोविंद गुरु मिलिया रैदास पद २९
(३) रैदास सन्त मिले मोहि सद्गुरू, दीन्ही सुरत सहदानी
(४) गुरु रैदास मिले मोहि पूरे, धुरसे कमल भिडी पद १५९

एकंदर मीराचे काव्यसंभारांत असे दुसरेहि उल्लेख सांपडूं शकतील. 'कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया' हें रामकृष्ण मिशनचें सर्वमान्य ग्रंथ होत. त्यांतील दुसऱ्या खंडांत पृष्ठ २५२ वर मीराबाई रैदासशिष्या म्हटलें आहे. It is said that Zali the queen of Chitor received her initiation into the religious life from him (Raidas) and Mirabai also completed her spiritual discipleship under his guidance. Worshipper of Girdharilal at first was later initiated by Raidas into the worship of one and infinite.

त्याचप्रमाणें बेलवेडियर प्रेस अलाहाबाद यांत आधारपूर्वक छापलेल्या संतवाणी-मध्यें हेंच मत दिलें आहे. अशा स्थितींत मीराबाई ही माध्व संप्रदायांतर्गत चैतन्यांची वा रघुनाथदास यांची शिष्या असावी हा आपला तर्क श्रीवियोगी हरी व व्रजरत्नदास कोणत्या आधारावर प्रतिपादितात तें समजत नाहीं. त्यांनीं उद्धृत केलेलें पद निर्विवाद प्रक्षिप्त आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अब तो हरी नाम लौ लागी ।
सब जगको यह माखनचोरा, नाम धर्‍यो बैरागी ॥
कहँ छोड़ी वह मोहन मुरली कहँ छोड़ी सब गोपी ।
मूँड़ मुँड़ाई डोरि कटि बाँधी माथे मोहन टोपी ॥
मातु जसोमति माखन कारन बाँध्यो जाको पाँव ।
श्याम किशोर भए नवगोरा चैतन्य जाको नाँव ॥
पीताम्बरको भाव दिखावै, कटि कोपीन कसे ।
दास भक्तकी दासी 'मीराँ' रसना कृष्ण बसे ॥

मीराबाईचे इतर काव्याशीं ही भाषा मेळ खात नाहीं. संन्यासी चैतन्यांनीं कधीं टोपी घातल्याचें चित्र नाहीं. मीराबाईचे मुखीं गिरधर, गोपाल, असें सगुण लीला-विग्रही शब्द आहेत 'कृष्ण' हा शब्द नाहीं. चैतन्यांना कृष्णावतार समजून कोणी ही रचना मागून केलेली आहे. आनंद शंकर ध्रुव यांचे 'नरसी अने मीरा' या ग्रंथांत ते म्हणतात, 'हमें मीराके चैतन्य सांप्रदायके साधुओंके साथ समागम होनेकी विशेष संभावना ज्ञात होती है'. या त्यांच्या म्हणण्यास नकार द्यावयाचें कारण नाहीं; पण त्यावरून ती चैतन्यसांप्रदायी ठरत नाहीं. श्रीरूप गोस्वामी हे भक्तिरसामृतसिंधूचे कर्ते. यांचे पुतणे जीव गोस्वामी हे सप्त गोस्वामींपैकीं एकटेच ब्रह्मचारी व कर्मठ होते. त्यांना त्यांचे चुलत्यानें एक राधा-दामोदराची मूर्ति पूजनीय म्हणून दिली. तिच्या भजन-पूजनांत ते दंग असत. त्यांची वृंदावनांत मीराबाईनें भेट घेतल्याचा प्रसंग आहे. हे प्रकृति म्हणजे स्त्रीमुखावलोकन करीत नसत. अर्थात् मीराबाईसहि भेट पडद्यांत बसून अवगुंठनपूर्वकच घ्यावी लागली. पण जीव गोस्वामीच्या या 'पणा' बद्दल मीरा-बाईस सखेद आश्चर्य वाटलें. तिनें साभिप्रायच भागवताचा हवाला देऊन विचारिलें 'आपल्या भक्तींत प्रकृति-पुरुषभेद अद्याप शिल्लकच आहे म्हणावयाचा? एरवीं 'वासुदेवः पुमानेकः स्त्रीमयं इतरज्जगत्' असें मी तरी समजते. व्रजप्रदेशांत तरी श्री-गिरधारीलालजीशिवाय अन्य पुरुष असल्याचे मला माहीत नव्हतें. मीराबाईची कृष्ण-चंद्राबद्दलची ही अभूतपूर्व निष्ठा पाहून श्री जीवस्वामी ओशाळगत झाले यांत नवल तें काय? ते मीराबाईस प्रेमादरपूर्वक भेटले आणि उभयतांचा कांहीं काल हरिकीर्तनभज-नांत व्यतीत झाला. असें ऐतिहासिक रीत्या नमूद आहे. जीव स्वामी स्पष्ट माध्व सांप्रदायी म्हणजे द्वैती. त्यांचें उपास्य दैवत युगुल म्हणजे राधा-कृष्ण. मीराबाईचे पदांत राधेचा नामनिर्देशहि नाहीं! द्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत, भेदाभेद या तत्त्वज्ञानांचा ती योगारूढ भूमिकेवरून 'मूले कुठारः' या न्यायानें आपल्या काव्यांत निकालच लावते! अशा स्थितींत ती जीव गोस्वामीशिष्या कसें मानावयाचें? मीराबाईचें सांसारिक जीवन पुढें तीनशें वर्षांनीं झालेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर इचेप्रमाणें खडतर होतें. राजकुलांतील सुयोग्य वीरपत्नी, वीरस्नुषा, अकाल वैधव्य, स्वजनविरोध इत्यादि

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पण पारमार्थिक जीवन महाराष्ट्रभक्तवर नामदेवांप्रमाणें आरंभीं भक्त पण रैदास अनुग्रहानंतर अपरिच्छिन्न, ब्रह्मस्वरूप, अनन्यभक्तरूप होतें पृष्ठ ९८. अशा स्थितींत मीराचे कोणी गुरु नव्हते, ती केवळ गिरधारीलाललाच गुरु मानी. ब्रह्मानंदरसाहून अनंत गुण अधिक वैष्णवरस आहे भेदाभेदतत्त्वज्ञानप्रचार १४२-४७ पृष्ठ आणि त्यापेक्षांहि कोटि गुण अधिक उज्ज्वल श्रीगोकुलेन्दूचा मधुररस आहे पृष्ठ १४५, हें सर्व व्रजरत्नदास यांचे लिहिणें कट्टर वैष्णवावलंबी प्रचाराचा नमुना म्हटलें जाईल! पण श्रीकृष्णपादपुनीत आणि तथाकथित गुरूची गादी असलेल्या व्रजमंडळांतून मीरा कित्येक वर्षे पूर्वी द्वारकेस निघून जाते व सासर-माहेरचे आग्रह, तसेंच तिच्या समकालीन असलेल्या वल्लभ व गौरांग चैतन्यसंप्रदायाचें, संत मेळाव्याचें तिला कायमचें विस्मरण पडून ती द्वारकेहून परत मात्र फिरत नाहीं. ते कां, याचें व्रजरत्नदास उत्तर देत नाहींत! तिचें वृंदावन-दर्शन व तदुपरान्त द्वारकाप्रयाण १५९५-९६ संवताचें समजलें जातें व तेथेंच ती भजन-पूजन व हरिकीर्तनांत शेष जीवन व्यतीत करते आणि मृत्यूसमयीं मी ठाकुरजीचा निरोप घेते या सबबीखालीं द्वारकेच्या प्रस्तरमूर्तीत विलीन होते. आमचे मतेंही भूतजयसिद्धि असून ती योगीच करू शकतात. योगी इच्छामरणी असतात आणि निधनसमयीं आपला देह पंचभूतांपैकीं कोणत्याहि महाभूतांत विलीन करितात. इतर संतांचींहि अशीं उदाहरणें आहेत. ऐतिहासिक पूर्णसंशोधनयुक्त मीराबाईचे पदांचा एकही अस्सल संग्रह उपलब्ध नाहीं व तिचे नांवावर ग्रंथरचना नाहीं. आहे ती फुटकळ पदांची. साधारण पांचशेंपावेतों संख्या आहे. राजस्थानी बोलभाषा, व्रजभाषा व गुजराती यांचें त्यांत मिश्रण आहे. तिच्या पदांतून योगविषयक पदांचे ओझरते उल्लेख देऊन आम्हांस हें कार्य संपवावें लागत आहे. अद्वैतज्ञान हें स्वसंवेद्य अनुभवाचें असल्यानें त्यांत भक्तिपर शब्दांचें प्राचुर्य नसणार हें उघड होय; संकेतानेंच ही स्थिति फुटकळ शब्दमाध्यमानेंच समजणार, हें मनांत बाळगून वाचकांनीं निम्न संदर्भावरून मूळ पदें अभ्यासावीं असें आम्हांस सुचवावेंसें वाटतें.

(१) तिच्या उपलब्ध पदांत श्रीकृष्ण वा आखरी छाप ' मीराके प्रभु गिरिधर नागर, यापेक्षां अधिक वेळां राम, रमैय्या, अविनासी, अंतरजामी, हरि, निरंजन हीं संबोधनें अपरिच्छिन्न स्वरूपास उद्देशून आहेत.

(२) तिचें उन्मार्गगामी मन मदोन्मत्त हत्तीप्रमाणें अदम्य तें ' सिरपर सद्गुरु हाथ धरनेसे ' अंकुश मारल्यासारखें स्थिर होतें. हा दीक्षाविधि आहे. यानें इंद्रियअगोचर अनुभव प्राप्त होतात.

(३) ' वस्तु अमोलक दी म्हाँरे सतगुरु ' ही अमोलिक वस्तु म्हणजे मंत्र चैतन्यनाम. याच्या जपानें आत्मोपलब्धि होते. ३१० पद.

(४) पँचरँग चोला = पांच भौतिक शरीर ' ज्यांचे पति परदेशीं असतील, त्यांनीं त्यांस प्रेमपत्र पाठवावें, माझे प्राणनाथ माझे हृदयींच आहेत. जों बिछुडे हैं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पियारे से भटकते दर बदर फिरते हम न कायर हैं हममें हमें होशयारी क्या-कबीर. चंद्र, सूर्य, पृथ्वी, जल, पवन, आकाश हीं विलीन होतील पण तो अविनासी (प्रियकर) अटल राहील. ती सुरत-निरत अर्थात् ध्येयनिर्वाणाकडे अखंड स्मरण-जपाची प्रवाह-रूप ज्योत लावते. यांत मन ही वात, अगम अर्थात् अद्भुत प्रेमरूपी तेल, दिनरात जळत आहे, या प्रेमभट्टींत जो मन विरसून टाकणारा मद आहे, त्याचें तिनें आकंठ पान केलें आहे पद ८७-१३०.

(५) ' गगन मँडल पै सेज पियाकी, किस बिध मिलणा होय ' ही सहस्रारांत प्रियकराची भेट. ' सूरी उपर सेज ' ही मूर्ध्न स्थानीं भेट. कबीर सांगतात ' ऊँचा महल अजब रँग बंगला साँइको सेज तहाँ लगो फुलनकी '

(६) ' जोत में जोत मिला जा ' जीव-शिव ऐक्य. परमात्म्याशीं मीलन. २६९.

(७) " सबदका ध्यान लगाया रे " हा गुरूपदिष्ट शब्द हा श्वासांत गुंफून ध्यान करणें, सत् नाम, सुरत शब्द २७७.

(८) " तुम बिच, हम बिच अंतर नाही, जैसे सूरज धामा " सूर्य व त्याचीं किरणें किंवा प्रकाश यांतलें अद्वैत. जीवो ब्रह्मैव नापरः २८१.

(९) " सोतो सुरत जगाऊँ, अमरापुर पाऊँ " निर्विकल्प समाधींत अखंड परमाप्त पद प्राप्ति मिळवणे २८३.

(१०) ' मेरे पार निकस गया सतगुर मार्‍या तीर ! ' शब्दरूपी बाण; यानें पूर्ण देहनिरास होतो. ३०३.

(११) " सुरत सैल असमानी, रैदास संत मिले मोहि सतगुरु, दीन्ह सुरत सहदानी " सुरत शब्दरूपी निसानी वा आत्मस्वरूपाची खूण रैदासप्रदत्त ३०७.

(१२) " रिमझिम बरसैं मेंहड़ा चहुँ दीसि चमकै दामिणी, गरजै घन भारी हो " धर्म-मेघसमाधींत, अखंड अनाहत नादश्रवण आणि कोटिसूर्यसमविद्युल्लतेचा प्रकाश " सतगुर भेद बताइया खोली भरम-किवारी हो. गुरूपदेशानें देहाध्यास कायमचा गेला. ' सब घट दीसे आतमा ' अगम अटारी, सर्वत्र स्वरूप-दर्शन अविनाशी सौंधावर-सहस्रारांवर ३१४

(१३) " ऊँची नीची राह रपटीली, पाँव नहीं ठहराय, सोच सोच पग धरूँ जतनसे बार बार डिग जाय ' क्षुरस्य धारा·····दुर्गमं वदन्ति। ऊँचा नीचा महल पियाका ·····सुरत झकोला खाय,सहस्रदलकमलांत अविरत अद्वैतध्यान जमत नाही पैंड पैंड बट मार -षड्रिपू व आवरण, विक्षेप किंवा असंभावनाविपरीतभावनारूपी विघ्नें. ३१४

(१४) " आसन माँड मन अडिग होय बैठा " प्रत्याहारसाधना.

(१५) " पियका पलंगा जा पौहूँगी " सहस्रारांत अविचल स्थिति.

(१६) प्रेम धंधुरा, सुरतकी धुनी लास्यभाव, अनाहत नाद, ध्यानरूपी वस्त्र

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

(१७) होलीमें बिनसुरके छतीसो राग, बिनताल पखवाज, अनेकविध अनाहत नाद-नादश्रवण "त्रिकुटिमहलके झरोकेसे झाँकी लगाकर सुन्न महलमें सुरत जमाना' भूमध्य प्रदेशांतून शून्य प्रदेशांत म्हणजे निरालंबस्थितींत राहणे.

(१८) साहेबका घर खजूर पेड जैसा बेहद ऊँचा परम पुरुषार्थ. जो चढ पाता है उसको अपूर्व रस चखनेको मिलता है. अननुभूती पराभक्ती प्रसाद मिळतो. नमुन्यादाखल मीराचे काव्यांतून योगविषयाचें हें दिग्दर्शनमात्र आहे. हा विषय सामान्यांस नवखा व कठीण. तशांत अनुभवगम्य असल्यानें हें काव्य कालौघांत नष्ट झालें! सामान्य-जनांस प्रेम, भक्ति, जगनश्वरता, विषयवैरस्य, भेटीचो उत्कंठा, विरह आदि काव्य बुद्धि-गम्य तें टिकून राहिलें.

(१९) आज कालिकी नाही मीरा जद यह ब्रह्मांड छायो. तुका म्हणे आम्ही विधिचे जनिते। स्वयंभ आयते केले नव्हो. १४५२.

(२०) पोथी म्हारी खांडाकी धार। ज्ञान निभावण राणो है नही ॥

---

९ गणपति पुळें येथील शेंड्ये घराण्याची हकीकत

(श्री. य. न. केळकर, पुणें)

शेंडये हे चित्पावन ब्राह्मण. गोत्र कौशिक, सूत्र आश्वलायन. यांचें घराणें सुप्रसिद्ध गणपतिस्थान पुळें येथील पुराणिक म्हणून ख्यात असलें तरी यांचें मूळ गांव मौजे कासारी, ता. सैतवडें. हे तेथील खोत होते. 'श्रीशके १५०९ वरिखे सर्वजित संवत्सरे वैशाख वद्य १२ रविवार तदिनी (१५८७) नारप्रभु, कृष्णप्रभु व वामनप्रभु या मौजे नरळच्या आगरकऱ्यांनीं मौजे कोळिसऱ्याचे खोत हरि भास्कर व किटो भास्कर यांस कांहीं कृतोपकार फेडण्यासाठीं म्हणून कांहीं जमिनी दिल्या त्या बक्षीसपत्रावर मौजे वाडद, कळ्झोडी, निवेंडी, वरवडें इत्यादि गांवांच्या खोतांच्या साक्षी वगैरे आहेत. त्यांत 'केशवभट सेंडये खोत मौजे कासारी' याची एक साक्ष आहे. म्हणजे इ. १५८७ पासून तरी हें घराणें कासारीची खोती अनुभवीत होतें हें निश्चित आहे.

पुळ्याच्या गणपतीपुढें सकाळ-सायंकाळ पुराण सांगण्याचा वतनी वृत्ति यांना थोरल्या शिवाजीमहाराजांनीं करून दिली आहे व ती आज तागायत चालू आहे. वृत्ति कशी मिळाली यासंबंधीं हकीकत पुढें इ. १८०१ सालीं कासारीच्या खोतीच्या वतनाबाबत जें निवाडपत्र पेशवे सरकारचें झालें आहे त्यांत दाखल झालेल्या कैफियतींत आली आहे ती अशी—" पेशजी आम्हां रामचंद्रभटाचे वडील विष्णुभट कासारीहून येऊन मौजे मालगुंड येथें राहिले होते. त्यांचे पुत्र महादेवभट शेंडये पुराणवेत्ते जाणोन श्रीगणपति वाडा पुळे कसबा नेवरे येथें नित्य पुराण श्रीसंनिध सांगावयाची वृत्ति कै० थोरले शिवाजीमहाराज छत्रपति यांणी करून दिल्ही व देशक व खोत महाजन व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ग्रामस्थ वाडा मजकूर यांणी घर बांधावयास व शाकभाजी करावयास जमीन वतनी करून देऊन पुराणाचें वृत्तीचें पत्र करून दिल्हे."

पुढें "राज्याभिषेक शके ११ रक्ताक्षीनाम संवत्सरे अश्विन बहुल ११ शुक्रवारी" (२४-१०-१६८४) मोरेश्वर पंडितराय यांनीं 'गणेशभट महादेवभट सेंडे पुरानीक ॥ पुळें यांस 'ब्राह्मण योग्य वैदिक देखोन धर्मादाय तांदूळ कैली कोठीमापे मण ·॥· दहा जोंवरी वेदमूर्ति क्षेम असतील तोंवरी प्रतिवर्षी प्रविष्ट करणें' म्हणून आज्ञापत्र देशाधिकारी व लेखक प्रा राजापूर यांस सादर केलें.

यानंतर राज्याभिषेक शक १७ प्रमोद संवत्सरे पौष शुध १ रविवासरे या दिवशीं (२१ १२ १६९० इ.) पंडितरावांनीं नरसो सुरो सुभेदार व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रभावळी यांस आज्ञापत्र दिलें कीं, "वे. मू. मादेभट विष्णुभट सेंडे पुराणिक वास्तव्य मौजे मालगुंड ता। सैतवडे सुभा मजकूर (प्रभावळी) यांस पेसजी धर्मादाव तांदूळ पांच मण होते यैसियासी वेदमूर्ति योग्य कुटुंबवत्सल पाहोन साल मारी पेसजी धर्मादाव देखील जाजती तांदूळ कोठीमापे मण ·॥· दाहा पेसजी देविले होते. जाजती साल मजकुरीं १० मण येकूण दाहा मण रास वे. मू. क्षेम असतील तोंवरी प्रतिवर्षी प्रविष्ट करणें."

पण पुढील काळांत ही नेमणूक निर्वेध चालली नाहीं म्हणून महादेवभट शेंड्यानें पन्हाळ्यास छत्रपतीकडे जाऊन आपलें गाऱ्हाणें सांगितलें कीं, "आपणास धर्मादाऊ तांदूळ कोठीमापें दाहा मण व आपले पुत्र गणेशभट यांस दाहा मण येकूण एक खंडी तांदूळ ठरले आहेत. परंतु यापैकीं चतुर्थांश म्हणजे पांच मणच पावतात. येणें करून आपला अवकात चालत नाहीं. त्यावरून रामचंद्र नीळकंठ अमात्य यांनीं छ १४ (१०) रजब सबा तिसैन अलफ (२८·३·१६९७ इ.) रोजीं रामाजी अनंत सरसुभेदार व कारकून प्रांत राजापूर यांना आज्ञापत्र देऊन भटजी मजकुरास 'धर्मादाऊपैकीं निमे तांदूळ पांच मण व पुत्रास चतुर्थांश ८२॥ येकूण साडेसात मण तांदूळ कोठी मापें' देण्यास फर्माविलें व प्रतिवर्षी देत जाणें म्हणून बजाविलें."

पण ही व्यवस्था पुढें कांहीं वर्षांत विस्कळीत झाली आणि योगक्षेमापुरतें शेंड्यांना उपलब्ध होईना. तेव्हां इ. १७२१ सालीं महादेवभटाचा मुलगा हरिभट कोल्हापूरकर छत्रपतीकडे गेला व त्यानें अर्ज केला कीं, "आपण श्रीसंनिध देवालयीं अखंड पुराण सांगत असतो. कुटुंबवत्सल आणि अनुत्पन्न. पूर्वी राजगृहीहून धर्मादाय बहुत होता. प्रस्तुत त्याप्रमाणें पावत नाहीं. म्हणून कांहीं भूमि दिल्यानें कस करून योगक्षेम चालवूं" तेव्हां भगवंतराव रामचंद्र अमात्यांनीं २४–११–१७२१ इ. रोजीं त्यास नवीन वृत्ति भात जमीन वाडा मजकूरपैकीं शेत बनाम चिरटिया बा। भिडे ठिकाणें दोन व चोंडा ठिकाण एक एकूण तीन ठिकाणेपैकीं जमीन वीस पांडाचे बिघेनें जमीन ८१ दिल्ही कुलबाब व कुलकानू हाली पटी व पेस्तर पटीसहित, खेरीज हकदार करून इनाम दिली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हरभट शेंडये चांगला व्युत्पन्न होता आणि तत्कालीन पद्धतीप्रमाणें प्रमाणशास्त्रादि ग्रंथाचा संग्रहहि त्यानें चांगला केलेला होता. जातिवाद किंवा शास्त्रवाद पडत तेव्हां निर्णयासाठीं आधारग्रंथ पाहावे लागत ते अशा शास्त्र्यांच्या संग्रहांतून आणविले जात. या संबंधांत १७२३ सालीं जंजिरेकरांनींहि ब्राह्मणांचा कांहीं जातिवाद पडला होता तेव्हां हरभट शेंड्यांकडून शयाद्रि खंडांतील क्षेत्रमाहात्म्याची पोथी घेऊन येण्यास पाचारण केलें होतें असें पुढील पत्रावरून दिसतें.

२३-१०-१७२३

हुा

महाबतशार हरभट सेंडे पुराणिक मामला वाडा गणेश पुले दाम महाबतहु अजी सिदी साद सुबेदार सलाम सुा आबा इशरीन मया व अलफ आंके ब्राह्मणाचे जातीचा मुकद्दिमा पडिला आहे याबदल शयाद्रिखंडांतील क्षेत्रमाहात्म्याची पोथी तुम्हानजीक आहे ते द्यावी ... असे तर शयाद्रिखंडांतील पत्रें ... सुभा कसबे अंजनवेलीचें ... तुम्हांस कांहीं आजार देणार हे जाहीर जालें यावरून डोलीस वेठे देविले असत तर डोली करून तुम्ही पोथी घेऊन सुभा येणें हकीकत मनासी आणून सबेच तुम्हांस रजा दिली जाईल मालूम होये रा छ १४ सफर हे किताबत

यानंतर पानपतच्या सुमारास शेंड्यांच्या वतनी पुराणास पुन्हा एकदा खो बसण्याचा प्रसंग आला. बाळंभट व महादेवभट बापट हे वादास उभे राहिले व पुराण सांगण्याची वृत्ति आपली आहे शेंड्यांची नव्हे, असें म्हणूं लागले. तेव्हां धोंडभट शेंड्यांनीं पंचाईत करावी म्हणून सांगितलें. तेव्हां समस्त देशक व ग्रामस्थ जमून कसबे नेवऱ्याच्या आदित्यनाथाच्या देवळांत मनसुबी करण्यांत आली. बापटांना कोणताच लेखी पुरावा देतां आला नाहीं व त्यांच्यातर्फे साक्षीदारहि कोणी आला नाहीं! शेंड्यांनीं पुरावा भरपूर दिला. अखेर श्रीची प्रसिद्धता जाहली तेव्हांपासून शेंड्यांकडे पुराणाची वृत्ति परंपरागत अविच्छिन्न चालत असतां बापटांनीं वाद घातला परंतु त्यांनीं एकहि साक्षीदार दिला नाहीं व भोगवट्याचे कागद भुक्तलिखित आपणांजवळ नाहींत असें सांगितलें. उलट शेंड्यांनीं वृत्तिपत्र व इतर पुरावा दिला तेव्हां बापटांस दूर करून शेंडे मजकुरास पुनरपि त्यांची वृत्ति देण्यांत आली व तसें रत्नागिरी तालुक्याचा तेव्हांचा सुभेदार मोराजी सिंदे यानेंहि अधिकृत वृत्तिपत्र शेंड्यांस इ. १५-७-१७६४ रोजीं करून दिलें!

दिनांक ४-११-१७६५ रोजीं थोरल्या माधवराव पेशव्यांनीं आपल्या खास उळट्या 'न'च्या शिक्क्यानिसी धोंडभट शेंड्यास पुळ्याच्या पुराणवृत्तीचें, वंशपरंपरा-वृत्तीचें पत्र करून दिलें. त्या पत्रांत म्हटलें आहे "धोंडभट बिन हरभट कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन विदित केलें, कीं पुळें येथील देवासंनिध नित्य पुराण सांगावयाची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पुराणवृत्ति वतनी आपले वडिलांस (पूर्वजांस) देशमुख व मोकदम व देशकुलकर्णी कर्यात मजकूर याणी वंशपरंपरेनें करून दिली. त्याजप्रमाणें श्रीमंत थो. शिवाजी महाराज यांणी पत्रें करून दिल्ही त्याजप्रमाणें वृत्ति चालत आहे-परंतु राजपत्रें आपणांजवळ होती ती शामलाचे दंग्यांत दग्ध झाली " वगैरे. श्री. शिवाजी महाराजांचें अस्सल राजपत्र शेंड्ये दप्तरांत कां आढळत नाहीं याचा खुलासा आतां आपोआपच होतो. असो.

इ. १७७७ पर्यंत शेंड्यांचें पुराणवृत्तीचें वतन निर्वेध निभलें. परंतु त्या सालीं वाडा मजकूरचा महादेवभट बापट कोरळकर उपटला व त्यानें गणपतीजवळ पुराण व कथादिक सांगण्याचें वतन आपलें आहे असा दावा सांगून अडथळा करण्यास सुरुवात केली. म्हणून धोंडभट, सदाशिव केशव सुभेदाराकडे तक्रार घेऊन गेला. त्याने धोंडभटाचा पुरावा पाहून त्याच्या घराण्याकडेच ही वृत्ति सवाशें-दीडशें वर्षांपासून चालू आहे; सबब त्याचाच हक्क आहे असा निर्णय दिला. तेव्हां महादेवभट बापट कोरळेकर कर्यात मजकूरच्या देशकांकडे तक्रार घेऊन गेला. देशकांनीं धोंडभट शेंड्यास बोलावून नेऊन विचारलें, कीं तुम्ही देशक व भोंवरगांवचे पंच यांचा निर्णय मान्य कराल कां ? धोंडभटानें तें तत्काळ कबूल केलें. त्या मनसुबींतहि शेंड्यासारखाच निकाल झाला.

तरीहि हें वृत्तीचें भांडण बापट सोडीना. इ. १७८९ सालीं पुन्हा तें सुरू झालें. या वेळीं पुराणाची वृत्ति धोंडभट वारल्यामुळें त्याचा मुलगा हरभट चालवीत होता. त्याला महादेवभट बापटाचा मुलगा धोंडभट व दुसरा नारायणभट बापटाचा मुलगा बाळंभट असे दोघे अडथळा आणूं लागले. हें भांडण वास्तविक इ. १७८५ पासूनच सुरू झालें होतें. हरभट शेंड्यानें सरकारची द्वाही दिली तरी बापटांनीं मानली नाहीं आणि प्रत्यक्ष मारामारीहि केली. तेव्हां हरभट पुन्हा पुण्यास पेशवे दरबारीं फिर्याद गेला. तेव्हां सवाई माधवरावांनीं इ. २०-८-१७८९ रोजीं शेंड्याचा हक्क मान्य करून तसा अंमल करण्याचें आज्ञापत्र तेथील अधिकाऱ्यांस म्हणजे देशमुख-देशपांड्यांस लिहिलें. ह्यांत स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, "बापटास निक्षून ताकीद करून त्याचें पुराण मना करणें शेंड्याचेंच चालू देणें "

या शेंडे घराण्यांतील हा धोंडभट मोठा खटपट्या, कर्तृत्ववान पुरुष निपजला. त्यालाच वंशावळींत अर्जक पुरुष म्हणून दाखविला आहे. पुराणाची वृत्ति शेंड्यांची पुरातन होतीच, पण त्याच्या जोडीस धोंडभटानें नानासाहेब पेशव्यांकडून पुळ्याच्या गणपतीला पूजा, नैवेद्य, नंदादीप, अभिषेक, दक्षिणा इत्यादींसाठींहि सालीना अडीचशें रुपयांची नेमणूक करवून घेतली. नानासाहेब पेशव्यांनीं ते स्वतः पुळ्याला दर्शनास गेले असतां धोंडभटास तसें आश्वासन दिलें होतें; पण तें प्रत्यक्ष कागदपत्रानिशीं अमलांत यावयाचें राहिलें होतें. पुढें मोरो बल्लाळ थोरल्या माधवरावाजवळ कारभारी असतां त्यांनीं त्या आश्वासनांचीं पेशव्यांस आठवण करून दिली. सबब पेशव्यांनीं लगोलग नेमणूक चालू करून तशीं पत्रेंहि करून दिलीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पण या नेमणुकीलाहि दायाद उभे राहिलेच ! कोकणासारख्या बुभुक्षित प्रांतांत तरी शितें दिसलीं कीं भुतें उभीं राहण्याला बिलकूल वेळ लागत नसे. त्याचा प्रकार असा-धोंडभट निवर्तल्यावर त्याचा पुत्र श्रीधरभट वरील नेमणूक अनभवूं लागला. श्रीधरभटाची एक मावसबहीण होती. तिचा भ्रतार निवर्तला. त्याचा पुत्र लहान, तेव्हां त्यांना मदत करावी म्हणून वरील शेंडये २०।२५ रुपये त्याला म्ह. वरवडेकर जोशाला देऊं लागला. हा मुलगा म्हणजे बापू जोशी मोठा झाल्यावर शेंडये यांनीं ती मदत बंद केली. त्याबरोबर भाचा बापू जोशी वरवडेकर यांना दुर्बुद्धि सुचली. त्यांनीं धोंडभटाच्या हातचें एक बनावट पत्र तयार केलें. त्या पत्रांत वरवडेकर जोशास दरसाल ४० रुपये देऊं असें आश्वासन दिलेलें होतें. तें पत्र दाखवून तालुका कचेरींतून त्यानें परस्पर तीन सालांचे १२० रुपयेहि उपटले ! तेव्हां शेंडये जागे झाले व त्यांनीं ग्रामस्थांकडे निर्णयासाठीं पंचाईत नेमून मागितली. कोतवडे येथील ग्रामस्थांवर पंचाईत नेमून देण्यांत आली. तेव्हां पंचाइतीनें वरवडेकर खोटे व पंचहि खोटे म्हणून ठरविलें. पण पंचायतीचा निकालहि बापू जोशी मानीना. त्यानें माधवराव रामचंद्र कानडे पुण्यांत कारभारी होते, त्यांजकडून सनद करून घेतली. त्यांत मजकूर कीं "श्री मोरो बल्लाळ पटवर्धन यांजकडील रामाजी गणेश साठे हे आमचे मामा याणी धर्मादायाचें कृत्य करून घेतले आम्ही लहान म्हणून शेंड्यांच्या नांवें सनद घेतली व तुम्हांस दर साल ४० रु देऊं असें पत्रहि लिहून दिले."

शेवटीं शेंडयांनीं हा वाद पुण्यास दुसऱ्या बाजीराव पेशव्यांकडे नेला. तेथें शहानिशा होऊन तेथेंहि जोशी लबाड ठरले. तेव्हां पेशव्यांनीं २८-८-१७९८ रोजीं लक्ष्मण राम यांस आज्ञापत्र पाठवून वरवडेकर जोशी यांस दिलेले पैसे परत घेऊन शेंडयास देण्यास फर्माविलें. असा हा पुळ्याच्या शेंडये पुराणिकांच्या पुराणिक वृत्तीचा इतिहास आहे.

या घराण्यासंबंधी सांगण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट ही कीं, यांच्या घराण्यांतील एक महादेवभट शेंडये यांची कन्या हरभट पटवर्धन उपाध्ये मौजे कोतवडे यांना दिली होती. हे हरभट म्हणजेच पेशवाईतील 'वीरांची विलायत' म्हणून गाजलेलें जें पटवर्धन घराणें त्याचे आद्यपुरुष ! हरभट तपस्वी आणि गाणपत्य म्हणून विख्यात होते आणि त्यांचे वंशज सर्वच गाणपत्य झाले. पटवर्धनांचें कुलदैवत पुळ्याचा गणपतीच आहे. पटवर्धन सरदारांनीं शेंडयांबद्दलचा जुना आप्तसंबंध फार अगत्यानें सांभाळला. त्यांनीं शेंड्यांना आपल्या जहागिरींत कांहीं इनामेंहि करून दिलीं होतीं.

येथपर्यंत शेंड्यांच्या पुराणिकवृत्तीचा इतिहास कथन केला. आतां त्यांच्या कासारी येथील अतिपुरातन खोती वतनाचा वृत्तांत थोडक्यांत सांगावयाचा आहे.

१४.६.१८०१ च्या निवाडपत्रांत शेंड्यांनीं पुराव्यासाठीं दोन हाजी रमजालसीचे दाखले हजर केले त्यांचा उद्धार केला आहे. त्यांपैकीं एक महजर इ. १६०९ चा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणजे १९२ वर्षांमागचा होता व दुसरा इ. १६९९ चा म्हणजे १०२ वर्षांमागचा होता. म्हणजे शेंडये घराणें ३५६ वर्षांपूर्वीपासून कासारीचें खोत होतें.

वतन जितकें पुरातन तितकें त्यासाठीं झालेलें वादहि पुरातन असतात. इतर सर्व वतनदार घराण्यांतील वादांप्रमाणें यांच्याहि घरांतील वतनाचे वाद पिढ्यान् पिढ्या चाललेच होते. तथापि त्यांतील एका प्रकरणाची हकीकत महत्त्वाची व मनोरंजक असल्यामुळें तीच तेवढी सांगूं.

या कासारीच्या खोतांचें आडनांव शेंडये, पण गोत्र कौशिक; असें असतां वसईचा शेंडये आडनांवाच्या परंतु शांडिल्य गोत्राच्या एका इसमानें या शेंडयांचें खोतीचें वतन आपलेंच आहे असा दावा सांगण्यास सुरुवात केली व तो जबरदस्तीनें कासारीला घरहि बांधू लागला तेव्हां वाद रंगला.

नानासाहेबांच्या कारकिर्दीत आंग्र्यांचा मुलूख पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर आबा हशमनीस म्ह. सुप्रसिद्ध शंकराजी केशव फडके याला पेशव्यांनीं हुजुरून तालुके मजकूरच्या चौकशीसाठीं पाठविलें होतें. त्यांच्याबरोबर त्याचा हस्तक शंकराजी सुंदर शेंडये वसई प्रांतीं होता, तोहि गेला होता. त्याला तेथें गेल्यावर एक दोघांनीं भर दिली कीं तुम्ही शेंडयेच आहां. कासारीचें खोतीवतन दाबायला सध्यां सुसंधि आहे. शंकराजी सुंदराला तें मानवलें व त्यानें आपला भाऊ कृष्णभट याला कासारीस आणून ठेवला. शंकराजी फडक्यांसारख्या जबरदस्ताचा वशिला असल्यामुळें कृष्णभटानें खोती वतन आपलेंच आहे असें सांगून आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठीं व घर बांधण्या करितां चिरे काढूं लागला. तेव्हां मूळ शेंड्यांनीं त्याला हरकत घेऊन सुभ्याकडे फिर्याद केली. सुभाहून तोतया शेंड्यास मसाला झाला असतां साधनसूत्राची पुरवणी त्याला कांहींच करता आली नाहीं, तेव्हां तो पळून गेला. या खटल्याचा निर्णय झाला त्यांत पुरातन खोत शेंडये कौशिक गोत्री यांचे शरीरसंबंध कोणकोणत्या घराण्यांशीं झाले तें सविस्तर उद्धृत करून वसईकर शेंड्या शांडिल्य गोत्री आहे आणि कासारीचे शेंडये शांडिल्य-गोत्री म्हणावें तर त्यांचे शरीरसंबंध शांडिल्यगोत्रांत न होतें! असें म्हणून वसईकर शेंड्यास खोटा ठरविला आहे. अर्थात् कौशिक गोत्री शेंड्यांचें इतर दस्तऐवजी सर्व पुरावेहि उद्धृत केले आहेतच. हा निवाडा १४–६–१८०१ रोजीं दिनकर विश्वनाथ सुभेदार तालुके रत्नागिरी यांनीं दिला. कासारीकर खोत शेंडे यांजकडून २५ रुपये सरकारनजर घेण्यांत आली.

नानासाहेब पेशवे मुद्दाम पुळ्याच्या गणपतीच्या दर्शनास आपल्या कुटुंबियांसह गेल्याच्या हकीकतीचें पार्वतीबाईसाहेब पेशवे यांनीं अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांना लिहिलेलें एक महत्त्वाचें पत्र खऱ्यांच्या इचलकरंजी संस्थानच्या इतिहासांत छापलें आहे (खंड १ पृ. ४९ लेखांक ४१). पत्रावर तारीख नाहीं, तथापि तें इ. १७५५ पासून १७६० पर्यंतच्या कोणच्या तरी वर्षांतील असावें अशी टीप शास्त्रीबोवांनीं दिली आहे. पण तें

CC-0. Agamnigam Foundation. Digitized by eGangotri Siddhanta Gyaan Kosha Conservation Foundation, Chandigarh

पत्र इ. १७५९ मधील असल्याचें आतां सांगतां येतें. त्यावरून पुळ्याच्या स्वारींत नानासाहेबांबरोबर गोपिकाबाई, आनंदीबाई, राघोबादादा व माधवराव इतकी मंडळी होती एवढें समजतें.

पेशवे डायऱ्यांपैकीं बाळाजी बाजीराव पेशवे खंड २ मध्यें दिलेल्या पेशव्यांच्या मुक्कामांच्या यादींत पुळ्याचा मुक्काम कोठेंच आढळत नाहीं.

---

१० वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प*

(प्रा. म. श्री. माटे, पुणें)

गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रामध्यें निरनिराळ्या क्षेत्रांत स्वार्थत्यागपूर्वक कार्य करीत राहणाऱ्या थोर माणसांची जी एक परंपरा चालूं होती तिचे कै. दत्तोपंत आपटे हे प्रतिनिधी. या अत्यंत सालस व नम्र स्वभावाच्या व्यासंगी विद्वानाच्या स्मृतीस अभिवादन करून मी माझ्या चर्चेला आरंभ करतों

प्रतिपाद्य सूत्र

आजचा व्याख्यानविषय हा सामान्यपणें थोड्याशा अपरिचित अशाच क्षेत्रांतील आहे. तथापि एखाद्या अपरिचित अथवा अल्पपरिचित अशा विषयाचा प्रपंच केल्यास त्याला साद देण्याची रसिकता आपणां सर्वांपाशीं आहे, असा विश्वास धरूनच मीं हा विषय निवडला आहे. व्याख्यानाचा विषय आणि त्यांतील प्रतिपाद्य सूत्र यांची थोडीशी कल्पना मी आरंभींच करून देणार आहे. आपल्या प्राचीन वाङ्मयांत वास्तुशास्त्र किंवा वास्तुविद्या या नावानें ओळखली जाणारी एक शाखा आहे. त्याच्या विषयाची व्याप्ती आणि रचनेचा काळ यासंबंधीं सविस्तर चर्चा पुढें येणारच असली तरी आतां एवढें सांगतां येईल, कीं निरनिराळ्या नगरांचीं व इमारतींचीं विधानें, रचनापद्धती यांविषयीं ह्या ग्रंथांतून माहिती व नियम देण्यांत आलेले आहेत. असें साहित्य गुप्तकालाच्या आरंभापासून ते सोळाव्या शतकापर्यंत निर्माण होत होतें. ह्या आधींच्या काळांत उत्पन्न झालें असलें तरी तसा कालविषयक निश्चित पुरावा आपल्याजवळ नाहीं वास्तुविद्या-विषयक ग्रंथांच्या अभ्यासाला शंभरांहून अधिक वर्षें झालीं आहेत. या शंभर वर्षांत, या ग्रंथांचा अभ्यास विविध दृष्टिकोणांतून करण्यांत आलेला आहे. यांपैकीं एका विशिष्ट अभ्यास-शाखेचाच विचार येथें करावयाचा आहे. प्राचीन भारतीय वास्तुशिल्प आणि वास्तुविद्येवरील ग्रांथिक विवेचन यांचा संबंध कितीसा आणि कोणत्या प्रकारचा आहे हें पाहण्यासाठीं जें संशोधन झालेलें आहे, त्याचीच येथे दखल घ्यावयाची आहे. पुढील चर्चेचा निष्कर्ष स्थूलमानानें सांगावयाचा तर या दोन शाखांचा विशेष असा परस्पर

---

* श. १८८७ द. वि. आपटे स्मृतिदिन व्याख्यान

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
संबंध दिसत नाहीं. वास्तुशिल्प म्हणजे आचरण किंवा practice आणि वास्तुशास्त्र म्हणजे तत्त्व किंवा theory हीं एकमेकांना अनुसरतांना दिसत नाहींत. वास्तुशिल्प हें वास्तुशास्त्राचें आचरण आहे अथवा वास्तुशास्त्र हें वास्तुशिल्पाचें प्रतिबिंब आहे असें म्हणतां येत नाहीं. असा नकारात्मक निष्कर्ष सांगण्यासाठीं एवढें व्याख्यान कशाला असें जर कोणी म्हणेल तर निदान वरवर तरी तें बरोबर दिसेल. तथापि, ज्ञानसाधनेंत अस्तिपक्षीं सूत्रें सिद्ध करण्यास जितकें महत्त्व आहे तितकेंच भ्रममूलक सूत्रें खोडून काढण्यासहि आहे.

भेद

सुरुवातीसच वास्तुशिल्प व वास्तुशास्त्र यांतील भेद स्पष्ट करणें जरूर आहे. वास्तुशिल्प याचा अर्थ प्रत्यक्ष उभ्या असलेल्या वास्तु. जुन्या काळांतील कितीतरी वास्तु आज उभ्या आहेत, कितीतरी आतां नष्ट होऊन गेल्या आहेत. तथापि, तत्कालीन शिल्पांत आणि चित्रांत घरादारांचे, मंदिरांचे, प्रासादांचे देखावे आहेत. या सगळ्यांमधून तसेंच थोड्याफार प्रमाणांत उत्खात अवशेषांवरून वास्तूंच्या दृश्य स्वरूपाची कल्पना येते. रचनेची प्रत्यक्ष पद्धत किंवा आचरण म्हणजे practice तें वास्तुशिल्प. उलट, अशा इमारती कां, कशासाठीं व कशा बांधाव्यात, त्यांतील स्थापत्यविषयक वा सौंदर्य-विषयक तत्त्वें यांची चर्चा करणारें, त्यासंबंधीं यमनियम बांधून देणारें जें शास्त्र तें वास्तुशास्त्र

वास्तुशास्त्र-टीका

आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या एतद्विषयक साहित्यापैकीं कांहीं महत्त्वाच्या ग्रंथांचा निर्देश करावयास हवा. अगदीं आरंभीं म्हणजे इ. १८३४ मध्यें रामराज[1] नांवाच्या गृहस्थांनीं भारतीय वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प यांवरील आपला ग्रंथ प्रसिद्ध केला मानसार व मयमत या शिल्पग्रंथांतील त्यांच्या हातीं लागलेले भाग त्यांनीं प्रसिद्ध केले आणि आकृत्या वगैरे घालून हें वास्तुशास्त्र किती परिपूर्ण आहे हें दाखविण्याचा यत्न केला. दुसरे मोठे संशोधक म्हणजे प्रसन्नकुमार आचार्य[2]. यांनीं १९२७ मध्यें मानसार वास्तुशास्त्राची सटीक आणि सचित्र आवृत्ति प्रसिद्ध केली; आणि या ग्रंथांतील नियमाप्रमाणें वास्तुशिल्पाचे वर्ग, घाट, हे विशद करण्याचा यत्न केला. आचार्य यांनीं याच विषयावर एक कोश व एक ज्ञानकोश प्रसिद्ध केला. यानंतर मनकड[3], भट्टाचार्य[4], मलय्या[5], सोमपुरा[6] असे निरनिराळे अभ्यासक या शास्त्रेकडे वळले आणि त्यांनीं वेगवेगळ्या प्रांतांत उपलब्ध असलेल्या जुन्या वास्तुशास्त्रग्रंथांच्या सटीक आवृत्ति प्रसिद्ध केल्या. विशेषतः भट्टाचार्य आणि त्यानंतर शुक्ल[7] यांनीं केवळ अशा संपादनावरच समाधान न मानतां हाताशीं असलेल्या सगळ्या ग्रंथांचें सार काढून एक परिपूर्ण हिंदु-वास्तुशास्त्र आपणांपुढें ठेवण्याचा यत्न केलेला दिसतो. या सर्व ठिकाणीं, यत्न केला असें म्हटलें आहे याचें कारण या लेखकांचें विवेचन व प्रमेयें हीं आजतरी सिद्धान्त या अवस्थेपर्यंत पोंचलेलीं नाहींत. अगदीं अलीकडे सौराष्ट्रांतील सोमपुरा, नाणावटी,

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ढाकी[८], यांसारखे अभ्यासक, दक्षिणेकडे श्रीनिवासन्[९], तसेंच उत्तरेस कृष्णदेव,[१०] अशा संशोधकांनीं बरेंच वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. आतांपर्यंत उल्लेखिलेल्या या साहित्यास टीका-वाङ्मय म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणजे वेगवेगळ्या ग्रंथांचे लेखक कोण, त्यांचा काळ कोणता, त्यातील प्रक्षिप्त भाग कोणते इ. विषयीं चर्चा आढळते. तसेंच शिल्पशास्त्राच्या आधारानें भारतीय वास्तुशिल्पांतील शाखोपशाखा आणि रूपभेद यांचाहि खुलासा आढळतो.

हिंदी-गुजराती आदि भाषांतील वाङ्मय

ह्या टीकावाङ्मयापैकीं बराच भाग इंग्रजींतूनच प्रसिद्ध झाला आहे. अलीकडे हिंदींतहि कांहीं पुस्तकें झालीं आहेत. गुजरातींत कांहीं महत्त्वाचे ग्रंथ तयार झाले आहेत. मराठीमध्यें असें साहित्य फार थोडें आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी नासिकचे श्री. कृ. वा. वझे यांनीं आपल्या येथेंच शिल्पशास्त्रव्याख्यानमाला गुंफली आणि त्यानंतर मंडळानें त्यांचा शिल्पशास्त्रावरील ग्रंथ पुरस्कृतमालेंत प्रसिद्धहि केला. वझे यांनीं याच सुमारास होळकर ग्रंथमालेच्या वतीनें 'हिंदी शिल्पशास्त्रसार[१२]' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांनीं मुख्यत्वें भृगु आणि कश्यप या संहितांचा उपयोग आपल्या लेखनांत केलेला होता. मराठी वाचकवर्गासमोर, भारतांतील प्राचीन शिल्पशास्त्राचें इतकें सविस्तर प्रतिपादन वझे यांनींच प्रथम केलें असावें. अन्य कोणीं केलें असल्यास वझे यांच्या ग्रंथांत त्याचा उल्लेख नाहीं. आणि इतरत्रहि तसा ग्रंथ कोठें आढळला नाहीं. पुराणादि ग्रंथांत संपादकांनीं विविध विषयांच्या अनुषंगानें कांहीं टीका-टिप्पणी दिल्या असल्या तरी त्या फुटकळ स्वरूपाच्या. त्यावरून या संबंध विषयाच्या आवाक्याची कल्पना येत नाहीं.

टीकावाङ्मयाची माहिती आतांपर्यंत सांगितली. आतां प्रत्यक्ष वाङ्मय पाहावयाचें. हा क्रम थोडासा उलटा आहे हें खरें. आधीं मूळ ग्रंथ पाहावयाचा सोडून आधीं टीका-ग्रंथ पहावयाचा हा उद्योग वास्तविक उरफाटाच. परंतु वास्तुशास्त्राचे ग्रंथ हे केवळ टीकाकारांच्या मदतीनेंच सुगम होत असतात. या टीकाकारांनीं कांहीं ठिकाणीं ते अत्यंत दुर्गम व कित्येक ठिकाणीं वादग्रस्त करून ठेवले आहेत हें खरें; परंतु प्रथम त्यांना वंदन केल्याशिवाय पुढें जातां येत नाहीं हेंहि तितकेंच खरें.

वास्तुशास्त्रें : स्वरूप

वास्तुविद्येचा आढावा घ्यावयाचा म्हणजे आपल्याला अनेक अनुमानें, अनिश्चित माहिती आणि एकांगी विधानें यांना तोंड द्यावें लागतें. यांतील बहुतेक सर्व वाङ्मय संस्कृतमध्येंच आहे आणि त्या त्या ग्रंथांच्या कालापासून तो त्यांतील शब्द-संहति व तांत्रिक संज्ञांचे अर्थ येथपर्यंत प्रत्येक गोष्टींत मतभेद आहेत. हे सर्व वादविवाद थोडा वेळ दृष्टिआड केले, तर कांहीं सामान्य रूपरेखा सांगतां येते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ग्रंथप्रकार

वास्तुशास्त्रें हीं स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानें तसेंच इतर विषयांवरील ग्रंथांचे भाग म्हणून सांपडतात. आतांपर्यंत सगळ्यांना मान्य असलेला सर्वांत प्राचीन ग्रंथ म्हणजे बृहत्संहिता हा गुप्तकालांतील असावा असें समजतात. ह्या ग्रंथामध्यें वास्तुविद्या हा ज्योतिषशास्त्राचा एक भाग समजूनच त्याचें विवेचन केलें आहे. उपविभाग म्हणजे वास्तुविद्या हा ज्योतिषशास्त्राचा वास्तविक उपयोग समजण्यांत येई. कॅमरिंश यांनीं आपल्या 'हिंदु टेंपल'[१३] या ग्रंथांत "Vāstuśāstra belongs to and is applied astrology," असें स्पष्टपणें म्हटलें आहे तें एवढ्यासाठींच. या ग्रंथांतील वास्तुपुरुषमंडल, ब्रह्मशिला, कूर्मशिला आदिविषयींचे सूक्ष्म नियम वाचले म्हणजे प्राचीन कालीं ज्योतिष आणि वास्तु यांच्या अभिप्रेत असणाऱ्या संबंधाची उत्तम कल्पना येते. वास्तुविद्येचा दुसरा ग्रंथप्रकार म्हणजे पुराणें, आगम, स्मृति अशांसारख्या धार्मिक ग्रंथांतील कांहीं भाग. या ग्रंथांचें मूळ उद्दिष्ट निराळें असलें तरी एक आनुषंगिक विषय म्हणून इतर अनेक विषयांबरोबर यांत वास्तुविद्येचीहि माहिती आढळते. या प्रकारांत वैखानसागम, विष्णुधर्मोत्तर, मत्स्यपुराण, अत्रिसंहिता आदींचा समावेश करतां येतो. तिसऱ्या प्रकारांत राज्यशास्त्र वा समाजशास्त्र अशा विषयांवरील ग्रंथांचा समावेश होतो. मनुस्मृतींतील राजधर्मविषयक भागांत दुर्गशिल्पावर विवेचन येतें. कौटिलीय 'अर्थशास्त्रां'त नगररचना, प्रासादरचना, दुर्गरचना यांची चर्चा आढळते. हे तीनहि प्रकार वास्तुशास्त्राला गौण स्थान देणारे म्हणजे ज्यांत वास्तुविद्येचा विचार एकाद्या निराळ्या विषयाचा भाग म्हणून अथवा त्या विषयाच्या अनुषंगानें झाला आहे असे आहेत.

खुद्द वास्तुशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांपैकीं बहुतेक ग्रंथांत शिल्पशास्त्राची म्हणजे वास्तुविद्या, शिल्पविद्या, चित्रविद्या आणि मूर्तिविज्ञान यांसारख्या परस्परसंबद्ध विषयावर चर्चा केलेली आहे. येथें वास्तुविद्या प्रमुख धरून उरलेल्यांचा विचार मुख्यत्वें वास्तुशोभनाच्या अनुषंगानें झालेला आढळतो. या वर्गांतील ग्रंथांची संख्या पुष्कळच मोठी आहे. त्यांतील फक्त कांहींचाच उल्लेख येथें करतां येईल. विश्वकर्मवास्तुशास्त्र, मयमत, मानसार, समरांगणसूत्रधार, प्रासादमंडन, दीपार्णव, अपराजितपृच्छा किंवा तंत्रसमुच्चय हे त्यांतल्या त्यांत जास्त प्रसिद्ध होत. या प्रत्येकांत वास्तुविद्येचा अगदीं सूक्ष्म व सांगोपांग प्रपंच करण्यांत आलेला आहे. यांपैकीं कांहीं म्हणजे प्राचीन व महत्त्वाच्या ग्रंथांतील कांहीं कांहीं भाग घेऊन त्यांत थोडेसें कमीअधिक करून पुढच्या रचित्यांनीं नव्या संहिता तयार केल्या. त्यामुळें या साहित्यविभागाचा आकार फुगत गेला. याशिवाय, वास्तुविद्येंतील एखादेंच बारकें अंग घेऊन त्याचीच माहिती सांगणारे कांहीं लहान लहान ग्रंथ उपलब्ध आहेत. अशा प्रकारच्या विशिष्ट शाखेवरील संहितांमध्यें 'प्रमाणमञ्जरी' हा विशेष प्रसिद्ध असा ग्रंथ आहे. यामध्यें काष्ठशिल्पाचा विचार आलेला आहे. वास्तूमध्यें रचनेसाठीं आणि शोभनासाठीं काष्ठाचा वापर कसा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करावा, याचें आकारमान, त्यावरील नक्षी इ. चे सूक्ष्म नियम या छोट्या ग्रंथांत दिलेले आहेत.

ग्रंथांची कालनिश्चिति

वास्तुशास्त्रग्रंथांची निर्मिति केव्हां झाली हें पाहणें आतांच्या चर्चेच्या दृष्टीनें महत्त्वाचें ठरतें. कारण हे ग्रंथ आणि शिल्पाचे प्रत्यक्ष नमुने हे जर समकालीन, निदान निकटच्या काळांतील असतील तरच त्यांची तुलना करणें योग्य ठरेल. अगदीं ठोकळ मानानें असें म्हणतां येतें कीं, हीं दोन्ही अंगें समकालीन आहेत. परंतु एकेका ग्रंथाच्या कालनिश्चितीच्या कामांत फार अडचणी आहेत. अशी निश्चिति मुख्यत्वें अंतर्गत पुराव्यावरच आरंभीं तरी करण्यांत आली. त्यांतील भाषेचें प्राचीनत्व, त्यांत सांपडणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या खाणाखुणा ज्या काळाशीं जास्तींत जास्त जुळतील त्याच काळांत हीं पुस्तकें तयार झालीं असें मानावयाचें. ही कालनिश्चिति स्वाभाविकच अनुमानरूप असते आणि हींत मतभेदाला हवा तितका वाव आहे. मात्र बृहत्संहिता ही सगळ्यांत प्राचीन म्हणजे गुप्तकालाच्या अखेरीस किंवा त्याच्या आसपास तयार झाली असावी असें मानतात. याशिवाय मत्स्यपुराण, अर्थशास्त्र हे ग्रंथहि थोड्याफार फरकानें, पण केव्हां झाले हें सर्वमान्य आहे. पण केवळ वास्तुशास्त्रावर म्हणून जे ग्रंथ आहेत त्यांच्या काळांत अशी सुनिश्चितता दिसणार नाहीं. विश्वकर्मवास्तुशास्त्र, मयमत, मानसार, यांसारखे महत्त्वाचे ग्रंथ इ. स. चवथें शतक येथपासून ते इ. स. बारावें–तेरावें शतक येथपर्यंत प्रवास करतात. प्र. कु. आचार्य यांनीं मानसाराचा काळ इ. स. चवथें पांचवें शतक असावा, असें प्रतिपादलें आहे, तर भट्टाचार्य हे हा ग्रंथ इ. स. १३०० च्या आसपासचा किंवा त्याहीनंतरचा असावा असें मानतात. तिसरे एक संशोधक डॉ. शुक्ल हे याच ग्रंथाला इ. स. दुसऱ्या शतकांत नेऊन बसवितात. आचार्य मयमत हा ग्रंथ मानसारावर आधारलेला असावा असें मत देतात, तर भट्टाचार्य यांचें मत याच्या नेमकें उलट आहे आणि यदाकदाचित् एखाद्या ग्रंथाचा काळ कांहीं अन्य पुराव्यावरून निश्चित झाला असेल आणि तो आपल्या विचारसरणीला पटण्यासारखा नसेल किंवा गैरसोईचा असेल, तर त्यांतूनहि मार्ग काढण्यांत आलेले आहेत. ग्रंथाचा काळ अमुक एक असला तरी शास्त्रपरंपरा निःसंशयच जुनी आहे. फक्त तिचें संहितीकरण नंतरच्या काळांत झालें असें म्हटलें कीं संपलें. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक ग्रंथांत जी लांबच लांब गुरुपरंपरा दिलेली असते तीमुळें ग्रंथाचा गाभा आणि त्याची रचना यांत भेद करण्यास वाव सांपडतो.

समरांगणसूत्रधार, तंत्रसमुच्चय अशांसारख्या बोटावर मोजतां येण्यासारख्या ग्रंथांचे काळच नक्की सांगतां येतात. समरांगणसूत्रधार हा अकराव्या तर तंत्रसमुच्चय हा पंधराव्या शतकांतील. समरांगणावर आधारलेल्या आणि 'लाट' शिल्पशैलीचें वर्णन करणाऱ्या अपराजितपृच्छा, प्रासादमण्डन, या ग्रंथांचे काळहि साधारणपणें निश्चित

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
सांगतां येतात. परंतु इतर बहुतेक ग्रंथांच्या निर्मितीचा काळ नक्की सांगतां येत नाहीं. शास्त्र आणि शिल्प यांचा एकत्र अभ्यास करण्याच्या कामांत अशा रीतीनें कालनिश्चितीचा अभाव ही एक मोठी अडचण आहे.

ग्रंथकार कोण ?

या ग्रंथांचे लेखक कोण असावेत ? लेखक म्हणून, लेखकांचे गुरु म्हणून किंवा त्यांच्या गुरूंचे गुरु अशा परंपरांची मालिका सर्वच ग्रंथांत सांपडते. ह्यांत विश्वकर्मा, मय, कश्यप, भृगु, नारद, अत्रि अशीं नांवें पुन्हा पुन्हा येतात. भट्टाचार्य यांनीं या सगळ्या मंडळींना एका कालक्रमाच्या आणि भौगोलिक कोष्टकांत बसविण्याचा यत्न केला आहे. विश्वकर्मा हा देवांचा शिल्पी आणि मय हा असुरांचा अशी विभागणी करून एक नागर आणि दुसरा द्राविड शैलीचा जनक, असें गृहीत धरून त्यांनीं हें कोष्टक नक्की केलें. तथापि हें कोष्टक स्वीकार्य मानतां येत नाहीं. या ऋषीमुनींचें कुल अथवा काळ यांची कोणतीहि विश्वसनीय माहिती आपल्यापाशीं नाहीं, आणि त्यांच्या लेखनावरून शिल्पशैलीहि स्पष्ट होत नाहीं. म्हणून अशा सर्वगामी नांवांचे लेखक हे कोठें व कोटल्या काळीं झाले हें सांगतां येत नाहीं. या नंतरच्या काळांतले, म्हणजे गुप्तोत्तर काळांतले जे ग्रंथ त्यांत समरांगणसूत्रधार हा महत्त्वाचा ग्रंथ. हा ग्रंथ भोजराजानें रचला असें डॉ. शुक्ल व इतर अनेक विद्वान् समजतात. डॉ. शुक्ल यांनीं भोजराजानें रचलेल्या जवळजवळ बत्तीस ग्रंथांची यादी आपल्या सूत्रधाराच्या प्रस्तावनेंत दिली आहे. यांत व्याकरण, काव्यशास्त्र, नाट्यशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, तत्त्वज्ञान अशा हरतऱ्हेच्या ग्रंथांचा समावेश आहे. एकाच माणसानें, मग तो कितीहि विद्वान् असो हे सगळे ग्रंथ स्वतः लिहिले असें म्हणणें म्हणजे आपल्या स्वतःच्या आणि वाचकांच्या सहनशक्तीला कमालीचा ताण देण्यासारखें आहे. जर असें गृहीत धरलें कीं त्याच राजानें सगळे ग्रंथ रचले तर ते त्यानें इतर कोणा शास्त्रज्ञांच्या सांगण्याप्रमाणें रचले असें समजावें लागेल. म्हणजे या विषयांतील त्याचें ज्ञान अप्रत्यक्ष अतएव फारसें विश्वसनीय नव्हे असेंच म्हणावें लागेल. याउलट ही एक भोज 'ओरिएंटल सीरिज' होती; सध्यांच्या होळकर ग्रंथमाला किंवा सयाजी ग्रंथमाला यांच्यासारखी राजाश्रयाखालीं तयार झालेली माला होती असें म्हटलें तर हे ग्रंथ बरेच विश्वसनीय मानतां येतील.

परावलंबित्व ?

लेखकविषयक या वादंगांत भर म्हणूनच कीं काय, परावलंबित्वाची सूचना करण्यांत येते. मुख्य रोख मानसार वास्तुशास्त्रावर असून आचार्य यांनीं प्रख्यात रोमन ग्रंथकार व्हिट्रुव्हिअस याच्या याच विषयावरील ग्रंथाशीं मानसाराची तुलना करून अनेक साम्यस्थळें दाखविलीं आहेत. हें साम्य केवळ कांहीं फारच सामान्य तत्त्वापुरतें मर्यादित आहे. तें नगररचनेंत दिशा ठरविणें, वाऱ्याची दिशा पाहणें, भूपरीक्षा अशा

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

विषयांपुरतेंच आहे, हें मान्य केलें तरी, वादविवादास, मतभेदास म्हणजे गोंधळास पुरेसें आहे.

ज्योतिष व वास्तु

या सर्व ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय स्थूलमानानें एकच आहे. बारीक बारीक तपशिलांत भेद असला तरी सगळ्या ग्रंथांमध्यें कांहीं विषयांचा समावेश आवश्यक मानलेला दिसतो. विषयवारीनें दोन भाग पडतात. पहिला ज्योतिषशास्त्रविषयक, दुसरा रचनाविषयक. पहिल्या भागांत बांधकामाला शुभाशुभ मुहूर्त कोणता, जागा कोणत्या, त्या जागेवरील अतिमानुषी शक्तींना कसें संतुष्ट करावें याचें आणि वास्तुपुरुषमंडळाच्या आखणीचें, ब्रह्म अथवा कूर्मशिलेचे व शिलांवरील विविध चिन्हांचें विवेचन येतें. यांतच अष्टदिशा, नक्षत्रें यांचा विचार येतो. या सर्व भागाचा संबंध ज्योतिषशास्त्राशींच आहे. सगळ्या विवेचनाचा भर अतर्क्य अशा अतिमानुषी शक्तींना कसें प्रसन्न करावें यावरच आहे. कॅम्रिश यांनीं केलेलें वास्तुपुरुषमंडळाचें विवेचन केवळ पारमार्थिकच आहे. परंतु खुद्द ग्रंथावरून अथवा टीकाकारांच्या विवेचनानेंहि ज्योतिषशास्त्रविषयक भागाचा प्रत्यक्ष रचनेशीं, लौकिक कार्यकारणावरून संबंध कोणता हें स्पष्ट होत नाहीं. तसा संबंध लावून दाखविणाऱ्या विद्वानांत एकमत होत नाहीं. दुसरा भाग रचनात्मक म्हणजे रचनाविषयक आहे. येथें नगराला वा वास्तुला योग्य जागा कशी निवडावी याचा विचार प्रथम केला आहे. जमिनीचा उतार, वाऱ्याची दिशा, मातीचें स्वरूप, पाण्याचें सान्निध्य, या सर्वांचें विवेचन येथें सापडतें. हें सर्व विवेचन अगदीं ऐहिक असें आहे. ह्यावर पारलौकिकाचें आवरण नाहीं.

स्थपति व मापनपद्धति

रचनापद्धतीच्या वर्णनाच्या सुरुवातीला किंवा क्वचित् ग्रंथाच्या आरंभीं, दोन महत्त्वाचे विषय सांपडतात. इमारत बांधण्यास लायक कोण आणि मापनपद्धति कोणती हे ते विषय. स्थापत्यशास्त्राचे चार विभाग सांगितले आहेत. पहिला व सर्वश्रेष्ठ म्हणजे स्थपति. याला इमारती बांधण्याचें आणि इतर शिल्प-शास्त्रांचें उत्कृष्ट ज्ञान तर हवेंच पण शिवाय वेदाध्ययनहि असावें लागतें. स्थपतींच्या मार्गदर्शनाखालीं सर्व काम व्हावयाचें असतें. दुसरा सूत्रग्राहिन् म्हणजे आलेखक व चित्रकार. ह्यालाहि वेदविद्या अवगत असावी लागते. तिसरा तक्षक म्हणजे सुतार. हा काष्ठशिल्पांत निष्णात असावा लागतो. चवथा वर्धकि. याचा मुख्य व्यवसाय चित्रकाराचा, परंतु यालाहि वेदविद्या अवगत असणें जरूर समजतात. या ठिकाणीं बहुतेक लेखकांनीं वेद याचा अर्थ स्पष्ट न करतां केवळ तेवढा शब्दच देऊन काम भागविलें आहे. परिस्थिति अशी असावी कीं, वास्तुशास्त्र किंवा शिल्पशास्त्र हें अथर्ववेदाचें एक अंग आहे असें मानीत. तेव्हां या वेदांगाचें ज्ञान या चार, मुख्यतः तीन व्यावसायिकांना असावयास हवें असें समजावयाचें. स्थपति, वर्धकि व सूत्रग्राहिन् हे वेदाच्या सर्व शाखोपशाखांत वा अंगोपांगांत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

निष्णात असावे आणि शिवाय त्यांनीं आपल्या विद्येंतहि कुशल असावें असें म्हणणें शक्यतेच्या कोटींत बसत नाहीं.

मापनपद्धतीचीं कोष्टकें सर्व वास्तुशास्त्रांत खुलासेवार दिलेलीं आहेत. ह्या कोष्टकांस सर्वांत सूक्ष्म म्हणून परमाणूपासून सुरुवात झालेली असते. इतक्या सूक्ष्मांतून उत्पन्न झालेली मापनपद्धति अंगुलापाशीं आली म्हणजेच हातांत गवसते. अंगुल म्हणजे हाताच्या मधल्या बोटाची जाडी. याच्या पटी आठानें अथवा चोविसानें वाढवीत वाढवीत दण्ड म्हणजे धनुष्याच्या काठीइतकी लांबी तयार होते. ह्यांत तीन प्रकारचीं अंगुलें असतात. तीं उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशीं; तीं इमारतींच्या बांधणीस वापरावयाचीं; रस्ते किंवा वाहनें याच्या मोजणींत वापरावयाचीं; आणि आसन व मंचक यांच्या बांधणींत उपयोजावयाचीं. इतकीं वर्षें अभ्यास चालूनहि अद्याप दण्ड मापाची तीन प्रकारची लांबी सध्याच्या परिमाणांत किती याचा कोणी निर्णय करूं शकलेलें नाहीं.

स्थापत्य-वास्तु

योग्य भूमीची स्थपतीची व मापनपद्धतीची निवड झाल्यावर, जी वास्तु उभारावयाची तिचा विचार. यांतील पहिला विचार म्हणजे विधान किंवा प्लॅन यासंबंधीचा. यांत नगरविधान, दुर्गविधान, मंदिरविधान, गृहविधान अशा सर्व प्रकारच्या इमारतींच्या वेगवेगळ्या विधानांची माहिती येते. रस्त्याच्या आंखणीमध्यें, त्या रस्त्यावरून कोणत्या प्रकारची वाहनें जाणार आहेत, तो केवळ व्यापारी मार्ग आहे कां सैनिकी मार्ग आहे, अशा गोष्टी ध्यानांत घेतल्या आहेत. नगरांचे दण्डक, सर्वतोभद्र, स्वस्तिक, पद्मक, नंद्यावर्त असे अनेकविध आकार दिलेले आहेत. नगररचनेमध्यें दुर्गरचनेस महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे. यांत तटबंदी, दरवाजे, बुरूज, खंदक अशा सर्वांचीं वर्णनें आहेत. तसेंच जलदुर्ग, वनदुर्ग, भूदुर्ग असे दुर्गप्रकारहि आहेत. यांत राजप्रासाद, सैनिकनिवास आणि इतरेजन म्हणजे व्यापारी, उद्योगधंदेवाले, लोहार, सुतार आदि तसेंच शूद्र यांचे भाग नगरांत वेगवेगळे आंखलेले आहेत. राजप्रासाद सर्वांत सुरक्षित ठिकाणीं तर शूद्रनिवास सर्वांत असुरक्षित ठिकाणीं आहेत.

नगरविधान तयार झाल्यावर घरें, प्रासाद, म्हणजे निवासस्थानें यावयाचीं. सर्व वास्तुशास्त्रांत इमारतींचें विधान, त्यांतील स्तंभांचे आकार व मांडणी, द्वारशाखा, भिंती, खिडक्या, मजले, छपरें, छतें, वेगवेगळ्या प्रकारचीं दालनें वा महाल इत्यादींचे सविस्तर वर्णन आहे. मानवाचीं आलयें म्हणजे निवासस्थानें आणि देवांचीं आलयें म्हणजे मंदिरें यांतील रचनात्मक भेद स्पष्ट केलेला नाहीं. प्रथम प्रासाद नांवाच्या वास्तूचें वर्णन देऊन नंतर 'याप्रमाणेंच मनुष्यांचीं आलयें बांधावींत' असें म्हटलेलें आढळतें. निवासस्थानें व मंदिरें यांत सुस्पष्ट असा भेद सांपडलाच तर तो इ. स. ८००–१००० च्या नंतरच्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ग्रंथांत सांपडतो. परंतु याचा अधिक विचार पुढें करावयाचा आहेच. गृहरचनेनंतर पाणी-पुरवठा, रथनिर्मिति अशांसारखे विषय येतात.

वास्तुशास्त्रग्रंथांतील वास्तुविद्याविषयक मजकुराचा थोडक्यांत सारांश हा असा आहे.

वास्तुशिल्प

वास्तुशिल्प हा विषय तुलनात्मक आहे हें या आधींच स्पष्ट केलेलें आहे. ज्या दोन भागांची तुलना करावयाची त्यांपैकीं एकाची कल्पना आतांपर्यंत दिली. आतां दुसऱ्या भागाकडे म्हणजे वास्तुशिल्पाकडे वळावयाचें. वास्तुशिल्प हा शब्द येथें कोणत्या अर्थानें वापरला आहे याची कल्पना आधींच दिलेली आहे. आतां वास्तुशिल्पाचें स्वरूप, व्याप्ति आणि मुख्य वर्गवारी यांचा विचार करावयाचा आहे. चटकन् डोळ्यांत भरणारे आणि कलापूर्ण असे प्राचीन अवशेष म्हणून आपल्या जुन्या वास्तूंकडे नव्या अभ्यासकांचें लक्ष प्रथम गेलें. पाश्चात्त्य संशोधकांनीं आपल्या संशोधनाला आरंभ केल्या-पासून म्हणजे आज कमींत कमी सवाशें तें दीडशें वर्षें वास्तुशिल्पाची दखल घेण्यांत आलेली आहे. या सर्व अभ्यासाचें सार म्हणून पर्सी ब्राऊन यांच्या ग्रंथाकडे बोट दाखवितां येतें. वस्तुनिष्ठ व उत्क्रान्तिवादी दृष्टिकोणांतून त्यांनीं हा विषय आपल्या "इंडियन आर्किटेक्चर" या ग्रंथांत हाताळला आहे. ह्या ग्रंथाच्या आणि इतर प्रसिद्ध साहित्याच्या आधारें वास्तुशिल्पाचें रूप स्थूलमानानें पुढीलप्रमाणें सांगतां येईल.

नागरी-शिल्प म्हणजे रोजच्या जीवनाला आवश्यक अशा वास्तु. यांत घरें, प्रासाद, नगरें यांचा समावेश होतो. उत्तर मध्ययुगांतील म्हणजे मुसलमानी, रजपूत, मराठी अशा कांहीं कांहीं वास्तु आज उपलब्ध असल्या तरी त्या आधींच्या काळांतले प्रत्यक्ष नमुने आज पाहावयास सांपडत नाहींत, फक्त चित्रांतील अथवा शिल्पांतील प्रति-कृतींवरून जी काय कल्पना येईल तेवढीच. प्राचीन वाङ्मयांत निरनिराळ्या दालनांचे आणि प्रासादांच्या भागांचे उल्लेख येत असले तरी त्यांवरून त्या इमारतींच्या बाह्याकृती अथवा दर्शनें यांची कल्पना येत नाहीं. सारांश, नागरी शिल्पाविषयींचें प्रत्यक्ष ज्ञान अत्यंत त्रोटक आहे.

दुसरा प्रकार **लष्करी किंवा संरक्षक** शिल्पाचा. यांत शहराभोंवतालचे कोट, खंदक, द्वारें, तसेंच किल्ले आणि त्यांची मांडणी व रचना, रक्षित प्रासाद वा गढ्या या सगळ्यांचा समावेश होतो. नागरी शिल्पाप्रमाणेंच येथेंहि प्रत्यक्ष नमुने जवळपास नाहींतच. उत्खात वा चित्रित उदाहरणें अपूर्ण आहेत. पूर्वीच्या काळीं जेथें किल्ले होते, त्या ठिका-णांचीं नावें आणि वर्णनेंसुद्धा मिळतात. तथापि इ. स. १२०० च्या आसपासचा किंवा त्याच्या आधींचा कोणताहि दुर्ग मूळ अथवा थोड्याशा परावर्तित अवस्थेंतसुद्धां पाहाव-यास सांपडत नाहीं. तीं तीं ठिकाणें मोक्याचीं असल्यानें तेथें पुनः पुनः दुर्गांची उभारणी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

झाली आणि त्यामुळें आधीचीं विशिष्ट अशीं दुर्गलक्षणें पुसून गेलीं. देवगिरी, पन्हाळगड, शिवनेरी इ. किल्ले यादवकालीं अथवा शिलाहारांच्या आमदानींत बांधलेले, क्वचित् त्याच्याहि पूर्वीचे. परंतु नंतरच्या बहमनी अथवा मराठी सत्तेनें तत्कालीन परिस्थितीला योग्य असे किल्ले बांधले आणि त्यामुळें तेथें आतां यादव वा शिलाहार संरक्षक शिल्पाचे विशेष सांपडत नाहींत.

नागरी व लष्करी शिल्पाची ही स्थिति असली तरी **धार्मिक** म्हणजे मुख्यतः **मंदिर शिल्पाची** स्थिति खूपच भिन्न व चांगली आहे. बांधणींतील दोष, तसेंच दगडांतील दोष आणि मुसलमानी अत्याचार यामुळें बरींच देवालयें पूर्णपणें नष्ट झालीं आणि कांहींची नासधूस झाली असलीं तरी शेंकडों प्राचीन देवालयें पूर्वीच्या वैभवाची साक्ष पटेल इतक्या चांगल्या अवस्थेंत उभीं आहेत. सबंध भारतभूवर पसरलेल्या अशा मंदिरांचा अभ्यास करून धाटणीच्या दृष्टीनें त्यांचे वर्ग पाडण्यांत आलेले आहेत. तसेंच केवळ रचनात्मक आणि कलात्मक उत्क्रान्तीच्या तत्त्वांवर या शिल्पांचा कालक्रमहि लावण्यांत आलेला आहे. प्रत्यक्ष पुराव्यानुसार पाहतां, ज्यांना मंदिर असें नांव निश्चयानें देतां येईल, अशा वास्तु सामान्यतः गुप्तकालाच्या आधींच्या सांपडत नाहींत. मात्र याचा अर्थ या आधींचें कांहींच सांपडत नाहीं असा नव्हे.

मौर्य काळ

मौर्य काळापासून पुढें दोन शिल्पप्रकार उभे दिसतात. पहिलें म्हणजे गिरिशिल्प व दुसरें स्तूप. जैन व बौद्ध कलाकारांनीं या प्रकारांची जोपासना व वाढ केली. स्तूपाची नसली तरी गिरिशिल्पाची बरीच प्रगति हिंदुधर्मियांनीं व कलाकारांनीं विशेषतः गुप्त-वाकाटक काळांत केली. गिरिशिल्प व स्तूप यांविषयीं आपल्या वास्तुशास्त्रांत कोठेंच कांहीं उल्लेख अथवा माहिती नाहीं हें ध्यानांत ठेवावयास हवें.

गुप्त काळ

दुसरा खंड गुप्त व गुप्तोत्तरकालीन म्हणजे हिंदु मंदिरशिल्पाचा. यांत गुप्त काळांत आरंभ झालेल्या आणि नंतरहि बऱ्याच प्रमाणांत टिकून राहिलेलीं मंदिरें व रचनापद्धति यांचा समावेश होतो. इ. स. पाचशें ते आठशें हा काळ मंदिरशिल्पाच्या उद्गमाचा व विकासाचा मानण्यांत येतो. देशांतील अनेक भागांत सौराष्ट्र, मध्य भारत, राजस्थान, ओडिसा, उत्तर कर्नाटक व आंध्र अशा प्रदेशांत मंदिराचे समूह या काळांत उभे राहिले. याच शिल्पाची अधिक प्रगति होऊन उत्तर किंवा आर्य आणि द्राविड किंवा दक्षिण अशा दोन स्वतंत्र शैली उत्पन्न झाल्या. पुढें पुढें या दोन वर्गांचीं कांहीं ठळक ठळक वैशिष्ट्यें कायम ठेवून चेहऱ्यामोहऱ्यांत थोडा बदल केलेले पृथक् पृथक् वर्ग, देश व काळ यांस अनुसरून अस्तित्वांत आले. आर्य शैलींत ओडिसा, मध्य भारत, लाट, उत्तर महाराष्ट्र यांचे स्वतंत्र उपवर्ग आहेत. तर द्राविड शैलींत पल्लव, चोळ, होयसळ, चालुक्य असे उपवर्ग आढळतात.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आर्य व द्राविड शैली

सामान्यपणें असें सांगतां येतें कीं दोन्ही मंदिरशिल्पांत छायाप्रकाश योजनेस महत्त्व दिलेलें असतें. परंतु आर्य शैलींत उर्ध्ववृत्ति म्हणजे Vertical drive महत्त्वाची ठरते तर द्राविड शैलींत समतल वृत्ति म्हणजे Horizontal Strain वर भर देण्यांत येतो. छायाप्रकाशयोजनेंत भिंतीच्या पृष्ठभागाची मोडणी करावी लागते. ही करतांना उभ्या रेघांना महत्त्व देणें हा रुचीचा प्रकार असला तरी सामान्यपणें उभ्या रेघा व त्यांतून निर्माण होणारा Vertical effect ही आर्यशैलीची व आडव्या रेघा व यांतून उत्पन्न होणारा horizontal effect ही द्राविड शैलीची निर्णायक खूण मानण्यास हरकत नाहीं. याशिवाय अनेक बारीक सारीक फरक असले तरी ते येथें सांगण्यास वाव नाहीं. ढोबळ मानानें विषयाची कल्पना आली म्हणजे पुरे आहे. कारण सूक्ष्म तुलना करणें शक्य होणार नाही.

संज्ञाविषयक तुलना

आतांपर्यंत, ज्यांची तुलना किंवा चर्चा करावयाची त्या वास्तूंची माहिती दिली. हा भाग थोडासा लांबला असला तरी, वास्तुशिल्प व वास्तुशास्त्र या विषयाचा अभ्यास सामान्यपणें प्रचलित नाहीं, हें ध्यानांत घेऊन, पुढच्या विवेचनाच्या सुलभतेसाठीं तो सविस्तर मांडणें भाग होतें. शास्त्र व व्यवहार यांचा परस्परसंबंध तपासण्यास आरंभ करावयाचा, तर शास्त्र हें स्वतंत्रपणें कितपत सुसंगत व स्पष्ट आहे, याचा विचार करावयास हवा.

प्रासाद

जे विषय अगदीं सामान्य स्वरूपाचे म्हणजे general आहेत, त्यांत सर्व शास्त्रांत एकवाक्यता आढळते. म्हणजे नगररचनेंत दिशा, वाऱ्याची दिशा, भूपरीक्षा अशा बाबतींत किंवा पाण्याचें सान्निध्य असावें, अशासारखे नियम सर्वच वास्तुविद्येंत सांपडतात. केवळ भारतांतच नव्हे तर जगांतील इतरहि वास्तुविद्येंत सांपडतील. तेव्हां असे सामान्य, अगदीं प्राथमिक स्वरूपाचे सिद्धान्त सोडून देऊन ज्या वेळीं आपण भारतीय वास्तुवैशिष्ट्यांकडे वळतो तेव्हांच फलदायी चर्चेचा संभव उत्पन्न होतो. या आधीं सांगितलेंच आहे कीं, गृह म्हणजे राहण्याची जागा आणि मंदिर म्हणजे देवालयें. यांचा फार घोटाळा शास्त्रांतून आढळतो. प्रासाद हा शब्द सर्वत्र वापरला आहे. प्रासाद या शब्दाचा अर्थ आरंभापासूनच मंदिरें असा घ्यावयाचा झाल्यास बौद्ध काळापूर्वीहि देवालयें बांधलेलीं होतीं, असा निष्कर्ष निघतो. उलट भट्टाचार्य यांच्या म्हणण्याप्रमाणें आरंभीं प्रासाद याचा अर्थ राजवाडा असाच होता. इ. स. च्या आरंभाच्या थोड्या पूर्वी या शब्दाला देवालय असाहि अर्थ प्राप्त झाला व पुढें म्हणजे गुप्तकालापासून उत्तरेकडील वास्तुशास्त्रांत प्रासाद म्हणजे केवळ देवालयच असा अर्थ रूढ झाला. वास्तविक पाहतां एका शब्दाच्या अर्थासाठीं एवढे मतभेद असण्याची जरुरी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नव्हती. तथापि, प्रासाद शब्दाचा अर्थ मंदिर असाच धरला, तर मंदिराच्या अस्तित्वाचा काळ, सध्यांच्या मान्य कल्पनेपेक्षां जवळजवळ आठशें-हजार वर्षें मागें जातो. दुसरें म्हणजे प्रासाद याची अत्यंत स्पष्ट व्याख्या वास्तुशास्त्रांत सांपडली असती, तर या शब्दच्छलाची जरूरहि नव्हती आणि याहिपेक्षां, वास्तुविद्येच्या सर्व ग्रंथांत हा स्पष्ट अर्थ व व्याख्या सुसंगतपणें टिकवून धरण्यांत आली असती, तरीहि वादाला जागा नव्हती.

आभास

दुसरा असाच शब्द घ्यावयाचा तर 'आभास'. ह्या शब्दाचा अर्थ मानसार-शिल्पशास्त्रावरील टीकेंत आचार्य यांनीं 'शिल्पासाठीं वापरण्यांत येणारा पारदर्शक दगड' असा केला आहे. याउलट भट्टाचार्य हे या शब्दाचा अर्थ शिल्पशोभनासाठीं वापरण्यांत येणारें शिल्प वा चित्र असा करतात. इतके विभिन्न अर्थ या शब्दाला चिकटविण्यांत यावेत याचाच अर्थ असा कीं, मूळ ग्रंथांत या शब्दाचा अर्थ अथवा व्याख्या स्पष्टपणें दिलेल्या नाहींत. या आभासाचें स्वरूप व उपयोग यांचीं मूळ वर्णनें इतकीं त्रोटक व वरवरचीं आहेत, कीं अर्थबोधाची शक्यताच राहात नाहीं.

वितान

आणखी एक उदाहरण घेऊं. छत म्हणजे वितान. या वितानाचे तीन प्रकार लाट शैलींत संभवतात. क्षिप्त, उत्क्षिप्त आणि क्षिप्तोत्क्षिप्त. यासंबंधीं लिहिणाऱ्या चार अत्यंत प्रसिद्ध संशोधकांनीं या संज्ञांचे एकमेकांना पूर्णपणें विरोधी असे अर्थ दिले आहेत आणि मौज अशी कीं, चौघांनींहि आपापल्या मताच्या पुष्टीसाठीं उभ्या असलेल्या मंदिरांच्या छतांचीं वर्णनें दिलीं आहेत.

अशा संदिग्ध व अस्पष्ट शब्दांची व संहितांची किती तरी उदाहरणें सांगतां येतात. ह्या सर्व संज्ञा अत्यंत महत्त्वाच्या आहेत, कारण त्यांवरून खास भारतीय शिल्पांतील रचनापद्धति, आकार आणि वास्तुभूषणें यांची कल्पना येणार आहे; आणि यांचाच अर्थ लागत नसेल तर वास्तुशास्त्र समजणार नाहीं, वास्तुशिल्पाशीं तुलना लांबच राहिली.

यानंतर पाहावयाचा मुद्दा म्हणजे वास्तुविद्येमध्यें दिलेली मापनपद्धति व प्रमाणें मापनपद्धतीचे तीन प्रकार या आधींच सांगितले आहेत. या पद्धतींचा वापर क्वचितच केलेला आढळतो. वर्णनें येतात तीं परस्पर प्रमाणांचीं. दाराच्या चौकटीचें उदाहरण घेऊं. आपल्याकडे अगदीं परवांपरवांपर्यंत दाराची चौकट व फळ्या विशेष प्रकारें सुशोभित करण्याची पद्धत होती. यासाठीं सगळे भाग प्रमाणबद्ध असण्याची जरुरी होती. हीच प्रमाणें कांहींशीं पुढीलप्रमाणें सांगतात. दाराच्या खांबाची जी लांबी असेल तिचे सोळा भाग पाडावेत. या सोळांपैकीं सात भागांची गणेशपट्टी असावी. गणेशपट्टीचे दहा भाग असावेत. त्यांतल्या तीन भागांइतकी रुंदी ठेवावी. असा तपशील द्वारशाखेच्या म्हणजे चौकटीच्या प्रत्येक भागाचा आहे. तसाच तो स्तंभ,त्याची उंची,त्याची जाडी, ह्यांचाहि आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परंतु ह्या सगळ्या भागांना एकत्र गुंफण्यासाठीं जें प्रमाण पाहिजे, त्याचा खुलासा कोठेंहि सांपडत नाहीं. दरवाजाचें पूर्ण वर्णन आहे; पण सबंध प्रासादाची लांबी, रुंदी व उंची आणि दरवाजाचें आकारमान यांचा परस्पर संबंध काय असावा, याचा निर्णय नाहीं. बरें, एका समान मापनाशीं संबंध जोडला असेल असें म्हणावें तर तसेंहि कोठें आढळत नाहीं. म्हणून हे ग्रंथ वाचून व त्यांतील प्रमाणें पाहून एखाद्या इमारतीचें विधान वा छेद वा पक्षदर्शन दाखवितां येणें शक्य होणार नाहीं.

देश-काल भिन्नता

वास्तुविद्येच्या अभ्यासकांनीं काल व देश यांचा फारसा विचार केलेला नाहीं. एखाद्या तांत्रिक संज्ञेचा अर्थ सर्वच काळामध्यें एकच असेल अथवा सर्व भारतभर एकच असेल असें समजण्याचें कारण नाहीं. देशकालपरत्वें त्या त्या शब्दांचे अर्थ म्हणजे त्या शब्दांना अभिप्रेत असें वास्तूंचें अंग हें एकच, एकाच आकाराचें, एकाच नक्षीचें असेल असें सांगतां येत नाहीं. विमान या शब्दाची कथा घेऊं. गुप्तकाल आणि गुप्तपूर्वकाल यांत अर्थभिन्नता आहे. द्राविड व उत्तरापथांतील वाङ्मयांत निरनिराळे अर्थ अभिप्रेत आहेत. ही भिन्नता ध्यानांत न घेतां, एकच अर्थ सर्वत्र लावला तर मंदिरशिल्पाच्या इतिहासाचा विपर्यास होतो. यासंबंधीं भट्टाचार्य यांचें समग्र विवेचन वाचनीय आहे.

नागर, वेसर इ.

अशा संदिग्धतेचा कळसच जर कोठें होत असेल, तर तो प्राचीन शिल्पांतील विविध वर्ग अथवा शैली यासंबंधीं. प्रमुख व प्रसिद्ध असे वर्ग तीन. द्राविड, नागर व वेसर. या प्रकारची वर्गवारी सगळ्या वास्तुशास्त्रांत सांपडत नाहीं. डॉ. शुक्ल यांनीं अशी एक बाजू मांडली आहे, कीं वर्गवारी वास्तुशिल्प बऱ्याच प्रगत अवस्थेस पोचल्यावरच शक्य आहे. तेव्हां प्राचीन शास्त्रांत ती सांपडत नाहीं. तथापि, समरांगणसूत्रधार यासारख्या खूप उशिराच्या ग्रंथांत इतकी संदिग्ध विधानें कां असावींत, इतकेंच काय पण वेसर हा शब्द येऊं नये, याला काय कारण असावें हें त्यांना सांगतां आलें नाहीं. मुळांत संदिग्धता आली, कीं मतप्रदर्शन व मतभेद आलेच. ते साधारणपणें खालीलप्रमाणें:--

(१) नागर, वेसर, द्राविड, हे शब्द प्रदेशवाचक आहेत. नागर=उत्तर भारत; द्राविड=दक्षिण भारत; वेसर=मध्यभारत, तुंगभद्रा-कृष्णा खोरीं. प्रदेशवाचक याचा अर्थ असा कीं, त्या त्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या शैलीचा निदर्शक. ही विभागणी आचार्य यांना मान्य आहे. फर्ग्युसन यांनीं वास्तुशिल्पाच्या अभ्यासावरून ती सुचविली. मात्र ग्रॅन्हली, रामचंद्रन् इत्यादींच्या मतें वेसर म्हणजे औत्तरीय व नागर म्हणजे मध्यदेशीय किंवा चालुक्य शैली.

(२) भौगोलिक संज्ञा म्हणून वापरल्या तरी त्यांत कांहीं शिल्पवैशिष्ट्यें असणें आवश्यक आहे. हीं वैशिष्ट्यें म्हणजे, नागर ही चौकोनी, वेसर ही गोल व द्राविड

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ी अष्टकोनी इमारत असते. खुद्द शास्त्रांत या विषयाचा मजकूर अस्पष्ट आहे. त्यामुळें ोकोनी, गोल इत्यादि विशेषणें त्या त्या वास्तूंच्या विधानांना लागूं पडतात किंवा कसें ह्याचा उलगडा होत नाहीं.

(३) शुक्ल यांनीं तिसरा प्रकार प्रतिपादिला आहे. तो असा, कीं नागर याचा संबंध नागरी याच्याशीं जोडणें आणि मोठाल्या नगरांत प्रचलित असणारी, अधिक बळकट व शोभिवंत इमारत ती 'नागर'. येथें भौगोलिक अर्थाचा विचार करावयाचा नाहीं. यात्र द्राविड याचा भौगोलिक, अर्थ स्पष्टच आहे असें ते सांगतात. वेसर याचाहि वालुक्य मंदिरशिल्प असाच अर्थ त्यांना मान्य आहे.

असे मतभेद वा शब्दच्छल होऊं शकतात याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे याख्येंतील संदिग्धता नाहींशी करण्यासाठीं ज्या आकृति अथवा चित्रें हवीं, तीं येथें नाहींत. विधान, छेद, पक्षदर्शन यांचीं वर्णनें शब्दसाध्य नाहींत तीं दृश्यच हवींत. चित्रें व आकृति यांचा पूर्ण अभाव ही एक आश्चर्यकारक आणि अपकारक उणीव या शास्त्रग्रंथांत आढळते.

या सगळ्या चर्चेचा निष्कर्ष असा, कीं बहुतेक वास्तुशास्त्रें ही सुस्पष्ट व सुगम नाहींत व तीं तशीं व्हावींत यासाठीं चित्राकृति अथवा प्रत्यक्ष बांधलेल्या देवळांचीं उदाहरणेंहि देण्यांत आलेलीं नसल्यानें हा एक वादग्रस्त व दुर्गम विषय झाला आहे.

कांहीं प्रश्न

आतां, अभ्यासकांचा एक वर्ग असा, आहे कीं ज्यांच्या मतें हीं शास्त्रें सुगम, निःसंदिग्ध आणि सुसंगत आहेत. परंतु अशा अभ्यासकांनाहि कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकतां आलेला नाहीं. हे प्रश्न वास्तुशिल्प प्रत्यक्ष अभ्यासून उत्पन्न झालेले आहेत; तसेच वास्तुविद्येच्या सामान्य ज्ञानावरूनहि निर्माण झालेले आहेत.

१ द्राविड आणि औत्तर शैलीचा उद्गम आणि विकास कसा व कोठें आणि कोणत्या पायऱ्यांनीं झाला ?

२ भारतीय वास्तुशास्त्रावरील ग्रंथांत कोणतीं शास्त्रीय म्हणजे स्थापत्यविषयक मूल तत्त्वें अनुसरलीं आहेत ?

३ वास्तुशिल्पांतील सौंदर्यविषयक दृष्टिकोणाचा यांतून बोध होतो काय ?

४ वास्तुशिल्पांत बऱ्याच लेखकांना जो पारमार्थिक तत्त्वज्ञानाचा पाया सांपडला ' आहे त्याविषयीं वास्तुशास्त्रें कांहीं सांगतात का ?

वास्तुशास्त्राच्या कांहीं ग्रंथांच्या वाचनावरून मला असें वाटूं लागलें आहे कीं, यांपैकीं सर्वांचीं उत्तरें नकारार्थीं आहेत. या विषयाचा म्हणजे वास्तुशास्त्राचा जास्त म्हणजे खोल अभ्यास केलेल्या कांहीं तज्ज्ञांशीं झालेल्या चर्चेंत त्यांनाहि हें मत फारसें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अमान्य असावें असें वाटलें नाहीं. वास्तुशास्त्रांत स्थापत्यशास्त्राचा विचार वा वर्णन नाहीं. सौंदर्यविषयक दृष्टिकोण अथवा तात्त्विक बैठक यांचाहि विचार नाहीं. इतकेंच काय पण वर्ग, शैली व त्यांची उत्पत्ति इ. विषयीं उपयुक्त माहिती या शास्त्रावरून मिळण्यासारखी नाहीं. याचाच अर्थ असा कीं, वास्तुशिल्पाची उत्पत्ति, प्रगति व विकास यांविषयीं ऐतिहासिकदृष्ट्या अथवा सौंदर्यदृष्ट्या ज्ञान मिळविण्यास वास्तुशास्त्रें निरुपयोगी ठरतात. प्रत्यक्ष आचरण आणि ग्रथित नियम यांचा मेळ बसत नाहीं.

योग्य अभ्यासक कोण ?

आतां जर कोणी असें म्हणेल कीं, योग्य अभ्यासक व पद्धति यांच्या अभावीं असा नकारात्मक निष्कर्ष निघतो, तर त्याला एक सोपें उत्तर आहे. योग्य अभ्यासक कोणाला म्हणतां येईल ? त्याच्या अंगीं कोणते गुण असावे लागतील ? ग्रंथ संस्कृतांत म्हणजे अभ्यासक संस्कृतज्ञ हवाच. वास्तुशास्त्राच्या अभ्यासकाला वास्तुशिल्पाचा उत्तम परिचय हवा. तेव्हां वास्तुशिल्पाच्या इतिहासाच्या अभ्यासकाचा यांत समावेश करण्यास प्रत्यवाय नसावा. त्यांत स्थापत्यशास्त्राचा भाग असण्याचा संभव असल्यानें स्थापत्यशास्त्र्यांनीं त्याचा अभ्यास करावा. जर कांहीं पारमार्थिक तत्त्वज्ञान असेल तर तें शोधून काढण्यास या विषयावरील अधिकारी व्यक्तींनीं पुढें यावयास हवें आणि शेवटीं, प्राचीन शिल्पपद्धतीचें तात्त्विक व मुख्य म्हणजे आचारविषयक ज्ञान आहे असें सांगणारे शिल्पी.

यांपैकीं सगळे गुण एकाच व्यक्तींत सांपडणें फार कठीण आहे. सहसा कोणी तसा दावा सांगत नाहीं. परंतु कोणीच सांगत नाहीं, असें मात्र नाहीं. मुख्य उपयोगीं पडणारे लोक म्हणजे ज्यांची वरच्यापैकीं एका, दोन किंवा तीन विषयांत गति आहे, असे संशोधक. येथें नामें व ग्रंथनामें सांगण्यास वेळ व वाव नाहीं; मात्र एवढें सांगतां येईल, कीं अशा ज्ञानी लोकांनीं एकत्र आणि पृथक्‌पणें केलेल्या प्रयत्नांचें फळ वर सांगितल्याप्रमाणें आहे. केवळ संस्कृतज्ञ माणसास तांत्रिक संज्ञा समजत नाहींत. वास्तूंच्या अभ्यासकांना विशेषतः फर्ग्युसन आदि संशोधकांना संस्कृतचें ज्ञान फार खोल असण्याची शक्यता नाहीं. स्थापत्यशास्त्रांमंडळी जास्तींत जास्त वास्तुशिल्पाचा अभ्यास करूनच थांबतात. कारण त्यांनाहि संस्कृत ग्रंथ सुगम नव्हते. कॅम्रिश, हॅवेल, कुमारस्वामी यांसारख्या चार-पांच लोकांव्यतिरिक्त तात्त्विक दृष्टीनें या विषयाकडे फारसें कोणीं पाहिलेलें नाहीं. मुख्य भर होता तो जुन्या परंपरांचें जतन केलेले अशी ज्यांची प्रसिद्धी, अशा शिल्पांवर. मानसाराचे संपादक आचार्य यांनीं अशा शिल्पी घराण्यांचा शोध करून त्यांच्याकडून या ग्रंथांचे अर्थ समजावून घेण्याचा यत्न केला. त्यांचा मुख्य प्रयत्न होता तो तांत्रिक संज्ञांचीं चित्रें, आकृति काढून घेण्यावर. या त्यांच्या प्रयत्नांचा इतिहास त्यांच्याच शब्दांत सांगणें इष्ट आहे.

" अनेक गैरसोई पतकरून आणि द्रव्य व वेळ यांचा मोठाच खर्च सोसून (ठिकठिकाणीं) असणाऱ्या पारंपरिक स्थपतींना गांठण्याचा यत्न मीं केला. यांत दक्षिण भारत,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ओरिसा, राजस्थानमधील संस्थानें, मध्य भारत, गुजरात, मुंबई, सरहद्द प्रांत आणि डोंगराळ भागांतील संस्थानें या सगळ्या मुलखांत, तज्ज्ञ व अनुभवी स्थापत्यविशारद, शिल्पी आणि दुभाषे यांना बरोबर घेऊन या (पारंपरिक) स्थपतींकडून कांहीं माहिती मिळविण्याचा फोल प्रयत्न केला. हे शिल्पी पूर्वीच्या परंपरांप्रमाणें वास्तुरचना करतात असें सांगण्यांत आलें होतें. ही परंपरा त्यांच्यापर्यंत मौखिक शिक्षणानें आलेली आहे असेंहि सांगण्यांत येतें. परंतु (प्रत्यक्ष अनुभव आला तो असा कीं) त्यांजपाशीं कांहीं अर्ध्यामुर्ध्या पोथ्या व टिपणें होतीं. परंतु त्यांचा अर्थ लावण्यास कोणीहि समर्थ नव्हते.''[१५]

आचार्य यांना आपल्या ग्रंथांत आकृत्या काढण्यास पारंपरिक शिल्पी मिळाला नाहीं व शेवटीं पाश्चात्त्य पद्धतींत रूळलेला एक चित्रकार त्यांनीं त्या कामावर नियुक्त केला. त्यानें मानसाराच्या एका तोरणप्रकाराचें चित्र म्हणून एका मुगलकालीन कमानीचेंच चित्र रेखाटलें आहे.

दुर्दैवानें आचार्य यांचा अनुभव आजहि बऱ्याच अंशीं तसाच प्रत्ययास येतो. काठेवाडांतील सोमपुरा मंडळी या विद्येंत निष्णात असल्याचा मोठाच गवगवा आहे. त्यांच्यापैकीं कांहींना जैन देवालयांच्या रचनेचा अनुभव बराच आहे. सोमनाथाचें नवें मंदिर यांच्यापैकीं एका शिल्पज्ञानें उभारलें आहे तथापि, त्यांनीं संपादन केलेल्या, दीपार्णव, प्रासादमण्डन, शिल्परत्नाकर अशांसारख्या ग्रंथांचा अभ्यास हेंच दर्शवितो कीं, वर ज्या अडचणी मांडण्यांत आलेल्या आहेत, त्यांपैकीं एकांतूनहि ह्यांना सुटका करून घेतां आलेली नाहीं. अगदीं साध्या साध्या शब्दांच्या अर्थाबद्दलहि त्यांचें एकमत होऊं शकत नाहीं. जगती या संज्ञेनें फक्त जोत्याचा निर्देश होतो कां सबंध भिंतीचा हें स्पष्ट होत नाहीं. एकाच ग्रंथांत प्रत्यक्ष वर्णनांत फक्त जोतेंच असावें असें दिसतें तर आकृतींत सबंध भिंतीचाच समावेश आहे; आणि मुख्य म्हणजे यांतल्या कोणत्याहि ग्रंथकाराला ग्रंथाला समकालीन अशीं समर्पक उदाहरणें देणें फारसें शक्य झालेलें नाहीं. या दृष्टीनें अभ्यास करणारे अगदीं अलीकडचे जे ग्रंथकार त्यांत नाणावटी व ढाकी यांचा समावेश आहे. या लेखकद्वयापाशीं परिभाषेचें व वास्तुशिल्पाचें उत्तम ज्ञान असूनहि त्यांना समाधानकारक अन्वयार्थ लावतां आलेला नाहीं.

वास्तुशिल्पाचा विद्यार्थी व शिक्षक या दोन्हीं नात्यांनीं माझा या विषयाशीं सतत संबंध येतो. या दोन शाखांचा फार घनिष्ट संबंध आहे, असें मत अनेक ठिकाणीं पाहण्यांत येतें आणि तर्कदृष्ट्या असावयास पाहिजे, असें मलाहि वाटतें. परंतु हा संबंध कोणत्या प्रकारचा आहे, याचें मात्र स्पष्टीकरण होत नव्हतें. यासाठीं कांहीं वास्तुशास्त्रांचें वाचन करून आणि त्यांवरील टीकाबाड्मयाचाहि अभ्यास मला करावयाचा होता. या व्याख्यानाच्या निमित्तानें ह्या विषयाचें वाचन मला करतां आलें; परस्पर संबंध नाहीं, ही माझी खात्री झाली आहे. मात्र असें कां व्हावें हें सांगतां येत नाहीं. इतरहि ज्ञानशाखांत अशीच स्थिति आहे काय, हें पाहावयास हवें. विशेषतः वैद्यकासारख्या शाखेंत तर प्रत्यक्ष आचार आणि तात्त्विक प्रपंच यांचा संबंध ताडून पाहणें अवश्यच आहे. म्हणजे तत्त्वज्ञान व आचार यांची फारकत हें सामाजिक व बौद्धिक जीवनाचें एक अंग होतें किंवा काय याचा खुलासा होईल आणि वरील प्रकाराचा उलगडा होईल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

संदर्भ ग्रंथ

(1) **Ram Raz**, *Essays on the Architecture of the Hindus*, (1834). (2) **Acharya P. K.**, *Indian Architecture according to Mānasāra śilpa-śāstra* (1927). *Dictionary of Hindu Architecture* (1927). *Encyclopaedia of Hindu Architecture* (1927). (3) **Mankad P. A**, *Aparājitapṛcchā*, Baroda (1950). (4) **Bhattacharya T.**, *The canons of Indian Art or a Study on Vāstu-vidyā*, Calcutta (1963). (5) **Mallaya N. V.**, *Studies in Sanskrit Texts on Temple Architecture* (1949). (6) **Sompura P. A.**, *Dīpārṇava by Viśvakarmā* (1960). (7) **Shukla D. N.**, *Vāstu-śāstra*, Vol. I, Lucknow (1960). (8) **Dhaky M. A.** and **Nanavati J. M.**, Ceilings of the Temples of Gujarat *Bulletin of the Baroda Museum and Picture Gallery*, Vol. XVI–XVII (1963). (9) **Shrinivasan K. R.**, Pallava Architecture of South India; *Ancient India*, No. 14, (1958). (10) **Krishna Deva**, The Temples of Khajuraha in Central India; *Ancient India*, No. 15, (1959). (11) **Vaze K. V.**, *Hindi Śilpaśāstrasāra*, Vol. I, Poona (1928). (12) **Vaze K. V.**, *Prācīna Hindi Śilpaśāstrasāra*, Nasik (1924). (13) **Kramrisch St.**, *Hindu Temple*, Calcutta (1946). (14) **Percy Brown**, *Indian Architecture*, 2 Vols., (1952). (15) **Acharya P. K.**, Preface to the volume of illustrations on *Indian Architecture*.... (1927).

---

११ वैजापूरवर भोंसल्यांची एक स्वारी

(श्री. दि. वि. काळे, पुणें)

प्रस्तुत टिपणाचा आधार एक पांच कड्यांचा किंवा चौकांचा पोवाडा आहे. हा पोवाडा अमुद्रित या अर्थानें अप्रकाशित आहे. परंतु निदान दीडशें वर्षें चालत आलेल्या, पूर्वीच्या मोगलाईंतील (आतांच्या औरंगाबाद जिल्ह्यांतील) वैजापूरच्या देवीच्या वार्षिक अकरा दिवसांच्या उत्सवांतील सहाव्या दिवशीं इतर ठराविक कार्यक्रमांत नित्यक्रम म्हणून परंपरेनें म्हणण्यांत येतो, या दृष्टीनें तो अज्ञात नाहीं.

सुमारें इ. स. १८०७ मध्यें उतरलेल्या वैजापूरच्या देवस्थानासंबंधीं तपशीलवार कार्यक्रम नोंदलेल्या एका सचित्र जीर्ण वहींतून हा पोवाडा प्रति करून घेतला आहे. या वहीचाहि स्वतंत्रापणें अभ्यास करण्यासारखा आहे. तसा केला तर मराठवाड्यांतील देवतोत्सवांतील लळितादि कार्यक्रमांची फार चांगली कल्पना येईल. या वहींत निरनिराळ्या भूमिका करणारांसाठीं सूत्रधारानें म्हणावयाच्या कवनांची संपूर्ण नोंद आहे. त्यांतील कांहीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठिकाणची अश्लीलता, मुसलमानांची टिंगल, पौराणिक व सामाजिक आख्यानांची सजावट, अनुषंगानें व विनोद निर्मितीसाठीं कानडी, मारवाडी, भाट, जोहारी, जोगी, पंचाक्षरी, चेटकी, कापडी, परीट, जागल्या अशा समकालीन घटकांचें व्यक्तिचित्रण लक्षणीय आहे. विशेषतः या एकादशदिन उत्सवाचा आरंभ विशिष्ट तिथीला होण्याऐवजी शुद्ध पक्षांतील (आषाढ व चैत्र) पहिल्या रविवारीं होणें व समाप्ति बुधवारींच होणें हा एक-बहुधा तिथिक्षय व तिथिवृद्धि टाळण्यासाठीं पतकरलेला विलक्षण संकेत वाटतो. परंतु आपल्याला विशेष आकर्षण आहे तें या पोवाड्याचें. पोवाडा ऐकण्यापूर्वी त्याचें लेखकाला वाटणारें महत्त्व थोडक्यांत कांही विशेषांसह नमूद करतों--

(१) पोवाड्यांत पोवाडा रचणाऱ्याचें नांव पुंजाजीदेव व गांव कसबा वैजापूर दिलेला आहे; रचनाकाल स्पष्ट नाहीं; पण समकालीन दिसतो.

(२) वर्णन वैजापूर व आसमंतांतील प्रदेश यांचेंच आहे; स्थानिक लोक व थोडी माहिती असलेला कोणीहि याबद्दल साक्ष देईल. नदी, डोंगर, खेडीं, सर्व कांहीं अचूक आहे.

(३) भोसल्यांनीं तीस हजार खंडणी मागितली व ती वसूल करण्यासाठीं फौज पाठविली. गांडापुराहून स्वार पाठविले, गांवानें दहशत खाल्ली व एकजुटीनें स्थानिक नेत्यांच्या हाताखालीं प्रतिकार करण्याचा चंग बांधला व भोसल्यांना पळवून लावलें असें बढाईचें वर्णन आहे.

(४) या हल्ल्याचा दिवस ध्वनित करणारा उल्लेख ' मार्गशीर्ष तीज बुधवार ' असा स्पष्ट आहे. हा योग इ. १६६६, १६७२, १६७६ व १६७९ (जालना स्वारी) असा चारदा तरी शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत येतो. त्यांतील इ. १६७९ नोव्हेंबर २६ हा दिवस जालनापूरच्या घोडदौडींत चपखल बसतो, म्हणून हा पोवाडा छत्रपतींच्या वैजापूरवरील खंडणीस्वारीसंबंधींच असावा असें म्हणतां येतें. वैजापूरवरील भोंसल्यांची स्वारी असा योग एरवीं अन्य वेळीं बहुधा संभवत नाहीं असें वाटतें.

(५) इतिहासदृष्ट्या महत्त्वाच्या या पोवाड्याचें वाङ्मयमूल्य उतारा करतांना आधुनिकीकरण झाल्यानें कांहीं कमी झालेलें असण्याचा संभव आहे. परंतु इतिहास, सामाजिक इतिहास, ग्रामीण, प्रादेशिक वातावरण, समाजस्थिति, प्रादेशिक नेतृत्व, स्वयंसेवकी वृत्ति व तत्कालीन धामधुमीच्या कालाचें वास्तव दर्शन या दृष्टींनीं या पोवाड्यांतील रेषा तशी अज्ञात नसली तथापि सुस्पष्ट व संग्राह्य आहे. त्या वेळच्या कारूनारूंच्या समाजाचें युद्धसामर्थ्य जिवंत असल्याचें या पोवाड्यांत निश्चयानें दिसतें. परस्परांच्या सहकार्याचा विलोभनीय आविष्कार दिसतो आणि अशा परंपरागत केवळ धार्मिक उत्सवांतहि परंपरेनें चालत आलेला स्थानिक कवित्वाचा कांहीं ऐतिहासिक ठेवा मिळण्याचा संभव ध्यानांत येतो.

(६) या सर्व गोष्टींचें प्रत्यंतर येण्यासाठीं वहींतील आतां तो पोवाडाच येथें देतों.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

या वहीमध्यें कांहीं नव्या आरत्या वगैरे निःसंशय मिळतील; परंतु त्यांचा प्रपंच अगदीं वेगळा म्हणून वेगळ्या वेळीं केला पाहिजे.

पवाडा

धन्य वैजापुर पांढरी तत्क बाळयाई। ज्या करणाराने कर्णी केली सवाई ॥ धृ ॥ मार्गशीर्ष मास लागला। की दखनामधे जाला गलबला। भोसल्या शहरावर्ती आला। निघाली स्वारी। गजबजली दूनीया अवघी सारी। खंडणीचे राऊत अले राव गांडापुरी ॥ तीस हजाराचा धडा टाकला भारी। गावांत मातला कलोळ लई गहजोरी। अकात वर्षला म्हणती गोष्ट नाही बरी। मोठा कहर वर्षला त्या गंगातीरी। तीन टोळ्या जाल्या परगणे गोष्ट नाहीं बरी। तळ नेमला काटे पिंपळगांवावरी। ते शीऊर पुलतांबे म्हणती सोन्याची चरी ॥ १ ॥ तीन मुकाम सीव नदीवर। अवघे मिळोनिया सरदार। करिती कुचाचा विच्यार। मनसोबा केला। नव हजार फौज घेऊन बाहेर चालला। कुल खेड्यापाड्यासी पळ सुटला। त्या सायगाव तीडीचे माथ्यावरती अला। देखिला गांव वैजापूर बाळाई किला। त्या वेळेस जासूद बातमीचा गेला। तुम्ही का भुलले माहाराज गांव मतवाला। तेथें मनांत गेली घैशत खतरा अला। ते पाई बोलले लाग नाहीं आपला। फिरून तळ जरूलावर नेमला। त्या गांव कसब्याची काय सांगू बटाई ॥ २ ॥ मार्गशीर्ष्य तीज बुधवार। तळ नेमला जरूळावर। गांव गजबजले वैजापूर धीर धरवेना जीवनाजी पंतअपाने धीरासा दीला। तो मोटा भाई मतवाला। मनसोबेवाला। रघूशेट होता बुधीवंत सागे चौघाला। बोलले रावजी भय नाहीं अपुल्याला। राहा 'येक चीते' मारू भोसल्याला। तो वैजनाथ पीरसाहेब रक्षणवाला। कुल अठरा ताफ्यावर गाजा केला। ते अपअपले मोरचे जागायला। मोरचे अटोपले अपले टाईच्या टाई। ते लहडणार लोक रजपूत कटे शीपाई ॥ ३ ॥ ऐसा करूनीया विच्यार। अवघे मीळोनी कारागीर। येकंदर लोहार सोनार। घडती गोळे कडाखा उठला। तोफाचे जाले बार ऐक गलबला। कांहीं जंबुरे गंडगुळे गणीत नाहीं त्याला। कांहीं बाणाचे जुडगे जुडगे आणी जजाला। तीथे कालुराम जमादार बोलाउन अणीला। खांलाकडील अलग सोपालीशे त्याला। नी वरलाकडील अलम संका पाटला। अचळखा दारूवाला तेथे अला। जी लागेल ती दारू पुरविन तुम्हाला। भरचयौंशि कसबा साटवला। च्यार प्रहर रात्रीचा गस्ती छबीला फीरला। दसदारभीमघाट कृष्ण अवतरला। त्या पहाटच्या समयात बार सुटला। त्या भोसल्याच्या लस्करांत धाक पडला। झाली लगबग लाहि येकच घाई। कूल हत्यार टाकुन पळतो लोक शीपाई ॥ ४ ॥ ते हे तक वैजापूर। जुनी पांढरी जोरावर। करुनी गेला सकेतार। कीर्त जनात बोलती सर्वत्र। गांव यशवंत। दीवाण भोसले बसुन करीती खलबत। घेतले राज्य गडकीले मुलुक अगणीत। नाही पाहिले वैजापूर ऐक्या वक्त। ते वैजापूर आहे दीलीचे तत्क। पुनाजी देव बोलले त्या कसब्यात। म्हणे नाना दीलभर शब्द बोलले सत। अहे वैजापूर पवाडा महशूर दख्खनात। लगबग लगबग लाहीया गाव कसब्याची सागू काय बढाई। इयांगड इयांगड वाजे नवबद मोगलाई ॥ धन्य ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१२ संतपूजक पंत

(श्री. रा. चिं. ढेरे, पुणें)

पंतांची लोकप्रियता

परशुरामपंततात्यांपासून डॉ. नांदापूरकरांपर्यंत अनेक रसिक पंडितांनीं मोरोपंतांच्या कवितेवर विस्तारानें लिहून ठेवलें आहे. पंतांना त्यांच्या हयातींतच पुण्यापासून काशीपर्यंत अनेक रसिकांचें प्रेम लाभलें आणि हयातीनंतरच्या दीड शतकांतहि त्यांच्या कवितेवर लुब्ध होणारे अनेक रसिक होऊन गेले. हरिभक्तिपरायण पांगारकरांनीं शेकडों पोथ्या आणि कागदपत्रें धांडोळून पंतांचें भौतिक आणि साहित्यिक चरित्र रसाळपणानें मांडलें. त्यांच्या समग्र काव्याचें सटीप प्रकाशनही झालें आहे. त्यांच्या काव्याचा आस्वाद घेणारीं कांहीं मंडळेंहि स्थापन झालेलीं होतीं. अभ्यासकांच्या आणि रसिकांच्या प्रीतीला इतक्या मोठ्या प्रमाणांत पात्र झालेला हा कवि आज मात्र वादविषय बनला आहे.

मानसिक विश्रांतीसाठीं काव्याचा आस्वाद घ्यावा म्हणून आजचा नवा रसिक पंतांच्या काव्याकडे वळण्याची शक्यता नाहीं. त्या दृष्टीनें प्राचीन काव्यभांडारांतील कांहीं वाचायचें झालें, तर तो ज्ञानेश्वरी वाचील, तुकारामाची गाथा हातीं घेईल, नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराकडे वळेल अथवा मुक्तेश्वराची 'भारती कथा' श्रवण करील; परंतु पंतांच्या वाटेला वळणार नाहीं. अर्थात् या माझ्या विधानालाहि कांहीं मर्यादा आहे. पंतांची प्रदीर्घ आर्याबद्ध रचना आज दुर्गम वाटत असली, तरी त्यांचीं कांहीं छोटीं प्रकरणें अकृत्रिम भावसौंदर्यानें रंगलेलीं आहेत, याचें जाणत्यांना भान आहे.

संत, पंत, तंत

मोरोपंत हे प्राचीन मराठी कविमंडळांत पंतकवींच्या वर्गांत मोडणारे आहेत. संतकवि, पंतकवि आणि तंतकवि असें प्राचीन मराठी कवींचें त्रिविध वर्गीकरण केलें जातें. पैकीं तंतकवि अथवा शाहीर यांची प्रकृति आणि त्यांच्या काव्यप्रेरणा सर्वस्वीं वेगळ्या असल्यामुळें त्यांचा वर्ग संत-पंतांपासून बराच दूर नांदणारा आहे. संतकवींची प्रतिष्ठा पंतकवींहून खूपच अधिक आहे आणि ती पंतकवींनाहि मान्य आहे.

परमार्थ ही केवळ संतकाव्याचीच नव्हे तर बहुतेक प्राचीन मराठी काव्याची प्रधान प्रेरणा आहे. मुक्ति हा परमपुरुषार्थ असून, भक्ति हीच जीवनव्यापिनी साधना आहे, अशी या प्राचीन कवींची श्रद्धा आहे. आपली वाणी केवळ हरिगुणसंकीर्तनांतच रमावी, तिनें इतर बाष्कळ प्रापंचिक गोष्टींत रमूं नये, असें त्यांना प्रामाणिकपणें वाटतें. त्याचमुळें ज्ञानेश्वरांसारखा हाडाचा महाकवि गीतार्थचिंतनांतच रमतो आणि गीतार्थाचें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निमित्त करून साक्षात्कारावें दर्शन घडविण्यासाठींच आपली वाणी राबवतो. 'वाचें बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व।' हें त्यांच्या कविप्रकृतीला मान्य आहे, परंतु ज्या रसिक कवित्वाला परतत्त्वाचा स्पर्श नाहीं, तें काव्य त्यांच्या आदराचा विषय होऊं शकत नाहीं. समर्थ रामदासांना भक्तिशून्य काव्य हें श्वानाच्या भुंकण्यासारखें वाटतें. प्रभूच्या प्रसादानें जें पुनीत झालें आहे, असें काव्यच त्यांना मान्य आहे.

संतकवींची अस्सल कविता

संतकवींची ही काव्यविषयक भूमिका उसनी नाहीं—त्यांच्यावर कोणीं लादलेली नाहीं, तर ती त्यांच्या जीवननिर्झरांतून उमललेली आहे. त्यांचें काव्य भक्तिपर आहे, याचें कारण त्यांचें जीवन भक्तिमय होतें. 'अंतरींचें धावे स्वभावें बाहेरीं।' या प्रक्रियेनें त्यांची भक्तिकविता निर्माण झालेली आहे. ज्यांचे श्वासोच्छ्वासहि प्रबंध बनून प्रगटत, त्यांच्या फुप्फुसांत केवळ भक्तीचाच प्राणवायु खेळत असल्यामुळें त्या प्रबंधांतहि भक्तिच अवतरली तर तें स्वाभाविकच आहे. त्याचमुळें संतकविता ही स्थूल दृष्टीला एक छापाची आणि त्याचमुळें काव्यदृष्ट्या शबलित वाटली, तरी संतकवींनीं आपल्या भावानुभवांशीं संपूर्ण इमान राखून लिहिलेली ही कविता अस्सल कविता आहे !

पंतकविता कला नव्हे-कारागिरी

पंतकवींच्या काव्याच्या बाबतींत मात्र असें म्हणतां यायचें नाहीं. पंतकवि हे संतांनीं पुरस्कारिलेल्या पारमार्थिक जीवनमूल्यांच्या प्रभावांतून सुटूं शकले नाहींत आणि परमार्थ हा जीवनधर्महि बनवूं शकले नाहींत. त्यामुळें बऱ्याच पंतकवींची अवस्था "अरत्र ना परत्र" अशी झाली आहे.

या पंतकवींतील महानुभावीय आद्यकवि मात्र आपल्या कविभूमिकेपासून चळले नाहींत. तेहि साधक आहेत. परंतु आपल्या उपास्याला—श्रीकृष्णाला—काव्याचा नायक बनविण्याव्यतिरिक्त त्यांनीं काव्यांत परमार्थ येऊं दिला नाहीं. विदग्ध संस्कृत कवीचा वारसा त्यांनीं शुद्ध स्वरूपांत स्वीकारला आणि ओवीसारख्या आर्ष छंदांत काव्यरचना केली. त्यामुळें त्यांचीं काव्यें संस्कृत आणि प्राकृत रसिकांना सारखींच प्रिय व्हावींत, अशीं बनलीं. पंतकवितेचें हें वळण पुढें टिकलें नाहीं. शिवकालापासून बहरास आलेल्या पंतकवितेंत संस्कृत कवितेच्या ऱ्हासकालीन स्वरूपाचें अनुकरण होत राहिलें आणि कारागिरीलाच कला समजण्याइतकी काव्याभिरुचि ढासळत गेली.

मोरोपंतांची घडण

मोरोपंत हे महानुभावेतर मराठी पंतकवींचे सम्राट् समजले जातात. त्यांनीं वयाच्या पंचविशीपर्यंत केशव पाध्ये व गणेश पाध्ये यांसारख्या प्रकांड पंडितांच्या चरणांशीं बसून संस्कृतांतील अनेक ज्ञानशाखांचा सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांच्या संग्रहांतल्या आणि त्यांनीं स्वहस्तें नकललेल्या ग्रंथांची यादी पाहतां त्यांत संस्कृतांतील काव्यनाटकें आहेत'

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

साहित्यशास्त्रविषयक ग्रंथ आहेत, तत्त्वज्ञान आहे, वैद्यक आहे व ज्योतिषहि आहे. या काळांत त्यांनीं जसें रघुवंशासारखें सहजसुंदर महाकाव्य अभ्यासलें होतें, तसेंच राघव-पांडवीयासारख्या द्व्यर्थी काव्यांचीहि उकल केली होती.

हा विद्याध्ययनाचा काळ संपल्यावर सतत साडेतीन तपांएवढा काळ पंतांनीं काव्यसाधनेंत घालविला. " कांहीं तरावया गावें " या उद्दिष्टानेंच आपण काव्य रचतों आहोंत, अशी त्यांची श्रद्धा होती. पारमार्थिक मूल्यांविषयीं त्यांच्या मनांत अपार निष्ठा वसत होती आणि संतांविषयींचा पूज्यभाव त्यांच्या हृदयांत काठोकाठ भरलेला होता.

संतपूजक पंत

संतांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यासाठीं पंतांनीं हजारावर आर्या रचलेल्या आहेत. आपलें मन प्रभूच्या चरणीं अष्टौप्रहर लीन होऊन राहावें, म्हणून त्यांनीं संतांना कळवळून विनवणी केली आहे —

हो सकृप पुंडरीका ! ज्ञानेशा ! पाव, नामदेवा ! हूं.
सांग तुकोबा ! प्रभुच्या चरणीं मन आठ याम दे वाहूं.

चोखामेळ्यासारख्या यातिहीन महारापासून कबीरासारख्या यवनापर्यंत सर्व संतांचा त्यांनीं मुक्त मनानें गौरव केला आहे.

मागें झाले, आतां असती, होणार जे पुढें काय,
त्या भागवतांचे म्यां भावें साष्टांग वंदिले पाय !

अशा शब्दांत त्यांनीं भूत-वर्तमान-भविष्यांतील संतांना प्रणिपात केला आहे. सन्मणिमालेंत त्यांनीं केवळ महाराष्ट्रांतीलच नव्हे, तर अखिल भारतांतील संतांचीं नांवें गुंफून त्यांच्या भक्तिजीवनाचीं व कवितेचीं वैशिष्ट्यें मार्मिकतेनें टिपलीं आहेत. या सन्मणिमालेवरून सूचित होणारा पंतांचा प्राकृत कवितेचा व्यासंग आजवर अनेक अभ्यासकांनीं—त्यांच्या काव्याचें सूक्ष्म अवलोकन करून—स्पष्ट करून दाखविला आहे. ' प्रभुभक्त प्रभुरूप स्पष्ट ' अशी त्यांची संतांविषयींची श्रद्धा आहे.

साधु, प्राणी पाहुनि संसारीं तापले, असुख पावे.
' व्हावें जग मुदित ' म्हणे, तद्दुखें आपले असु खपावे.

ही साधूंची वृत्ति पंतांना परिचित आहे. प्रणत जनांचें कार्य सिद्धीस नेण्यासाठीं साधु मरण पतकरतात, या साधूंच्या रीतीचा त्यांनीं अनेकवार गौरव गायिला आहे. साधुदर्शनाचा प्रभाव वर्णितांना ते संतांना उद्देशून म्हणतात—

हरितां दर्शनमात्रें सर्वांच्या पापतापदैन्यांतें.
भयद तुम्ही षडरीतें, रामशर जसे पलाश सैन्यातें.

संतांचें सामर्थ्य देवाधिक आहे, असें त्यांचें प्रामाणिक मत आहे. तापत्रयाचें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हरण करणारा सत्संग त्यांना सदैव हवाहवासा वाटतो. देव हा पित्यासारखा आहे, तर संत हे मातेसारखे आहेत, असें पंतांचें म्हणणें आहे—

मज दीना देवाहुनि अधिक तुम्ही संत सर्वथा धर्मे ।
बाळा जेविं पित्याहुनि अधिका माताचि यावया शर्मे ॥

मोरोपंत हे असे संतपूजक आहेत. संतांविषयींचा पूज्यभाव हा त्यांच्या बाबतींत केवळ उपचार नाहीं. त्यांची संतप्रीति प्रामाणिक आहे आणि आपलें जीवन संतांच्या संस्पर्शानें धवळून जावें, अशी त्यांची आंतरिक तळमळ आहे. त्यांच्या संतस्तुतिपर कवितेंत त्यांची मुमुक्षुता तीव्रपणें जाणवतें. असें असूनहि मोरोपंतांची कविता संतांच्या सर्वजनसुगम हृदयस्पर्शी कवितेच्या वळणावर न जातां इतकी पांडित्यजड कां बनावी ?

पंतांचें आचरण शुद्ध होतें. त्यांनीं आदर्श गृहस्थाश्रम आचरिला आणि जेवढें शक्य होईल तेवढें परमार्थपोषक वर्तन ठेवलें. त्यांच्या हृदयांत कुणाहिविषयीं द्वेषभाव नव्हता कीं मत्सर नव्हता. परमार्थसाधनेला अनुकूल अशी त्यांच्या मनाची भूमिका होती. तरीहि त्यांची कविता केवळ मूठभर व्युत्पन्न पंडितांना बुद्धिविलासासाठीं पढिक कीर्तनकारांना श्रोत्यांवर छाप पाडण्यासाठीं उपयोगी पडावी, ही वस्तुस्थिति पंतांच्या पारमार्थिक प्रकृतीला शोभणारी नाहीं.

पंतांच्या पारमार्थिकतेची मर्यादा

ज्याच्या ठायीं संतभूमिका बाणूं लागते, त्यांच्या सहजोद्गारांना लीलया काव्यात्मता लाभते—मग तो कवि असो, नसो. आपल्या पारमार्थिक अनुभवांचें, व्यथावेदनांचें व आनंदाचें व्यक्तीकरण करणें आणि दुरिताचें तिमिर दूर करण्यासाठीं तळमळून उपदेश करणें हे संतवाणीचे विशेष आहेत. आत्मपरीक्षण, आत्मशुद्धीकरण आणि आत्मसमर्पण हे संतांच्या जीवनाचे विशेष त्यांच्या वाणीलाहि आगळें सामर्थ्य प्रदान करतात. पंतांच्या कवितेच्या फार मोठ्या भागांत या विशेषाचा आढळ होत नाहीं. याचा अर्थ असा कीं, पंत मुमुक्षु असूनहि 'याचि देहीं याचि डोळां' परमप्राप्तीचा सोहळा अनुभवण्याइतकी त्यांच्या परमार्थसाधनेला गति लाभली नाहीं. ते दीर्घ काळ केवळ मुमुक्षूतेच्याच पायरीवर तिष्ठत राहिले आणि त्या पायरीवर असतांनाच त्यांच्यांतील पंडित त्यांच्यांतील कवीवर मात करून काव्यरचना करीत राहिला.

पण असाहि एक प्रश्न उपस्थित होतो कीं, पंतांच्या ठायीं, गुदमरलेल्या अवस्थेंत कां होईना, कवि नांदत होता काय ?

पंतांच्या प्रतिभेचे पहिले उन्मेष

पंतांच्या कवितेचे क्लिष्ट व दुर्बोध स्वरूप पाहून अलीकडच्या अनेक समीक्षकांनीं पंतांच्या कवित्वाविषयींच शंका उपस्थित केली आहे. त्यांच्या कवितेंतील आत्यंतिक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

संस्कृतप्रचुरता, प्रदीर्घ समासांनीं युक्त अशा पंक्ति आणि प्रदीर्घ यमकांच्या हव्यासांतून होणारी शब्दांची मोडतोड यांमुळें त्यांची कविता आशयाच्या सहजप्रसवाला अवघडली आहे, असें या आधुनिक समीक्षकांना वाटतें आणि त्यांना तसें वाटणें स्वाभाविकहि आहे. परंतु त्यामुळें पंतांच्या अभिजात कवित्वशक्तीविषयीं शंका घेणें मात्र रास्त ठरणार नाहीं.

पंतांनीं आपल्या प्रतिभेच्या वेलीवर फुललेलीं काव्यपुष्पें घेऊन शारदेच्या मंदिरांत जेव्हां पहिलें पाऊल टाकलें, तेव्हां त्यांच्या प्रतिभेच्या त्या पहिल्या-वहिल्या बहरानें शारदेचें हृदय दरवळून गेलें. पंतांनीं नाइकांच्या मुलींसाठीं रचलेलीं तीन सतीगीतें हीं त्यांनीं रचलेलीं पहिलीं वहिलीं—काव्यें आहेत—सीतागीत, रुक्मिणीगीत आणि सावित्रीगीत. स्त्रियांच्या मुखीं असणाऱ्या अभंगसदृश ओवीछंदांत रचलेलीं, गीतविषय स्त्रीच आत्मनिवेदन करीत आहे अशा भूमिकेंतून गायिलेलीं आणि स्त्री-हृदयांतील सर्व भावसौंदर्य सहजसुभग शैलींत व्यक्त करणारीं हीं तीन प्रदीर्घ गीतें पंतांच्या ठायीं वसत असलेल्या जातिवंत कवीचें स्पष्ट दर्शन घडवितात. त्यांतील एकटें ' सीतागीत ' आपण वाचलें, तरी आपण पंतांच्या कवित्वशक्तीवर मुग्ध होऊन जाल.

वनवासाहून परतल्यानंतर सीता आपल्या जावांशीं म्हणजे पूर्वाश्रमींच्या बहिणींशीं गुजगोष्टी करीत बसली आहे. सीतेला त्या वनवासकथा विचारीत आहेत आणि त्यांनी आपल्या वनवासकथेचें धावतें निवेदन ती करीत आहे, अशी या काव्याची भूमिका आहे. इतिहासाचा विषय झालेली वेदना स्निग्धजनांच्या सान्निध्यांत सांगणें-या भूमिकेंतच मुळीं काव्यात्मता आहे. सीता बहिणींना सांगते आहे —

चित्रकूटाहूनी । पादुका घेऊनी ।
वियोग देऊनी । तुम्ही आलां ॥
आम्हीही तेथूनी । तशींच निघालों ।
वनांत रिघालों । तिघें जणें ॥
लक्ष्मण भावोजी । मागें, पुढें स्वामी ।
मज आहे धामीं । ऐसें वाटे ॥
न बाधेचि मज । उष्ण क्षुधा तृषा ।
तुम्हांपाशीं मृषा । न बोलावें ॥
जेव्हां कांहीं वाटे । चालता मी मागें ।
मुरडोनि मागें । विलोकिती ॥
बाई ! काय सांगों । स्वामींची ती दृष्टी ।
अमृताची वृष्टी । मज होय ॥

या अशा अमृतमय चित्रांची मालिकाच पंतांनीं उभी केली आहे. " मज आहे धामीं । ऐसें वाटे ॥ ' या पंक्तींत पंतांची अल्पाक्षररमणीय शैली प्रकर्षानें प्रकटली आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राम-सीतेच्या प्रीतींतील संयत भावावेग प्रकट करतांना पंतांची प्रतिभा सीतेच्या हृदयाशीं संपूर्ण समरसता पावलेली दिसते. त्याशिवाय—

बाई ! काय सांगों । स्वामींची ती दृष्टी ।
अमृताची वृष्टी । मज होय ॥

यांसारखी शब्दावली प्रकटतीच ना ! रावणानें सीताहरण केल्यानंतर रामलक्ष्मण पर्णशाळेकडे येतात, तो प्रसंग सीतामुखानें वर्णितांना पंत म्हणतात —

दोघांच्या हृदयीं । धडधड करी ।
आले झडकरी । धावोनियां ॥
पर्णशाळेमध्यें । देखिले कावळे ॥
स्वामींचा मावळे । धैर्यसूर्य ॥

या वर्णनांतील प्रतीकात्मकता रामहृदयाला अंतर्बाह्य काळवंडून टाकणाऱ्या व्यथेची घनता किती समर्थपणें व्यक्त करते आहे ! पर्णशाळेंत वावरणारे कावळे अशुभ घटनेचें स्पष्ट सूचन करताहेत आणि तें सूचन जाणवतांच रामाचा धैर्यसूर्य मावळून सर्व अंतर्बाह्य विश्व अंधारून जात आहे.

नेऊनियां ठेवी । अशोकवनांत ।
न शोक मनांत । माये माझ्या ॥

यासारख्या ओव्यांत केवळ शब्दांची कसरत नाहीं, हें सहृदय वाचकांना सहज जाणवेल. रावणवधानंतरचें वृत्त सांगतांना—

शिबिकेंत मज । घालोनि आणिलें ।
देह म्यां न्हाणिलें । अग्निकुंडीं ॥

असा आपल्या अग्निदिव्याचा उल्लेख सीतेनें केला आहे. "देह म्यां न्हाणिलें। अग्निकुंडीं ॥" ही शब्दावली सीतेच्या सतीत्वाचें प्रखर तेज सहजपणें प्रत्ययास आणणारी आहे.

सीता अग्निदिव्यांतून उजळून निघाल्यानंतर रामानें तिचा मुक्त प्रीतीनें स्वीकार केला. त्या प्रसंगाविषयीं सीता म्हणते—

मांडीवरी मज । घेतलें स्वामींनीं ।
घनीं सौदामिनी । जनां वाटे ॥

या पंक्तींतील कल्पना नवी नसली, तरी प्रस्तुत काव्यांत ती ज्या पार्श्वभूमीवर आणि ज्या संदर्भांत पंतांनीं योजली आहे, त्यामुळें ती अत्यंत आशयघन बनलेली आहे. या कल्पनेंत रामाचें केवळ सावळेपणच व्यक्त झालेलें नाहीं, तर त्यांत त्याच्या

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

प्रीतीची आर्द्रता आणि आवेग आहे आणि तेजस्विनी सीतेच्या सान्निध्यानें त्याच्या जीवनाला झळाळी लाभली आहे !

पंतांचीं हीं सतीगीतें अशीं हृदयंगम आहेत. त्यांनीं शब्दांच्या मितव्ययांतून आशयाचीं सहस्र वलयें निर्माण केलीं आहेत. या गीतांत शिवशक्तीप्रमाणें वागर्थाचें समरसीकरण झालें आहे. नवल असें कीं, पंतांची ही पहिली-वहिली रचना आहे. ज्यानें शारदेची पहिली पूजा इतक्या सरस-सुगंधी पुष्पांनीं केली, त्याच्या कवित्वाविषयींच शंका घेणें हा आगला करंटेपणा ठरेल. मोरोपंत कवि होते-त्यांच्या ठायीं अव्वल दर्जाची कवित्वशक्ति वास करीत होती, यांत संशय नाहीं. त्यांच्या प्रचंड काव्यसंभारांत ही इतकी सुंदर कविता अत्यल्प आहे, हें मात्र खरें. ज्याच्या ठायीं अव्वल दर्जाची कवित्वशक्ति वास करीत होती, त्यानें प्रचंड रचना करूनहि तींत अव्वल दर्जाची रचना अत्यल्प असावी, हें कसें ? हाच प्रश्न पंतांच्या काव्यजीवनांतील विपरीत स्थितीवर प्रकाश टाकणारा ठरेल.

पंडितांनीं कवींवर मात केली

आतांपर्यंत आपण पाहिलेंच आहे कीं, मोरोपंत हे जसे पारमार्थिक होते, तसेच हाडाचे कवि होते. असें असूनहि त्यांची कविता केवळ पंडितगम्य बनली. ही वस्तुस्थिति सरळ सरळ असें दाखविते कीं, मोरोपंतांनीं काव्यरचनेला प्रारंभ केल्यापासूनच त्यांच्याभोंवतीं संस्कृतविद्येंत मुरलेल्या पंडितांचें कडें पडलें असावें. स्वतः पंतांनीं विद्यार्थिदशेंत अनेक शास्त्रांचें सूक्ष्म अध्ययन केलें होतें. हे पंडित मोरोपंत आपल्या पांडित्याला पांडित्याच्या कक्षेंत ठेवून विशुद्ध काव्यसाधनेंत मग्न होऊं लागतांच त्यांचे पंडित समानधर्मे त्यांच्याभोंवतीं गोळा होऊन त्यांच्या पांडित्याचा गौरव करून त्यांना सुखवूं लागले असावे. या विशिष्ट प्रवृत्तीच्या रसिकांच्या आग्रहाखातर पंतांनीं पंडितांना सुख देऊं शकेल, अशा रचनेला प्रारंभ केला असावा आणि तशा प्रकारच्या रचनेचें पंडित मंडळींत प्रचंड प्रमाणांत कौतुक होऊं लागल्यामुळें तशाच सरणीनें काव्यरचना करण्याचा छंद पंतांना जडला असावा.

विशिष्ट प्रमाणांत पारमार्थिक संस्कार झालेले असल्यामुळें पंतांनीं रामायण-महाभारत-भागवत यांसारख्या भक्तिमान्य विषयांवरच रचना केली असली, तरी त्या रचनेंत नरेंद्र-भास्कर-दामोदराची रससंपन्न विदग्धता जाणवत नाहीं आणि मुक्तेश्वराची भव्य आर्षताहि जाणवत नाहीं. ' जाणवत नाहीं ' हे शब्द मीं हेतुतः वापरले आहेत. कारण पंतांच्या कवितेंत हे सर्व गुण वसत असल्याचें अनेक पंडितांनीं आपल्या पांडित्यबळावर सिद्ध केलें आहे. कविता हा चर्चेचा विषय नसून, आस्वादनाचा विषय असल्यामुळेंच मी ' जाणवत नाहीं ' असें म्हटलें आहे.

संस्कृत काव्याच्या ऱ्हासकाळांत काव्यावरून काव्यशास्त्र बनण्याऐवजीं काव्य-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

शास्त्रावरून काव्य बनूं लागलें होतें. कृत्रिम अलंकारांचें प्रस्थ वाढलें होतें. क्लिष्ट रचना आणि चित्रबंधरचना यांचें कौतुक सुरू झालें होतें. वांझ पांडित्य या काव्यांत आणि त्यांच्या बौद्धिक चर्चेंत रंगत होतें. महाराष्ट्रांत प्राकृत कवितेचा तिरस्कार करणारा आणि संस्कृत विद्येचा अभिमानी असलेला जो पंडितांचा वर्ग होता, त्याला प्राकृत काव्यापेक्षां संस्कृत कविता श्रेष्ठ वाटे, ती त्याच्या या चमत्कृतीमुळें. या चमत्कृति प्राकृतांत-म्हणजे मराठींत करून दाखविणारा कवि त्यांच्या आदराला पात्र होई. पंत ज्यांच्या आहारीं गेले, ते त्यांच्या कवितेचे रसिक या पठडींतले होते आणि त्याचमुळें पंत आपल्यांतील कवीला हरवून बसले, असें मला वाटतें.

जीवनाच्या अखेरीस मात्र पंतांची मुमुक्षुता पुनः तीव्रतेनें उफाळून आली. मृत्यूपूर्वी सहा वर्षें ते काशीयात्रेला गेले असतां त्यांनीं 'गंगावकिली' या काव्यांत गंगेला जी प्रार्थना केली आहे, तींत केवळ आपलाच नव्हे, तर आपल्या संबंधांतील सर्वांचाच उद्धार करण्याची विनवणी केली आहे. 'श्लोककेकावली' हें त्यांचें अमर भक्तिकाव्य काशीयात्रेहून परत आल्यावर त्यांनीं रचलेलें आहे. या काव्यांत पंतांचें भक्तहृदय कवीच्या साहाय्यानें उत्कटपणें व्यक्त झालें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रारंभींच्या सतीगीतानंतर पंतांच्या ठायीं दबून राहिलेला कवि सहजतेनें व्यक्त झालेला दिसतो, तो याच काव्यांत. या काव्याच्या रचनेनंतर पंतांना रामाचा साक्षात्कार झाला, असें म्हणतात. यानंतर लवकरच वयाच्या पासष्टाव्या वर्षी शके १७१६ तील हनुमज्जयंतीच्या दिवशीं पंतांनीं अत्यंत समाधानानें श्रीरामचरणीं देह ठेवला. त्यांच्या प्रचंड काव्यसंभाराच्या वाङ्मयगुणांबद्दल कितीहि वाद होत राहिले, तरी प्रारंभींचीं सतीगीतें आणि अखेरची 'श्लोककेकावली' यांमुळें त्यांना मराठी साहित्यांत चिरंतनता प्राप्त झाली आहे, हें निःसंशय. त्यांच्या समकालीन असलेल्या एका रसिकाच्या शब्दांत सांगायचें तर—

ऐकुनि विश्व सुखावें ज्या केकांचा अपूर्व तो टाहो।
त्याला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तोटा हो ॥

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१३. चिदंबर-शिष्य राजारामाची ग्रंथसंपदा

(श्री. म. वि. निखळ, पुणें.)

गुलहोसूर येथील विख्यात सिद्धपुरुष श्रीचिदंबर दीक्षित यांचा पट्टशिष्य राजाराम (श. १६९०–१७६५) याच्या चरित्राचा आणि ग्रंथरचनेचा स्थूल परिचय श्री. ज. र. आजगांवकर आणि डॉ. पंडित आवळीकर यांनीं करून दिलेला असला, तरी कर्नाटकांत चिदंबर संप्रदायाचा विस्तार करण्याचें आणि अक्षरशः सागरासारखी प्रचंड ग्रंथरचना करण्याचें त्यानें केलेलें कार्य पुष्कळसें अलक्षितच राहिलें आहे.

राजारामानें प्रचंड अभंगरचना केली असून, अनेक स्फुट ग्रंथहि रचले आहेत. सुमारें दीड लाख अभंग (१,५१,४९१) आणि ' निजात्मबोध ', ' ब्रह्मानंदलहरी', 'महानुभाव', ' ज्ञानगर्भ ', 'ब्रह्मानुभव', 'सद्गुरूपदेश ', 'गुरुगम्य ठेव', ' अद्वैतसार ' इ लघुग्रंथ एवढा त्याच्या ग्रंथांचा व्याप आहे. त्याचे लघुग्रंथ बेळगांवच्या रामतत्त्वप्रकाशनें प्रकाशित केले आहेत, असें श्री. आजगांवकरांनीं लिहून ठेवलें आहे. परंतु मला फक्त ' निजात्मबोध ' आणि ' अद्वैतसार ' हे दोनच ग्रंथ मुद्रित स्वरूपांत पाहावयास मिळाले. अभंगांपैकीं चिदंबरवरप्रसादाचे म्हणून ५२७ अभंग ' चिदंबरवरप्रसाद अभंगगाथा ' या नांवानें रामतत्त्वप्रकाशनेंच प्रसिद्ध केले आहेत.

मला अलीकडेच नारायणगांव (ता. जुन्नर, जि. पुणें) येथें श्री. नारायण गोपाळ वाकनीस यांनीं जुन्या हस्तलिखितावरून नकललेले राजारामाचे चार लघुग्रंथ उपलब्ध झाले आहेत. ' अद्वैतसार ', ' ब्रह्मानुभव ', ' सद्गुरूपदेश ' आणि ' गुरुगम्य ठेवा ', हे ते चार ग्रंथ होत. हे चारहि ग्रंथ कदाचित् पूर्वप्रकाशित असतीलहि, परंतु ते हस्तलिखितांइतकेच दुष्प्राप्य असल्यामुळें माझ्या हातीं असलेल्या हस्तलिखितांवरून त्यांचा स्थूल परिचय करून देत आहें.

या चार ग्रंथांपैकीं ' अद्वैतसार ' हा ग्रंथ ' चिदंबर-अद्वैत पंचरत्न ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पांच ग्रंथांपैकीं पांचवा आहे. ' अद्वैतसारा 'च्या नकलेनंतर या ग्रंथपंचकाचा उल्लेख असा आहे—

निजात्मबोध, चिदंबरसहस्रनाम पूर्ण । **करुणासागर, अमृतानंद** गहन ।
अद्वैतसार पंचग्रंथ पंचरत्न । वदवी पूर्ण चिदंबर ॥

या हस्तलिखिताचे लेखक श्री. ना. गो. वाकनीस यांचें वास्तव्य नारायणगांवच्या बालाजी मठांत होतें. हे गृहस्थ कथा-प्रवचनें करीत असत. ते सुमारें पंधरावीस वर्षांपूर्वी वारले. त्यांना मागें कोणीच नसल्यामुळें नारायणगांवचा बालाजी मठ आणि त्याचा चिदंबर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

संप्रदायाशीं असलेला संबंध याविषयीं निश्चयानें कांहींच सांगतां येत नाहीं. या चार ग्रंथांचें स्थूल स्वरूप पुढीलप्रमाणें—

(१) **अद्वैतसार** :—(१५२ ओव्या) या ग्रंथाचें मूळ हस्तलिखित श. १७६१ विकारी संवत्सर आषाढ शु. ७ गुरुवारीं लिहिलेलें असून, त्यावरून श्री. ना. गो. वाकनीस यांनीं श. १८५३ प्रजापति संवत्सर आषाढ वद्य ११, सोमवारीं नारायणगांवीं नकल केलेली आहे. या ग्रंथांत राजारामानें अद्वैत वेदान्त सोप्या व ओघवत्या वाणीनें नित्य व्यवहारांतील दृष्टान्तांच्या साहाय्यानें समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व चराचरामध्यें एकच ईश्वर व्यापून राहिला आहे आणि त्याची प्रचीति सद्गुरुकृपेनेंच घडते, असें म्हटलें आहे. पहिल्या ५० ओव्यांमध्यें 'अद्वैत म्हणजे काय?' याविषयीं स्थूल विचार मांडलेला आहे. ते म्हणतात —

जे वस्तु आदि-मध्य-अंतरहित । तयासिच नाम अद्वैत ।
स्वसंवेद्य अखंडित । पारावाररहित अक्षयी ॥

ऐसा अनंत अपार सर्वेश्वर । सर्वां ठाईं एक ईश्वर ।
व्यापियेलें चराचर । अद्वैत चिदंबर दुजें नाहीं ॥

अधिक स्पष्टीकरण करतांना 'घटांमाजी गगन', 'तंतुपट', 'सोन्याचे भिन्न दागिने पण मुळांत सोनें एकच' असे परिचित दृष्टान्त दिले आहेत. अद्वैत अनुभव सद्गुरुकृपेनें लाभतो, असें वेळोवेळीं म्हटलें आहे.

जेथें नसे ध्येय ध्याता ध्यान । नुरेचि ज्ञाता ज्ञेय ज्ञान ।
असे स्वतःसिद्ध स्वयंभू आपण । अनुभव खूण सद्गुरुकृपें ॥ ४७ ॥

जे चहूं वेदांसि, वाचेसि अगोचर । तें ब्रह्म सद्गुरुकृपें होतसें गोचर ।
निजबोधें निववती अंतर । ब्रह्म साक्षात्कार करूनि देती ॥ ७० ॥

विश्वामाजीं विश्वंभर । सर्वांठायीं निरंतर ।
एकरूप चिदंबर । होतसे गोचर सद्गुरुकृपें ॥ १३८ ॥

'अद्वैत' अनुभव आगळाच आहे; त्याचें वर्णन करणें अशक्य. मुक्यानें साखर खाल्ली असतां त्याची गोडी सांगणें जसें कठीण, तद्वत् हा अनुभव असतो. सद्गुरुकृपेनें सारें प्राप्त होतें, असें राजारामानें म्हटलें आहे.

(२) **ब्रह्मानुभव** :—(ओव्या ६७) सद्गुरुकृपेनें राजारामाला 'ब्रह्मानुभव' घडला. हा 'ब्रह्मानुभव' अथवा 'ब्रह्मसुख' केवळ गुरुकृपेनेंच लाभूं शकतें, असें या ग्रंथांत म्हटलें आहे.

तुझिया कृपेविण कांहीं । ब्रह्मसुख कल्पांतीं नाहीं ।
हें निश्चय करूनियां पाही । मज हृदयीं कवळिलें त्वां ॥ ३ ॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

'आपणांसारिखे करिती तत्काळ' या उक्तीप्रमाणें चिदंबरांना शरण जातांच आपणांस त्यांनीं ब्रह्मानुभव घडविला, असें राजारामानें या ग्रंथांत म्हटलें आहे. स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान म्हणजेच 'ब्रह्मानुभव'. एकच आत्मा सर्वव्यापी असून त्याचा साक्षात्कार स्वानुभवानें घडणें हा 'आत्मसाक्षात्कार'.

एकचि आत्मा देह्यदेहीं। देहीं असोनि विदेही।
ब्रह्मानुभवी जाणती ॥ १९ ॥

परन्तु हा 'ब्रह्मानंद' सद्गुरूच्या कृपेनेंच लाभूं शकतो—

अनुभव सद्गुरूच्या कृपेंकरून। कळों येतसे जातां शरण।
ब्रह्मानंद अंतरीं जाण। कळतसे खूण स्वरूपाची ॥ २० ॥

हें कथन करतांना राजारामानें भक्तजनांना निक्षून सांगितलें आहे कीं—

हे बोल नव्हति माझ्या पदरिचें। स्वयें चिदंबर सांगे वाचे।
साक्ष चरण आहे त्याचे। होय भाविकाचें काज येथें ॥ ४३ ॥

शेवटीं जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घेऊन नरदेहाचें सार्थक करण्यासाठीं सद्गुरूला शरण जाण्यास सांगितलें आहे.

(३) सद्गुरूपदेश :—५३ ओव्यांचा हा लघुग्रंथ आहे. याची नकल श. १८५५ श्रीमुख संवत्सर कार्तिक शु. १ या दिवशीं केली आहे.

आत्मज्ञानाची तळमळ अंतःकरणांत होती; त्यासाठीं जप, तप, तीर्थाटनें केलीं; उपासतापास केले; परन्तु समाधान लाभलें नाहीं. शेवटीं सद्गुरूच्या अनुग्रहामुळें 'निजसुख'-प्राप्ति झाली, असें स्वानुभवानें राजारामानें म्हटलें आहे.

सद्गुरूंनीं कृपाहस्तक मस्तकीं ठेविला; संमुख बसवून अनुग्रह करून त्रिवार उपदेश केला; त्यामुळें 'ज्ञानदृष्टि' प्राप्त झाली, आत्मसाक्षात्कार घडला. राजारामाला गुरुकृपेव्यतिरिक्त अन्य साधनांची व्यर्थता स्वानुभवानें पटल्यामुळें त्यानें भक्तभाविकांना विनविलें आहे कीं, ब्रह्मसुखास्तव अथवा आत्मसाक्षात्कारासाठीं प्रपंच सोडून वनांत जाण्याचें कारण नाहीं; योगसाधनेची आवश्यकता नाहीं; स्वतःच्या हृदयांत त्याचें निवासस्थान आहे. त्याची प्रचीति श्रीगुरुकृपेनेंच मिळवा.

न लागे जाणे गिरिकंदरा। नका कोंडू ब्रह्मांडीं वारा।
सर्वसुखांचिया निजघरां। हृदयमंदिरीं आत्माराम ॥ १४ ॥

हृदयस्थ आत्माराम निरंतर। सबाह्य भरला चिदंबर
ज्ञानदृष्टि दिसे गोचर। अनुभव साक्षात्कार या नांव ॥ १५ ॥

सर्वत्र 'ब्रह्म' स्वरूप पाहणें हेंच सर्व श्रुतिशास्त्राचें मर्म आहे, असें सांगून तो म्हणतो—

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

समब्रह्म पाहे सदोदित । त्यासीच वर्णिती गीता भागवत ।
न लगे पाहणें नानाग्रंथ । मुख्य वेदांत अर्थ इतुकाचि ॥ २९ ॥

सद्गुरुकृपाबोध झाल्यावर जीवशिवाचें ऐक्य होतें, स्वानंदसुखाची प्राप्ति होते. श्रद्धेनें, निष्ठेनें सद्गुरुकृपेचा लाभ घ्यावा, असा त्याचा अखेरचा सांगावा आहे.

(४) **गुरुगम्य ठेवा** :—३७ ओव्यांचें हें छोटें प्रकरण ' निजगुज ' जाणण्यासाठीं व प्राप्तीसाठीं मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडेल. मोक्षप्राप्तीसाठीं नाना तऱ्हेचीं साधनें असलीं, तरी श्रीसद्गुरुकृपेवांचून तीं व्यर्थ आहेत, हाच विचार मागील प्रकरणांत सांगितला आहे.

सर्व साधनें वायांचि पाही । ब्रह्मप्राप्तीवीण मोक्ष नाहीं ॥ ३ ॥
नाना प्रकारें देह दिसती । आत्मा सारिखा सर्वांभूतीं ॥
सजीवनिर्जीव वस्तुमात्रीं । आत्मा एक असे ॥ १२ ॥

परंतु हें सारें गुरुकृपेनें घडतें; गुरूपदेशानें अंतःकर्ण निवांत होतें; स्वस्वरूपबोध होतो.

निवांत झालिया अंतःकर्ण । प्राप्तीलागीं नुरे वेगळेंपण ।
वस्तु अंगेंचि असे आपण । गुरुकृपें खूण कळों येति ॥ ३२ ॥

थोडक्यांत सांगावयाचें झालें तर या चारहि प्रकरणांत राजारामानें गुरुकृपेची महती मुक्तकंठानें गायिली असून, गुरुकृपेनें प्राप्त होणाऱ्या अद्वैतानुभवाचें अनिर्वचनीयत्व विवरिलें आहे.

राजारामाची रचना उदंड असून ती प्रासादिक आहे. ओघवत्या व प्रसन्न भाषाशैलीमुळें वेदान्ताचीं गहन तत्त्वें सहजसुलभ झालीं आहेत. शब्दांमागें अनुभवाची बैठक असल्यामुळें वाचकांच्या मनावर खोलवर ठसा उमटविण्याची शक्ति त्यांत निहित आहे. एवढी विपुल व प्रासादिक रचना करणाऱ्या या ग्रंथकाराचें महत्त्व मराठी साहित्याच्या इतिहासांत रुजूं व्हावयास हवें आणि त्यासाठीं त्याचे ग्रंथ अभ्यासकांना सहज उपलब्ध व्हावयास हवेत, अशी अपेक्षा करणें अनुचित ठरणार नाहीं.

[या राजारामाचे सध्याचे वंशज श्री. प्रल्हादबुवा परदेशी हे मु. बाभुळगांव, पो. बाबतर, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद येथें राहातात. हें गांव गोदावरीच्या डाव्या तीरावर वसलें आहे. तेथें जाण्यास सर्वांत सोपा मार्ग पुणतांब्याहून आहे. पण तो पावसाळ्यांत बंद असतो. तेथें एका हडप्यांत राजारामाची रचना असलेल्या १०८ वह्या ठेवलेल्या आहेत. तेथेंहि याची अभंगरचना १५१४९१ एवढीच सांगितली आहे. मात्र विठाबाई राजारामाची शिष्या असा तेथें समज असून तिनें ४७ हजार रचना केली अशी कल्पना आहे. मी टिपण केलें त्यांत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

शके सत्राशें चौतीस । नाम जाणा आंगिरस ॥
कृष्ण पक्ष पौष मासी । वद्य असे त्रयोदशी ॥
जागा जाणा गुर्लहोसूर । मलप्रभा नदीतीर ॥

असा अभंगांश आहे. हा बहुधा राजारामास गुरुप्रसाद झाल्याचा काळ असावा. त्याची संपूर्ण रचना सोपी, गंगाप्रवाहाप्रमाणें संथगतीनें जाणारी व भावोत्कट अशी आहे. —ग. ह. खरे]

---

१४. शिखर-शिंगणापूर व शिवछत्रपतींचे पूर्वज

(श्री. ग. ह. खरे, पुणें.)

शिवाजी महाराजांच्या रजपूतत्वाविषयीं अनेकदा अनेक लोक मला विचारतात. माझी सध्या अशी समजूत आहे कीं, शिवाजी महाराज शुद्ध महाराष्ट्रभूचें सुमधुर व बलवर्धक फळ आहे. त्यांचा रजपुतांशीं संबंध प्रस्थापित करणें कृत्रिम आहें. ही समजूत पुराव्यानें सिद्ध होऊं शकते कीं नाहीं हें पाहण्यासाठीं पुरावा शोधीत आहे. या शोधांत शाही किंवा साहित्य किंवा संगीत मकरंदाची पुष्पिका पाहण्याचा योग आला व त्यांतून या लेखाची प्रवृत्ति झाली आहे. या लेखांत दोन विषयांचें विवरण आहे. पैकीं पहिला विषय असा :—

१

श्रीरामदासांची कविता, प्रथम खंड, प्रकाशक सत्कार्योत्तेजक सभा धुळें, या पुस्तकाच्या ३०६ व्या पृष्ठावर

सोरठीचा देव माणदेसा आला । भक्तीसी पावला सावकास ॥ १ ॥
सावकास जाती देवाचे यात्रेसी । होती पुण्यराशी भक्तीभावें ॥ २ ॥
भक्तीभावें देव संतुष्ट करावा । संसार तरावा दास म्हणे ॥ ३ ॥

असें ३२१ वें कवन आलें आहे. हें स्फुट ओव्या या प्रकरणांत संपादकांनीं समाविष्ट केलें आहे. याचा अर्थ या कवनाचा मागच्या पुढच्या कवनांशीं कांहींहि संबंध नाहीं. यांतील पहिल्या ओळींत आलेल्या ' सोरठीचा देव ' व ' माणदेसा ' या शब्दांवर या पुस्तकाच्या संपादकांनीं अनुक्रमें ' सोरटी सोमनाथ ' 'पंढरपुरास' अशा पादटीपा दिल्या आहेत. पण ह्या टीपांपैकीं सोरठीचा देव यावरील टीप अचूक असून माणदेसा यावरील ' पंढरपुरास ' ही टीप चुकली आहे. ' माणदेसा ' या शब्दामध्यें शिखर-शिंगणापूर हें स्थान किंवा शंभू महादेव हा तेथील देव अभिप्रेत आहे अशा प्रकारचें अनुमान महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनीं आपल्या ' सोरटी सोमनाथ आणि शिखर शिंगणापूर '

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

या लेखांत (प्रसिद्धिस्थल भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष ३६ पृष्ठ ४९, प्रकाशनकाल श. १८७८ = इ. १९५६) केलें आहे.

सोरठीचा देव या शब्दसमूहाचे दोन अर्थ होऊं शकतील : (१) कवनाच्या संपादकांनीं सुचविलेला सोरटी सोमनाथ आणि (२) द्वारकेचा द्वारकाधीश; दोन्ही देवस्थानें मुसलमानपूर्वकालीन आहेत याविषयीं शंका नाहीं. शैवांना ज्याप्रमाणें सौराष्ट्रांतील सोमनाथ हें ज्योतिर्लिंग अतिशय पवित्र व प्रिय वाटत होतें व वाटतें, त्याप्रमाणें वैष्णवांना द्वारकाधीश हें देवस्थानहि पवित्र व प्रिय वाटत होतें व वाटतें. पंढरपूरच्या विठ्ठलाचें दर्शन घेणारे वैष्णव द्वारकेस जात असें दाखवितां येते. उदा. श. १४२७ च्या सुमारास होऊन गेलेला चांगा मुधेश नांवाचा एक संतकवि विठ्ठलाची यात्रा करी व तो द्वारकेला गेला होता, असें त्याच्या चरित्रांत सांगितलें आहे. महान् बंगाली वैष्णव संत चैतन्य हाहि द्वारकाधीशाची यात्रा करून पंढरपुरास आला होता, असें समजतें. तेव्हां विठ्ठल आणि द्वारकाधीश यांचा उणा-अधिक संबंध जुने लोक लावीत याविषयीं शंका नाहीं. कवनाच्या संपादकांनीं त्या दोन टीपा दिल्या नसत्या तर वाचकांच्या मनांत सौराष्ट्रांतील सोमनाथ व द्वारकाधीश हीं दोन्ही देवस्थानें येण्याचा संभव होता आणि ज्यानें त्यानें आपल्या मनाप्रमाणें त्याचा निर्णय केला असता व या कवनांत कोणताहि एक देव अभिप्रेत आहे असें धरतां आलें असतें. पण संपादकांच्या दोन टीपांमुळें वाचकांच्या मनांत येथें कोणता देव अभिप्रेत आहे याविषयीं गोंधळ उत्पन्न होतो. शिखर-शिंगणापूर व पंढरपूर हीं दोन्ही स्थानें माण देशांत पूर्वीपासून मोडत असल्यानें या गोंधळांत अधिक भर पडते. म. म. पोतदारांनीं या कवनांत एका बाजूस सोमनाथ व दुसऱ्या बाजूस शिखर शिंगणापूर अभिप्रेत आहेत असें अनुमान केलें आहे. हें अनुमान जितकें बलवत्तर तितकेंच बलवत्तर एका बाजूस द्वारकाधीश आणि दुसऱ्या बाजूस पंढरपूर हें अनुमान होऊं शकेल. हें कवन स्फुट प्रकरणांत असल्यामुळें यास मागील पुढील संदर्भ मुळींच नाहीं. यामुळें संदर्भावरून अर्थनिश्चिति करण्यासारखें गमक येथें नाहीं. याच ग्रंथाच्या २१२ व्या पृष्ठावरील १३ व्या कवनांत अनेक देवांचे निर्देश आल्यामुळें त्या कवनाचा येथें अर्थनिश्चितीकरतां उपयोग होण्यासारखा नाहीं. यामुळें केवळ याच कवनाचा विचार करावयाचा तर वर दिलेलीं दोन्ही अनुमानें येथें तुल्यबल आहेत असें वाटतें.

तथापि, या कवनांतील देवतेची निश्चिति करण्यास अत्यंत उपयुक्त ठरणारा असा एक पुरावा भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकाच्या १० व्या वर्षाच्या तिसऱ्या अंकांत (प्रकाशनकाल श. १८५१) प्रसिद्ध झाला आहे त्याकडे म. म. पोतदार यांचें लक्ष गेलें नाहीं असें दिसतें. नाहीं तर, हा लेख लिहिण्याची अर्धी आवश्यकता उत्पन्न झाली नसती. वरील अंकांत श. १५७२ किंवा त्यापूर्वी वेद नांवाच्या मनुष्यानें साहित्य-मकरंद किंवा शाही-मकरंद अथवा संगीत-मकरंद या नांवाचा ग्रंथ रचला असून त्याच्या पुष्पिकेंत तीन श्लोक घातले आहेत ते असे--

CC-0. Agamnigam Research Foundation, Chandigarh

सौराष्ट्रदेशात् समुपागतोसौ श्रीसोमनाथः प्रमथाधिनाथः ॥
अधित्यकां वीक्ष्य गिरेर्विशालां चकार वासं किल चंद्रचूडः ॥ १ ॥
सुशीलभक्तस्य च भक्तितुष्टः तत्राधिवासस्य महादयालुः
न तत्र नीरं न तरुप्रचारः न कोऽपि लोके वसतिं करोति ॥ २ ॥
तत्रापि शंभुर्निजभक्तलोभात् कैलासवासं मनुते महेशः ॥
तस्मिन् स्थले सूर्यकुलावतंसो मालोजिनामा कृतवान् तटाकम् ॥ ३ ॥

या तीन श्लोकांपैकीं पहिल्या श्लोकांत सोमनाथ सौराष्ट्र देशांतून निघाला आणि महादेवाच्या डोंगरावरील विशाल अशी अधित्यका (राजव्यवहारकोशांत अधित्यका = बालेकिल्ला असा अर्थ) किंवा डोंगरमाथा पाहून तेथें वसती करून राहिला; आणि पाणी, झाडें, वसती नसतां मालोजीनें तेथें एक तळें बांधून पाणी, झाडें इत्यादींची व्यवस्था केली, असें सांगितलें आहे.

२

या साहित्यमकरंद किंवा शाहीमकरंद अगर संगीतमकरंद या ग्रंथांतील पुष्पिकेंत आलेल्या आणखी एका माहितीकडे वाचकांचें लक्ष मला वेधावयाचें आहे. हीमध्यें शिवाजीचें भोसले कुल हें सूर्यवंशी आहे असें सांगून त्याची वंशावळ दिली आहे. या भोसले कुलाची बाबाजीपासून पुढील वंशावळ आपणांस परिचित आहे; पण या पुष्पिकेंत बाबाजीचा पिता परसोजी व परसोजीचा पिता खेलोजी अशा बाबाजीच्या पूर्वीच्या दोन पिढ्यांचीं नांवें दिलीं आहेत.

आतां शिवचरित्रप्रदीप (सं. आपटे व दिवेकर; प्रकाशनकाल श. १८४७) या पुस्तकांत व्यंकटभट्ट या नांवाच्या मनुष्यानें रचिलेलें भोसलवंशावली नांवाचें एक प्रकरण दिलें आहे. त्यांत त्याचा रचनाकाल दिला नसला, तरी शहाजीचा मुलगा एकोजी, त्याचे मुलगे शहाजी, शरभोजी व तुळजाजी येथपर्यंतची वंशावळ दिली असल्यामुळें हा ग्रंथ तुळजाजीचा श. १६५७ (स. १७३५) मध्यें मृत्यू होण्यापूर्वी रचिला गेला याविषयीं शंका नाहीं. या प्रकरणांत मालोजीचा बाप बाबाजी, त्याचा पिता परसोजी व परसोजीचा पिता एकोजी अशी माहिती दिली आहे. यावरून एक गोष्ट कबूल करावयाला हरकत नाहीं व ती ही कीं, बाबाजीच्या पित्याचें नांव परसोजी होतें हें दोन्ही ग्रंथकारांना मान्य होतें; पण परसोजीच्या वडिलांचें नांव सांगतांना एकानें खेलोजी सांगितलें तर दुसऱ्यानें एकोजी सांगितलें आहे; याचा अर्थ असा कीं, जवळ जवळ शिवाजीसमकालीन दोन लेखकांना भोसले कुळांतील बाबाजीपलीकडील केवळ दोन पिढ्यांचीं नांवें माहीत होती. त्यांपैकीं बाबाजीच्या पितृनामाविषयीं दोघांची एकवाक्यता तर पितामह नामाविषयीं मतभिन्नता आहे.

भोसले कुलाचा उदेपूरच्या शिसोदें घराण्याशीं संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सभासदीपासून प्रायः सर्व बखरींनीं केला आहे. त्या सर्वांना मूळ आधार बहुतांशीं गागाभट्टानें केलेला निर्णय आहे. तो मला अजून पहावयास सापडलेला नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बाबाजीच्या पूर्वीच्या पिढ्यांच्या वंशावळी कै. चिं. वि. वैद्य आपल्या शिवचरित्र-निबंधावलीतील लेखांत देतात; त्यांतील पिढ्यांची संख्या व तद्दर्शक मूळ साधनांचा काळ यांमध्यें इतकी भिन्नता आहे कीं, त्यांचा तौलनिक अभ्यास केला असतां त्या सर्वच वंशावळी अविश्वास्य वाटतात. शिवाय नेहमींचा अनुभवहि आहे कीं, या वंशावळी समकालीन लेखांच्या कसोटीवर घासून पाहिल्या तर त्या अचूक ठरत नाहींत. आणि या वंशावळीशीं समकालीन व तद्विषयक एकहि चिठोरें अद्याप मिळालेलें नाहीं. मुधोळचें घोरपडे घराणें व त्यांचीं भाऊबंद घराणीं आणि प्रस्तुत भोसले घराणें हीं मूलतः एकच अशी समजूत आहे. 'मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास' या पुस्तकांत ह्या घोरपडे घराण्यासंबंधीं कांहीं कागद प्रकाशित झाले आहेत. कागद बनावट असल्याबद्दल कै. डॉ. सालतूर यांनीं एक लेख लिहिला होता. त्यांनीं दिलेल्या कारणां-वरून ते बनावट ठरूं शकत नाहींत असें मी दाखविलें आहे. पण इतर अनेक कारणां-वरून ते बनावट आहेत अशी माझी खात्री झाली आहे. शिवाय ते कागद भोसले वंशावळीचा प्रामाणिकपणा ठरविण्यास उपयोगी पडणारे नाहींत.

जयराम पिंड्ये व परमानंद नेवासकर या दोघांना शहाजी व शिवाजी यांच्या चरित्राची चांगली माहिती होती. पण त्यांच्या पूर्वजांविषयीं ते केवळ मालोजीपासून खात्रीलायक माहिती देतात. पिंड्यानें आपल्या राधामाधवविलासचंपूंत महीच्या महेंद्रामधे मुख्य राणा । बलीपास त्याचे कुळीं जन्म जाणा ॥ तयाचे कुळीं माल भूपाल झाला' असें अधिक सांगितलें आहे (पृ. २६७). याचा अर्थ असा कीं, राणा कुळांत बलीप जन्मला व त्याच्या कुळांत मालोजी जन्मला. राणा म्हणजे उदेपूराचा कोणी राणा व बलीप म्हणजे दिलीप असा अर्थ करून कै. वैद्य यांनीं भोसले घराण्याचा उदेपुराशीं संबंध जोडला आहे. येथें एक लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, राणा हा शब्द जुन्या मराठी लेखांत पुष्कळ ठिकाणीं आला आहे. उ. वेळापूर व राणे बेन्नूर लेख पहावे.[1] तेव्हां राणा या शब्दाचा उदेपुराशींच संबंध लावला पाहिजे असें नाहीं. शिवाय बलीप शब्दाचे दिलीप असें रूप करणें योग्य नव्हे व केलें तरी हा कोण याचा नीट पत्ता लावलेला नाहीं. यामुळे या उल्लेखानें कांहींच सिद्ध होऊं शकत नाहीं. परमानंदानें मालोजी-पासूनच वंशवर्णन सुरू केलें आहे. संभाजी व राजाराम यांच्या दानपत्रांतही मालोजी-पासूनचीच माहिती आली आहे. तात्पर्य, शिवकालीन लेखकांना शिवाजीचा पणजा बाबाजी याच्या पलीकडच्या पिढ्यांविषयीं विशेष व अचूक माहिती सांगतां येत नाहीं. तरीही भोसले शिसोदेकुळांतील आहेत अशी तत्कालीन व पश्चात्कालीन लेखकांची समजूत होती असें दिसतें. ही समजूत केव्हांपासून प्रचारांत आली हें आज नीट समजत नाहीं. कारण या समजुतीचा उच्चार करणारे शिवकालीन ग्रंथकार कालदृष्ट्या एकमेकांच्या फारसे आगेंमागें नाहींत.

---

[1] श्री. शं. गो. तुळपुळे – प्राचीन मराठी कोरीव लेख.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ अहवाल (शक १८३२) रु. ३—०
२ अहवाल (शक १८३३) रु. ५—०
* ३ सुबंतविचार (वि. का. राजवाडे) १०—०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५—०
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (वि. का. राजवाडे) १—५०
६ प्रथम संमेलनवृत्त (शक १८३५) ०—७५
७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६—०
* ८ द्वितीय संमेलनवृत्त (शक १८३६) ३—०
९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३—०
१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३—०
११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६—०
१२ तृतीय संमेलनवृत्त (शक १८३७) ३—०
१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ०—५०
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०—५०
१५ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ०—७५
१६ स्फुट प्रकरणें, भाग २ रा ०—७५
१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३—०
१८ चतुर्थ संमेलनवृत्त (शक १८३८) ४—०
१९ राजवाडे खंड स्थलसूची ४—०
२० पंचम संमेलनवृत्त (शक १८३९) ३—०
*२१ संशोधनसंग्रह
२२ चंद्रचूड-दप्तर, कला १ (द. वि. आपटे) ३—०
*२३ महाराष्ट्र-सारस्वत १०—०
२४ षष्ठ संमेलनवृत्त (शक १८४०) ४—०
२५ सप्तम संमेलनवृत्त (शक १८४१) ३—०
२६ संशोधकाची छोटी जंत्री (आपटे) ०—२५
२७ मंडळप्रदर्शनपरिचय ०—२५
२८ फार्सी पत्रव्यवहार (गं. ना. मुजुमदार) ५—०
२९ फार्सी-मराठी कोश (मा. त्र्यं. पटवर्धन) ४—०
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १—५०
३१ हिस्टॉरिकल मिसलेनी १—०
३२ पुरंदरे-दप्तर, भाग १ (कृ. वा. पुरंदरे) ४—०
३३ शिवचरित्रसाहित्य, खंड २ ४—०
३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड १ (ग. ह. खरे) २—०
*३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ २—०
३६ राजारामचरितम् (वा. सि. बेंद्रे) १—५०
३७ मंडळांतील नाणीं (ग. ह. खरे) १—०
*३८ शिवचरित्रसाहित्य, खंड ४ १—५०
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही (वा. सि. बेंद्रे) ४—०
*४० ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ (ग. ह. खरे) १—५०
*४१ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड २ (ग. ह. खरे) २—०
*४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड २ १—५०
*४३ मंडळचित्रग्रंथ, चित्रें २० ०—५०
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ (शं. ना. जोशी) २—५०
४५ विजयनगर-स्मारक-ग्रंथ (करमरकर व ओतुरकर) ४—०
*४६ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २ (ग. ह. खरे) १—५०
४७ शिवचरित्रसाहित्य, खंड ६ (ग. ह. खरे) १-५०
४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (शं. पु. जोशी) ०—७५
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह (कानडी), भा. १ (पां. भी. देसाई) १—५०
४९अ, अखिल भारतीय अर्वाचीन इतिहास परिषद पहिलें अधिवेशन ३—०
५० शिवचरित्रसाहित्य, खंड ७ (कृ. वा. पुरंदरे व ब. द. आपटे) १—५०
*५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ (ग. ह. खरे) १—५०
५२ } शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड २ व ३
५३ } फार्सी विभाग (ग. ह. खरे), प्रत्येकीं १—२५
५४ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड १ (चिं. ग. कर्वे) १
*५४अ, ऐ. संकीर्ण साहित्य, खंड ३ ३—०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५५ शिवचरित्रसाहित्य, खंड ८ १—५०

*५५ अ, शिवचरित्रसाहित्य, खंड ५ ३—५०

५६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ४ २—०

५७ ऐ. संकीर्ण वाङ्मय साहित्य, खंड १ १—५०

५८ शिवकालीन दंडनीति (वा. सि. बेंद्रे) ३—०

५९ पुणेंनगरसंशोधनवृत्त, खं. २ (चिं. ग. कर्वे) १-५०

६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १ १-५०

६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ५ १-५०

६२ शिवचरित्रसाहित्य, खंड ९ (शां. वि. आवळसकर) १—५०

६३ हिंगणे दप्तर, खंड १ (ग. ह. खरे) ३--०

६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ६ १-५०

६५ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ३ २—०

६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ १—५०

६७ महाराष्ट्रांतील कांहीं ताम्रपट व शिलालेख (डॉ. मो. गं. दीक्षित) ३—०

६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ७ २--०

६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २ ३--०

७० हिंगणे दप्तर, खंड २ (ग. ह. खरे) ३--०

७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार (शां. वि. आवळसकर) ३—०

७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ४ २-५०

७३ पेठे दप्तर, भाग १ (वि. सि. चितळे) ३-०

७४ Explorations at Karad 5—0

७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली (शं. ना. जोशी) ३—०

*७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ३ (ग. ह. खरे) ३—०

७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ४ (ग. ह. खरे) ३—०

७८ पेठे दप्तर, भाग २ (वि. सि. चितळे) ३-०

७९ पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (रा. वि. ओतुरकर) ३—०

८० इतिहासकर्ते मराठे (ग. ह. खरे) २—०

८१ दाभाडे दप्तर, खंड १ (शं. ना. जोशी) ३-०

८२ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. ४ (डॉ. मो. गं. दीक्षित) ३-०

८३ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड ४ २—०

८४ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ ३-०

८५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ८ (द. वा. पोतदार) ३—०

८६ शिवचरित्रसाहित्य, खंड १० (शां. वि. आवळसकर) ३—०

८७ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ९ ३-० (शं. ना. जोशी)

८८ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ ५-०

८९ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १० ५-० (शां. वि. आवळसकर)

९० शिवचरित्रसाहित्य खंड ११ (ग. ह. खरे) ५—०

९१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ११ (य. न. केळकर) ५—०

९२ भारत-इतिहास-संशोधक-मण्डलस्थ-हस्तलिखित-ग्रन्थानुक्रमणिका (ग. ह. खरे) १५—०

९३ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ५, भाग १ (ग. ह. खरे) ६—०

९४, ९५ शिवचरित्रसाहित्य, खंड १२ व १३ (ग. ह. खरे) अनुक्रमें ५ व ६

९६ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ७ ५—०

मंडळ त्रैमासिक पुस्तकें १ ते ४४, प्रत्येकीं ५ रु.; याशिवाय सर्व प्रकारचीं ऐतिहासिक पुस्तकें मिळवून देण्याची खटपट केली जाईल; तारकांकित पुस्तकें अप्राप्य; पण क्र. ३५, ३८, ४०-४३, ४६, ५१, ५४ अ, ५५ अ, ७६ हीं त्रैमासिकांत भागशः प्रकाशित झालीं आहेत; स्वीय मालेंतील पुस्तकांच्या खरेदीवर खालीं दिल्याप्रमाणें सवलत मिळेल— २५-५० रु. = १० टक्के; ५१-१०० रु. = १२॥ टक्के; १०१ रु. व पुढें = १५ टक्के.